माझ्या या चांगल्या बाजू तुम्ही बघितल्यात. आता झाकौळलेली, नैराश्यजनक बाजूही दाखवते आहे. माझे कर्तृत्व काही जणांच्या डोळ्यात खुपते. मग ते मला मागे खेचण्याचा प्रयत्न करतात. रात्रपाळीवरील स्त्रीला परत जाताना, तिच्यावर बलात्कार करतात. हे कोणत्या नीती नियमांत बसते? पण असे काही आंबटशौकिन जोपर्यंत समाजात आहेत, तोपर्यंत मी सुरक्षित नाही, भय इथले संपत नाही असे मला वाटायचे, पण एक आशादायक ॲप पोलिसांनी मला डाऊनलोड करण्याचे आवाहन केले आहे. त्यात मी हेल्पची कळ दाबताच, पोलिस स्टेशनला मी कुठे आहे ते समजेल आणि त्या प्रांतातील पोलिस ताबडतोब माझ्या मदतीला पाठवतात. त्यामुळे आता मी संपूर्ण सुरक्षित आहे असे म्हणू शकते. आता स्त्रीचे संरक्षण एक महिला पोलीस करु शकते.

शेवटी मला म्हणावेसे वाटते हे २२व्या शतकातील नवयुग ललने, तू अष्टावधानी आहेस. तू आधुनिक युगातल्या अष्टभूजेचेच रुप आहेस. माझे तुला सादर वंदन!

***

''अहकांराला'' दूर ठेवण्यासाठी वर्षातून एकदा त्या भाजी विक्रिचं काम करतात.

पैशाने ''त्यांची'' मूल्ये अजिबात बदलली नाहीत, हे त्यांनी दाखवून दिले आहे. भाजी विकणाऱ्या एका सामान्य महिलेचे हे चित्र आहे, असे अनेकांना वाटेल. पण ती काही सामान्य स्त्री नाही ज्याबद्दल आपण बोलत आहोत त्या सुधा मूर्ती, लेखिका आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या चेअरपर्सन आहेत आणि २,४८० कोटी रुपयांपेक्षा जास्त (अंदाजे ३७५ दशलक्ष डॉलर्स) संपत्तीसह भारतातील सर्वात श्रीमंत महिलांपैकी एक आहेत. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. सुधा मूर्ती या मराठी, कन्नड आणि इंग्रजी भाषेमधून लिखाण करतात.

इन्फोसिस फाऊंडेशन या एक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेच्या निर्मितीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. या संस्थेच्या त्या सह-संस्थापिका आहेत. तमिळनाडू आणि अंदमान येथे सुनामीच्या काळात त्यांनी विशेष सेवाकार्य केले आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील लोकांनाही संस्थेने मदत दिलेली आहे.

श्रीमती सुधा मूर्ती वर्षातून तीन दिवस बेंगळुरूच्या जयनगर येथील राघवेंद्र स्वामी मंदिरात स्वयंपाकघराच्या कामात मदत करण्यासाठी जातात. त्या स्वयंपाकघर आणि आजूबाजूच्या खोल्या साफ करतात; घाणेरडी

भांडी धुणे, शेल्फ धूळ फेकणे, भाजीपाला चिरणे, साठा घेणे, अंगणात साफसफाई करणे आणि कचऱ्याचे डबे रिकामे करणे. पैशाने त्यांची मूल्ये अजिबात बदलली नाहीत, हे त्यांनी दाखवून दिले आहे. या फोटोमध्ये सुधा मूर्ती बंगळुरूच्या जयनगरमधील श्री राघवेंद्र स्वामी मठ येथे भाजीपाला विकताना दिसत आहेत. सुधा मूर्ती अहकांराला दूर ठेवण्यासाठी वर्षातून एकदा भाजी विक्रीचं काम करतात. पैसे देणे सोपे आहे, कारण हा एक साधा व्यवहार आहे. पण प्रत्यक्ष सेवा करणे सोप्पे नाही. देवाच्या दृष्टीने आपण सर्व समान आहोत.

-संतोष द पाटील

मेडिकल स्टोअरमध्ये उपलब्ध नसलेल्या औषधांचे प्रकार तुम्हाला माहीत आहेत का...?

- व्यायाम हे औषध आहे.
- सकाळ/संध्याकाळ चालणे हे औषध आहे.
- उपवास हे औषध आहे.
- कुटुंबासोबत जेवण हे औषध आहे.
- हसणे आणि विनोद हे देखील औषध आहे.
- गाढ झोप हे औषध आहे.
- सर्वांशी मिळून वागणे हे औषध आहे.
- आनंदी राहण्याचा निर्णय हे औषध आहे.
- मनातील सकारात्मकता हे औषध आहे.
- सर्वांचे भले हे औषध आहे.
- कधी कधी मौन हे औषध असते.
- प्रेम हे औषध आहे.
- मन:शांती हे औषध आहे.
- राजयोग (Meditation) हे औषध आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही सर्व औषधे पूर्णपणे मोफत आहेत
आणि सर्व एकाच ठिकाणी कुठे मिळवायचे?
प्रत्येक चांगला मित्र हे एक परिपूर्ण मेडिकल स्टोअर आहे.
निरोगी रहा आणि आनंदी रहा
आजच्या दिवसाचा आनंद घ्या...!

***

पृथ्वीतलावर जी जी माणसं यशस्वी झाली आहेत, ती ती जास्तवेळा अपयशी झाली आहेत.

पहिले पाऊल

– मंदाकिनी डावरे, पुणे

''गुरुंजी! फार मोठ्या अडचणीत आले आहे बघा मी! माझ्या पोराला इथं ठिवून घ्या. फक्त आठच दिवस! तुमचं उपकार कधी विसरणार न्हाई मी!''

एवढी विनंती करीत शेवंतीने घडलेली सगळी हकीगत गुरुजींच्या कानावर घातली. बराच विचार करुन त्यांनी शेवंतीचा मुलगा भानू याला फक्त आठ दिवसांकरिता आपल्या 'आस्था'या वृद्धाश्रमात ठेऊन घेण्यासंबंधी होकार देताच आल्या पावली अगदी घाईघाईने 'देवगावच्या' त्या आश्रमामधून आपल्या सातपूर या गावी निघून जातांना शेवंतीने भानूला बजावले की,...

''पोरा! गुरुजी सांगतील ती सगळी कामे करत त्यांच्या आज्ञेतच रहा बरं का!''

''शेवंतीने आपल्या पोराची शाळा चालू असताना, त्याचा तेथील अभ्यासाचा वेळ असा आपल्या वृद्धाश्रमातच का घालवावा?'' ह्याचे जरी कारण गुरुजींना कळले होते तरी ''तिला दुसरीकडे कोठे जागा मिळाली नाही का? तिला कोणी नात्याचे नाही का?'' हा प्रश्न गुरुजींच्या मनात उद्‌भवलाच.

खरे तर 'आस्था' आश्रमाची निवड हा मार्ग शेवंतीने निवडलेला नव्हताच तर त्याची निवड केली होती एका बारा वर्षाच्या मुलाने! होय, त्याच त्या भानूने आणि त्याचे कारणही तसेच होते...!!

देवगावचा नावलौकिक होता तो तेथील 'आस्था' या वृद्धाश्रमाच्या कळकळीच्या अशा कार्याबद्दलच. ''जे निराधार आहेत, आपल्या वृद्ध आईवडिलांना ज्यांनी विना मदत असे एकाकी सोडून दिलेले आहे अशा व्यक्तींचा एक पालनकर्ता तेथे होता.'' 'विष्णुदास' हे त्यांचे नाव!

हाडाचा शिक्षक असलेल्या त्या व्यक्तीने शालेय निवृत्तीनंतर अशा प्रकारचे जणु वृद्धांची सेवा करण्याचा वसाच घेतला. वडिलोपार्जित अशा एका छोट्या शेत तुकड्याचे रुपांतर त्यांनी एका सदनात केले. थोडी फार स्वत:ची पुंजी आणि त्याच्या जोडीला स्वत:च्या अविश्रांत कामाची जोड देत विष्णुजींनी 'आस्था' या वास्तूची स्थापना केली आणि ठिकठिकाणी हिंडून त्यांनी अगदी गरजु आणि निराधार वृद्ध, अशांना तेथे आश्रय दिलेला होता. आजारी वृद्धांची सेवा, तर बरी तब्येत असलेल्या काही निराधार व्यक्तींकडून आश्रमातील फुलझाडे, फळबागा यांची निगा राखून होते, स्वत:च्या शेतीच्या ज्ञानाच्या आधारे विष्णुजींनी तृण धान्यांची लहानशी शेती सुद्धा उजवून ठेवलेली होती. तेथे जमवून ठेवलेल्या विविध ग्रंथाच्या आधारे त्यांनी तेथील लहानशा हॉलमध्ये वाचनालयाची सुद्धा, मांडणी करुन एक प्रकारचे सर्वोपयोगी असे जणु 'धाम' बनविले होते.

ज्या आश्रमवासीयांना डोळ्यांच्या अधुपणाने वाचन करणे जमत नाही अशासाठी विष्णुजी स्वत: वाचन करुन त्यांना ''माहिती आणि करमणूक'' हा आनंद देत.

निरनिराळ्या शाळांचे प्रमुख शनिवार, रविवार अशा जोडून येणाऱ्या सुट्यांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचे लहान लहान गट विष्णुजींच्या आश्रमात ''शिक्षण आणि सेवा'' या शालेय उपक्रमां अंतर्गत पाठवीत असत. त्या दोन दिवसांच्या निवासी शिबीरासाठी 'आस्था' मध्ये जाणारे विद्यार्थी ज्या आनंदात तेथे जात असत त्यापेक्षा चौपट आनंदाने तेथून परतत असत.

यामुळेच तेथे जाऊन आलेल्या मुलांचा तो आनंद तो उत्साह पाहून शाळा शाळांमधील विद्यार्थी गट, ''आपल्यालाही तेथे जाण्याची संधी लवकर मिळावी'' या प्रतिक्षेत असत. अशावेळी 'आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक 'शिवतारे सर' हे या बाबतीत मागे कसे रहातील? आपल्या शाळेतील आठवीच्या वर्गातील दहा दहा विद्यार्थ्यांच्या गटाला ते महिन्यातून येणाऱ्या पहिल्या शनिवार, रविवार असे दोन दिवसांच्या निवासी शिबीराला पाठवीत. आणि तेथे परिसर स्वच्छता, पाकगृहात मदत, शेती विषयक ज्ञान आणि बाजारातून आवश्यक खरेदीच्या वस्तूंची निवड आणि त्यांचे भाव यांसारखी महत्वाची कामे शिकून जेव्हा विद्यार्थी परतत असत तेव्हा त्यांच्या पालकांनाही 'शाळा' आणि 'आस्था' ह्या आश्रमाला शतश: धन्यवाद द्यावेसे वाटत.

त्यावेळी भानूला सुद्धा 'शिक्षण आणि सेवा' या प्रकल्पाअंतर्गत 'आस्था' या आश्रमात रहाण्याची संधी मिळालेली होती. परंतु आज मात्र आपल्या आईच्या मदतीने तो येथवर पोहचला होता. ते कारण फारच गंभीर होते.

*

भाग दोन

भानूच्या डोळ्यासमोरुन तो प्रसंग जाता जात नव्हता...

''मास्तर ऽऽ! अहो हे काय ऐकतोय मी? माझ्या कृष्णाला डावलून तुम्ही त्या बागुर्ड्याच्या पोराला दिल्लीला पाठवताय की काय? अहो मी म्हणतोय, तुमची हिंमत कशी झाली असे करण्याची? ते काही नाही, माझा कृष्णाच दिल्लीला गेला पाहिजे. अन् तसे घडले नाही तर तुमची गाठ माझ्याशी आहे. हे पक्के ध्यानात ठेवा!!''

शिवतरे सरांना दम भरून कुसळगावचे सरपंच, 'रावसाहेब' मोठ्या मगरुरीने त्यांनी बरोबर आणलेल्या त्यांच्या रक्षकांसह शाळेतून निघून गेले.

कुसळगावात भर वर्गात घडलेला हा प्रसंग! वर्गातील सर्व मुले त्या घटनेने कावरीबावरी होऊन गेली होती आणि 'बागुर्ड्याचा पोर म्हणून ज्याची निर्भत्सना केली गेली होती तो भानू तर थरथरच कापत राहिला आणि 'माझ्यामुळे शिवतरे सरांचा जीव धोक्यात येणार? नाही, नाही हे नकोच घडायला!' असे कितीतरी वेळा तो मनातल्या मनात घोकू लागला.

पहिली पासून ते आठवीपर्यंत शिवतरे सरांच्या देखरेखीखाली मोठा होत गेलेला भानू घरच्या गरीबीमुळे आई वडिलांपासून दूर अशा कुसळगावच्या विद्यार्थी गृहामध्ये रहात होता. अतिशय अभ्यासू, प्रामाणिक आणि हसत खेळत रहाणारा, भानू शाळा आणि विद्यार्थी गृहात दोन्ही ठिकाणी सर्वांचाच आवडता बनलेला होता. सगळीकडून त्याच्या गुणांची

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

कदर केली जात असतांना सुद्धा त्याने त्याच्या विनम्रपणा टिकवून ठेवला होता.

रावजी साहेबांचा मुलगा कृष्णा आणि भानू हे जिवलग दोस्त! भलेही दोघांच्या परिस्थितीत, रहाणीमानात जमिन अस्मानाचे अंतर असले तरी सुद्धा कृष्णाने कधीही त्याच्या श्रीमंतीचा बडेजाव दाखविलेला नव्हता. भानू त्याला अभ्यासात मदत करीत असे तर कृष्णा त्याची 'शालेय वह्या पुस्तके, सहलीसाठी पैसे देणे' या साऱ्या गरजा पूर्ण करीत असे. शाळेत सर्वांचेच दिवस अगदी छान चाललेले होते.

देशातील सर्व सरकारी शाळेतील आठव्या इयत्तेतील मुलांसाठी भारतीय संविधानाच्या पंचाहत्तराव्या वर्षानिमित्त 'ज्युनियर एन.सी.सी.' हा उपक्रम राबविला जात होता. विद्यार्थ्यांना त्या नुसारच शिक्षण देण्यात येत होते. शनिवार आणि रविवार सकाळी सात ते नऊ असे दोन दोन तासांचे जे शिक्षण दिले जात होते त्यामध्ये पहिल्या तासात कवायत आणि परेड तर मधल्या काहीशा विश्रांतीनंतर धाडसी खेळांचा सराव करण्यात येत होता. कॅडेट्साठीच्या अल्पोपहाराची सोयही शासनाकडूनच केली जात असे. धाडसी खेळांमध्ये वेगवेगळ्या, अडथळ्यांच्या शर्यती, उंच लटकावून ठेवलेल्या दोरावर खालूनवर पर्यंत चढत जाणे, दोन झाडांना बांधून जो दोर घट्ट बांधून ठेवलेला असे त्यावरुन सरसर पुढे निघून जाणे इत्यादी खेळांचा समावेश असल्याने हे ज्युनियर कॅडेट्स या खेळांचा अगदी मनसोक्त आनंद लुटत असत.

सहा महिने अशा प्रकारे ट्रेनिंग घेणारे असे त्या एकता विद्यालयाचे पंचवीस विद्यार्थी पुढील दोन दिवस त्यांच्या कौशल्य चाचण्या पूर्ण करणार होते आणि त्यातूनच निवडला जाणार होता एक उत्कृष्ट कॅडेट्! आणि त्यालाच दिल्लीला होणाऱ्या खास कार्यक्रमासाठी पाठविले जाणार होते. राज्यातील प्रत्येक शाळेतील ''एक उत्कृष्ट कॅडेट कोण ठरणार?'' याची सर्वांचीच उत्सुकता आता शिगेला पोहचली होती.

*

भाग तीन

कौशल्य चाचण्यातून निवड करण्यासाठी दिल्ली येथून कॅ. सिन्हा आणि कॅ. अय्यर हे परीक्षक कुसलगावमधील शाळांसाठी पाठविले गेलेले होते. अवघ्या सहा महिन्यात मुलांनी पूर्ण केलेले ते प्रशिक्षण आणि त्याचा प्रभाव हा प्रत्यक्षच पाहून दोघेही थक्क झाले होते. प्रत्येकानेच कौशल्य चाचणी ही जिवापाड मेहनत घेऊन पूर्ण केलेली होती. त्यामुळेच दोन्ही परिक्षकांना नेमकी एकाची निवड करणे कठीण जात होते. इकडे प्रत्येक कॅडेटच्या मनावरील ताण वाढतच चाललेला होता. कॅ. सिन्हा आणि कॅ. अय्यर यांनी पुन्हा पुन्हा प्रत्येक कॅडेट्च्या गुणांची बेरीज करुन पाहिली. सगळ्यांचेच गुण जवळजवळ सारखेच होत होते. बऱ्याच वेळानंतर त्यांना थोड्या गुणांनी पुढे असलेले एक नाव आढळले आणि त्यांना हायसे वाटले.

मात्र एका कॅडेटचे नाव 'विजेता' म्हणून जाहीर करण्यापूर्वी आपल्या नेहमीच्या सरावा प्रमाणे कॅ. अय्यर यांनी सर्वच कॅडेट्साठी प्रोत्साहन पूर्ण भाषण केले.

''डियर फ्रेंडस्! तुम्ही जे असामान्य कौशल्य दाखविले त्याबद्दल सर्वप्रथम तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!'' एवढे बोलून त्यांनी पुढे असेही सांगितले की, प्रथम क्रमांकाइतकाच गौरवस्पद असा दुसरा आणि तिसरा क्रमांकही असतोच. त्यामुळे ह्या क्रमांकांना आम्ही कोणीच कमी मानत नाही. फरक फक्त एवढाच की आकडा बदललेला असतो म्हणूनच प्रथम क्रमांक नाही म्हणून कोणीही नाराज व्हायचे नसते! तर मित्रांनो एक एक गुणाने प्रथम आलेल्या त्या कॅडेट्च्या यशाला आपण टाळ्या वाजवून प्रोत्साईत करु या! ह्याचे नाव आहे भानू बागुर्डे!''

भानुचे नावं ऐकताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाटच इतर कॅडेट्सनी केला आणि त्याच्या नावाचा जयजयकारच जसा सुरु झाला.

दोन्ही परिक्षकांनी अगदी तावून सुलाखून परिक्षण केल्यानंतरच जेव्हा भानूचे नाव त्यांनी जाहीर केले त्यातच त्यांचा निःपक्षपातीपणा व सचोटी दिसून आली होती.

भानूच्या निवडीची बातमी तिकडे सातपूरला पोहचण्यास मुळीच उशीर लागला नाही आणि त्यानंतर लगेचच भानूचे तेथील घर हे आनंदात न्हाऊन निघाले. शेतमजुरी करणाऱ्यांच्या त्या घरात कधी नव्हे ती येणाऱ्यांच्या पावलांची चाहूल लागत राहिली. शुभेच्छा आणि आशीर्वाद यांचा जणु भानुवर पर्जन्य वर्षावच होऊ लागला होता.

भानू आता आठ दिवस दिल्लीत रहाणार होता. निवास, जेवणखाण शिवाय दिल्ली दर्शनासह आजूबाजूंची प्रेक्षणीय स्थळे बघणे त्याला आणि इतर शाळांमधील प्रथम क्रमांकांच्या कॅडेट्सना प्राप्त होणार होते. तसेच भानू परत आल्यानंतर त्याच्या तोंडूनच दिल्लीतील कार्यक्रमाचे वर्णन ऐकून सर्वजण खुश होणार होते.

इकडे आपल्या घरात पोराच्या यशाची बातमी ऐकून आनंदित झालेले त्याचे बाबा भानूच्या आईला म्हणू लागले, ''शेवंते! आपला भानू दिल्लीहून परत आला ना, की त्याची नजर उतरवून टाक बर कां!!''

***

तळसंदे गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. शुभांगी महेश कुंभार यांचा अभूतपूर्व निर्णय...

गावाच्या भल्यासाठी रात्री ७ ते ८.३० पर्यंत सर्व नागरिकांनी आपल्या घरातील टेलिव्हीजन व सर्वांचे मोबाईल फोन बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच यासाठी रोज सायंकाळी ७ वाजता गावात भोंगा वाजविण्यात येणार आहे.

यामागची भूमिका विषद करताना त्यांनी सांगितले की, आज लोकांना एकमेकांशी बोलायला देखील वेळ दिला जात नाही. तसेच मुला मुलींना अभ्यासासाठी देखील पुरेसा वेळ आणि शांतता मिळत नाही. म्हणून ही कल्पना त्यांनी राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

सरपंच सौ. शुभांगी महेश कुंभार यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

***

मंजुळा काकूचा ऑनलाईन धोंडा

– चंद्रकांत नवले, पुणे

अहो ऽऽ ऐकलंत का? मी, काय म्हणते?

ऐकलं, ऐकलं, आतापर्यंत तुमचंच ऐकत आलो! बोला काय हुकूम आहे साहेबाचा?

हुकूम बिकूम काही नाही. पंधरा दिवसांनी 'धोंडमास' आहे, आणि आपल्या लाडक्या लेकीचा हा पहिलाच अधिकमास आहे. आत्ता पंधरा दिवस भरकन निघून जातील, आपल्याला तयारी करायला हवी की नको? मंजुळाकाकू म्हणाल्या.

''अरे हो! विसरलोच मी! पुढचा महिना अधिकमास आहे ममता व जावईबापू यायला हवेत.'' सीतारामपंत उत्तरले.

मंजुळा काकू म्हणाल्या, ''का येणार नाही? त्यांनाही हौस आहे व सणाचे महत्वपण त्यांना कळतं?'' रात्री ममताला फोन करा, येण्याचा आग्रह करा, नक्की येतील ते.

ठीक आहे, मी मधूला रात्री फोन करायला सांगतो. मधू – मंजुळा काकूचा मुलगा रात्री ममताला फोन लावतो.

मधू – हॅलो ताई, मी मधू बोलतो, कशी आहेस तू? बाळ कसं आहे? रांगत असेल आता? इकडे आई, बाबा व मी आम्ही मजेत आहोत. 'अधिक महिन्या'बाबत आईला तुझ्याशी काही बोलायचे आहे, हं, आईशी बोल.

ममता – हॅलो, आई कशी आहेस तू? तुझी अन् तू केलेल्या – पुरणपोळ्यांची आठवण येते. तुझ्या हाताला चव आहे. अधिकमासाबद्दल तू काय सांगणार आहेस?

मंजुळाकाकू – हॅलो ममता मी चांगली ठणठणीत आहे, आणि आठवण येते म्हणजे काय विचारतेस? अगं आठवण येणारच तू आमची लाडकी लेक आहेस ना? बरं! ते जाऊ दे मी काय म्हणत होते? की येणारा पुढचा महिना 'अधिकमास' आहे या अधिकमासांत जावयाला 'वाण' घावे लागते.

मुलीला जावयाला कपडे करावे लागते जावयाला सोन्याची मुदी करावी लागते, अनारसे, बत्ताशे व पुरणाच्या धोंड्याचे वाण द्यावे लागते. तसेच – तू नीट ऐकतेस ना हं तसेच हा तुमचा पहिला धोंडमास आहे, आणि मला हा धोंडमास धडाक्यात व हौसेनं करायचा आहे. काका–काकू, मामा–मामी, आत्या–मामा या सर्वांना जेवणासाठी मेहूण सांगणार आहे. जवळच्या नातलगांनाही बोलावणार आहे, आणि हे सर्व माझ्या खर्चाने बरं का! ममता तेव्हा दोन दिवसासाठी इकडे येऊन जा.

ममता – अगं आई सॉरी हं, आम्हाला येणं जमणार नाही, दिवाळी साठी आलो होतो. आता सुटी मिळणार नाही, तसेच आमच्या कंपनीमध्ये नवीन प्रकल्प सुरू होत आहे.

मंजुळा काकू – काय गं बाई तुझं असं नेहमीचंच! ममता, असं कर तुझ्या साहेबांना माझं नाव सांग, अधिकमासाच महत्व असतं असं सांग. तुझे साहेब ऐकतील व तुला सुटी मिळेल, तुला काय सांगू ममता, अगं आमच्या पहिल्या धोंडमासाला तुझ्या बाबांनी चांगली चार दिवसाची सुटी काढली होती.

ममता – अगं आई, त्यावेळची परिस्थिती व आजची परिस्थिती यात खूप फरक झाला आहे, तसेच इकडचे प्रशासन व आपल्याकडचे प्रशासन यात फार फरक आहे. तेव्हा माझं येणं जमणार नाही. नाहीतर असं करू या, आम्ही दिवाळीला आल्यावर धोंडामास जेवण करू.

मंजुळाकाकू नाराज होऊन फोन ठेऊन देतात.

मधू – आई! फोन कट केला? काय झालं?

ममताचं येणं जमत नाही. दिवाळीला आल्यावर धोंडा करू असे ती म्हणाली. मंजुळाकाकू रागारागातच बोलल्या.

अगदी बरोबर! दिवाळी व धोंडमास जेवण एकाच वेळी करता येतील, सीतारामपंत मध्येच बोलले.

पंतांच्या बोलण्यावर मंजुळाकाकू चांगल्याच चिडल्या, त्या म्हणाल्या, ''म्हणे दिवाळीत धोंडा जेवण करू, असे नाही करता येत, दिवाळी वेगळी धोंडामास वेगळा. उद्या तुम्ही म्हणाल की दिवाळीत होळी करू, जमंल का? सांगा सांगा जमंल का? प्रत्येक सणाचं आपलं एक वेगळं महत्व असतं, 'बाप तशी लेक' उगाच चिडवायला लावतात.

मुलगा मधू समजावत म्हणाला, ''आई, तिकडचे लोक सण, उत्सव, कार्यक्रम बहुधा रविवारी किंवा सुटीच्या दिवशी साजरे करतात. त्यांच एक नियोजन असतं, ते लोक करिअरला महत्व देतात.''

''डोंबल तुमचं करिअर! अन् करिअर, करिअर असं काय नाचता! मंजुळाकाकू फणकाऱ्याने म्हणाल्या. पुढे त्या म्हणाल्या आम्ही सुध्दा करिअर करतो. आमचंही वर्षभराचं नियोजन असतं. उन्हाळ्यात कुरडया, पापड्या, पापड, खारोड्या, वडे, शेवया, बोटवे, आमरसाच्या पोळ्या असे कितीतरी खाद्य पदार्थ आम्ही गृहिणी करतो, तसेच पहिला पाऊस पडला की बरणीभर लोणचे करतो. गौरी, गणपती, नवरात्र, दिवाळी, पाडवा, वर्षाच्या पौर्णिमा, आषाढी, कार्तिकी असे सर्व सण उत्सव साजरे करतो रितरिवाज पाळतो. हा सुद्धा एक करिअरचा भाग आहे ना?

सीतारामपंत मध्येच म्हणाले, ''करिअरचा आहे पण बीन पैशाचा आहे.''

तुम्हाला फक्त पैसाच दिसतो, आमचं काम दिसत नाही, मंजुळाकाकू फणफणत, पाय आपटत त्यांच्या खोलीत निघून जातात. त्यांचा चांगलाच विरस होतो, त्या पलंगावर डोळे बंद करून बसून राहतात. त्यांना झोप येत नाही. त्यांना त्यांचा पहिला धोंडामास आठवतो. त्या आठवणी चलचित्ररूपाने त्यांच्या डोळ्यासमोरून सरकू लागतात.

त्यांच्या पहिल्या अधिकमासाला काकूंच्या वडिलांनी त्यांना उभयतांना मूळ लाऊन घरी नेले होते. पंतांनी चांगली चार दिवसाची सुटी काढली होती.

बाबांनी आपल्या पसंतीची पैठणी घेण्यासाठी पैठणीच्या मोठ्या शोरूममध्ये घेऊन गेले होते.

शोरुममध्ये कितीतरी रंगांच्या व किंमतीच्या पैठण्या होत्या. पदरावर मोठे मोर छोटे मोर, अंबाकलर, हिरवा मोरपंखी, चिंतामणी कलर

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

त्यावेळी आपल्याला कोणती पैठणी निवडावी हेच सुचेना. शेवटी पंतांनी चिंतामणी कलरची पैठणी पसंत केली. बाबांनी सर्वांना कपडे केले.

दुसऱ्या दिवशी आईने चांदीचे ताट, दोन वाट्या, एक फुलपात्र, दोन निरांजण घेतली. पंतांसाठी एक मुदी व छोटया ममतासाठी एक ग्रॅमची मुदी घेतली.

धोंडजेवणाच्या दिवशी आपल्या आईने पुरणा–वरणाचा सैपाक केला होता. तळण काढले होते. ३३ पुरणाचे धोंडे, ३३ अनारसे, बत्ताशे आधीच तयार ठेवले होते.

दुपारी पंगत बसली होती, रांगोळ्या काढल्या होत्या, उदबत्त्या लावल्या होत्या. एकापाटावर मी बसले होते. माझ्या उजव्या बाजूला हे बसले होते. आईने सर्वांना मेहूण सांगीतले होते. दादा–वहिनी, मामा–मामी, काका–काकू सर्व जेवावयास बसले होते.

वहिनी, मामी, काकू यांनी उखाणे घेतले, मी ही एक लांबलचक उखाणा घेतला. आई–बाबांनी आग्रह करून करून जेवू घातले. एक उत्साहवर्धक आणि आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.

जेवणे झाल्यावर आम्हा दोघांना कपड्याचा आहेर केला यांना छोट्या ममतास मुदी दिली. चांदीच्या ताटात ३३ पुरणाचे धोंडे, ३३ अनारसे, बत्ताशे ठेवले त्यावर विणलेला रंगीत रुमाल झाकला. चांदीच्या निरांजनी लावल्या मामी, काकू, आत्या यांना पीसेस दिले. ओटी भरली. औक्षण केले.

सीतारामपंतांनी काकूच्या खांद्यावर हात ठेवला तश्या त्या आपल्या विचारातून बाहेर आल्या.

पंत म्हणाले, ''मंजुळा, असं निराश होऊ नकोस आपण काहीतरी मार्ग काढू, चल झोप आता बरीच रात्र झाली आहे.''

दुसऱ्या दिवशी मधू म्हणाला, ''बाबा, आपण अधिकमास– ऑन लाईनने साजरा करू, मी सर्व व्यवस्था करतो, फक्त त्यासाठी आईची तयारी असायला हवी.''

सीतारामपंतांनी व मधूने मंजुळा काकूस सर्व व्यवस्थित समाजावून सांगीतले, परंतु काकू काही तयार होत नव्हत्या. त्यांनी एक स्वप्न रंगवून ठेवले होते, तसेच त्यांनी जवळच्या नातलगांना आधीच सांगून ठेवले होते. त्यांना वाटत होते की एका दिवसासाठी का होईना जावई लेक यायला हवे होते. हो नाही मध्ये आठ–दहा दिवस निघून गेले.

सीतारामपंत व मधूने परत एकदा काकूंना सर्व समजावून सांगीतले व त्यांची समजून काढली, मंजुळाकांकूनीही बराच विचार केला व त्या ऑनलाईन धोंड्यासाठी तयार झाल्या.

दुसऱ्या दिवशी त्यांनी व पंतांनी आवश्यक ती सर्व खरेदी केली. काकूंनी अनारसे तळून ठेवले, बत्ताशे घेऊन ठेवले, पुरण पोळ्या व पुरणाचे धोंडे करून ठेवले.

मधूने रात्री ममतास फोन लावला.

मंजुळाकाकू – हॅलो ममता, आता ऑनलाईनचा बोलाबाला आहे ना? तेव्हा असे ठरले की ऑनलाईन धोंडामास साजरा करायचा. चांदीचे ताट, वाट्या, फुलपात्र, निरांजन आणून ठेवले आहे, अनारसे, पुरणपोळ्या व पुरणाचे धोंडे करून ठेवले आहे. जावईबापूंसाठी मुदी व छोट्या बाळासाठी एक ग्रॅमची मुदी घेऊन ठेवली आहे. आता फक्त कपड्याची खरेदी राहिली आहे ती उद्या करून टाकतो. काही साड्यांचे फोटो मधू व्हॉट्स ॲपवर लगेच पाठवतो. त्यामध्ये पैठण्या, इरकल, गार्डन वरेली अशा साड्यांचे फोटो आहेत तुझी पसंती कळव चांगल्या तीन–चार साड्या घेते.

ममता – अगं आई येवढी दगदग का करतेस?

इकडे मी साड्या वापरत नाही, जीन्स वापरते, तुझे जावई तेही इकडचेच ब्रॅन्डेड कपडेच वापरतात ते आम्ही घेऊ वाटल्यास तू पैसे पाठव.

मंजुळाकाकू – बरं बाई तुझ्या मनासारखं. आता माझं कोणीच ऐकत नाही. सुन आल्यावर ती काय दिवे लाविल ते देवच जाणे, बरं ते जाऊ दे सासू–सासरे तुमच्याकडे असतील तर त्यांना ही कपडे घे. धोंडा कसा दणक्यात झाला पाहिजे.

दोन दिवसानंतर सीतारामपंत व मधूने सर्व साहित्य व्यवस्थित पॅक करून कुरिअरने ममताकडे पाठऊन दिले, पैसे ही ऑनलाईन पाठवले.

अधिकमासामधील पहिल्या रविवारी धोंडजेवणाचा कार्यक्रम ठरला. संगणकाच्या स्क्रिनवर सर्व कार्यक्रम व्यवस्थित दिसेल अशी व्यवस्था मधू आणि तेथून ममताने केली होती.

येथून मंजुळाकाकू सूचना देत होत्या व त्या सूचनेप्रमाणे ममता व तिची सासू करत होत्या, आईच्या सूचनेनुसार पैठणी नेसली होती, नाकात नथ व वेणीत फुलांचा गजरा गुंफला होता, हातात हिरवा चुडा, पाटल्या बांगड्या घातल्या होत्या. चादरीची उभी घडी करून त्यावर पंगत बसली होती. ताटाभोवती रांगोळ्या काढल्या होत्या. उदबत्त्या लावल्या होत्या. ताटात वरण भात, पुरणपोळी कुरडई, पापड, भजी वाढली होती. एका वाटीत कढी तर एकावाटीत कटाची आमटी वाढली होती. इतर खाद्य पदार्थ ही वाढले होते.

ममता तू जावईबापूंच्या डाव्याबाजूस बस, तुमच्या बाजूला सासू–सासऱ्यांना बसव. पुरणपोळीवर भरपूर तूप घे. भरपूर जेऊन घ्या मी पाठविलेल्या दहा उखाण्यातील एकतरी उखाणा घे.

जेवणे झाल्यावर मंजुळा काकूंनी सूचना केली. ममता, चांदीच्या ताटात ३३ अनारसे, ३३ पुरणाचे धोंडे, बत्तासे ठेव त्यावर रंगीत रूमाल झाक. निरांजन लाव.

सासूबाईंना म्हणावं की त्यांनी माझ्यातर्फे चांदीचं ताट जावई बापूंना द्या म्हणाव. मुदी ही द्या म्हणावं, बाळाच्या बोटात मुदी घाल व औक्षण करायला सांग.

आता तुम्ही दोघे सासू सासऱ्यांना आहेर करून नमस्कार करा. मंजुळा काकूंच्या सूचनेप्रमाणे ममता व तिची सासू हे सर्व करत होत्या व संगणकाच्या स्क्रिनवर इकडे सर्व पाहत होते. सर्व कार्यक्रम व्यवस्थित व आनंदात पार पडला.

सीतारामपंत, मधू व मंजुळाकाकू आनंदीत झाले. मंजुळा काकूंना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. कारण ऑनलाईन का होईना त्यांच्या मनासारखा धोंडामास साजरा झाला होता.

***

मैथिली

शुभांगी साळवी, पुणे

आज मैथिलीला रोजच्यापेक्षा जरा लवकरच निघावं लागणार होतं. ऑफिस टाईम च्या आधी एक मीटिंग ठेवली होती... सगळ्या स्टाफ मेंबर्सनी. विषय होता ८ मार्च – जागतिक महिला दिन यावर्षी कसा साजरा करायचा... याविषयी ठरवायचं होतं... म्हणूनच मैथिलीची घाई गडबड चालू होती. पटापट काम उरकून एकदाची ती स्टॉप वर आली. कधी नव्हे ती बस पण आज तिला लगेचच मिळाली. बस मध्ये चढून सीटवर स्थानापन्न झाल्यावर तिला अगदी हुश्य झालं! आता पुढची पन्नास मिनिटं शांतपणे खिडकी बाहेर बघत प्रवास सुरू... सध्या मेट्रोच्या कामामुळे वाहतूक व्यवस्था बदललेली होती. सगळीच वाहने वळसा घालून जायची, त्यामुळे त्या रस्त्यावर खूपच रहदारी वाढली होती. रोजच ट्रॅफिक जाम असायचं... याची आता सवय झाली होती म्हणा. आजही नेहमीप्रमाणे मैथिली खिडकीबाहेर बघत होती आणि नेहमीप्रमाणेच मैथिलीला ''ती'' दिसली... तशी ''ती'' नेहमीच दिसते... तिला पाहण्याचा... न्याहाळण्याचा मैथिलीला नकळतपणे छंदच लागला होता!! मेट्रोच्या कामामुळे वाहतूक व्यवस्था बदलली, तेव्हापासून बस या रस्त्याने जायला लागली. काही अंतर गेल्यावर एक रेल्वे लाईन लागायची. हो एकच रुळ असणारी पटरी... तिच्यावरून एका मोठ्या कंपनीच्या अवजड सामानांची ने–आण होत असायची. दिवसातून ठराविक वेळी दोनदा ती मालगाडी वजा ट्रेन तिथून जायची. इतर वेळी नेहमीप्रमाणे इतर वाहतूक सुरळीतपणे चालू असायची. या रुळाच्या एका बाजूला कंपनीचं भलं मोठं वॉल कंपाऊंड होतं... तर दुसऱ्या बाजूला एक छोटसं खोपटे वजा पत्र्याची शेड होती. त्यातच दोन खोल्या.... एकात बरंचसं भंगार सदृश्य सामान आणि एकात ती राहते. मैथिलीला बसमधून जाताना ''ती'' नेहमीच दिसते... कधी दारासमोरच्या जागेतला कचरा काढताना... कधी तिने निगुतीने दोन–चार फुलांची झाड लावली होती... त्यांना पाणी घालताना... कधी जवळच्या छोट्याशा देवीच्या मंदिराची साफसफाई करताना... आज तर चक्क दोन लहान मुले घेऊन त्यांच्याशी काहीतरी बोलत त्यांना खेळवत होती!!! एक मात्र खरं ती जे काही करते ते अगदी तल्लीनतेने करते... तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचं समाधान दिसतं. कोणत्याच कामाचा ती कधीच त्रागा करत नाही असं मैथिलीच्या लक्षात आलं... तिचा विचार करता करता कधी स्टॉप आला कळलंच नाही...

मीटिंगमध्ये मग एकदम जोरदार चर्चा झाली वेन्यु काय?? मेनू काय?? ड्रेस कोड काय ठरवायचा?? कोणाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचं?? जबाबदारीचे खाते वाटप कसे असेल?? एक ना दोन अगदी जोरात चर्चा रंगली... एकदाच माझी रूपरेषा ठरली!!

आज आठ मार्च संध्याकाळी सहा वाजताची कार्यक्रमाची वेळ ठरली होती. मैथिली छान सिल्कची साडी नेसली. मॅचिंग इयर रिंग्स आणि हलकासा मेकअप करून ती बाहेर पडली. खरं तर कॅब करावी का? असा विचार एकदा डोकावला तिच्या मनात.. पण नको असे म्हणून ती स्टॉप वर गेली. ऑड वेळ असल्यामुळे फारशी गर्दी नव्हती स्टँडवर. बस मिळाली आणि मैथिली तिच्या नेहमीच्या सीटवर बसली. नेहमीप्रमाणे बाहेरची दृश्य बघत प्रवास सुरू झाला आणि ''ती'' दिसण्याचा स्टॉप आला. मैथिलीने पाहिलं तर काय आज तिच्या घराचा लुकच एकदम वेगळा भासत होता!! तिचं नेहमीचं नीटनेटकं असणारं अंगण आज तर आणखीनच सुंदर दिसत होतं!! सुंदर रांगोळी काढली होती!! पताका वजा झुरमुळ्या लावल्या होत्या आणि काहीशी लगबग दिसत होती. काही छानशा कपड्यातल्या... साड्यांतल्या बायका इकडून तिकडे फिरताना दिसत होत्या. बस आज तिथे काही जास्तच वेळ थांबली होती. मैथिलीने तिला शोधण्याचा प्रयत्न केला ...पण ''ती'' दिसली नाही. मैथिलीच्या मनात कुतुहल जागं झालं आणि पुढच्याच क्षणी मैथिली बस मधून खाली उतरली. थोडं अंतर पार करून मैथिली तिच्या अंगणात पोहोचली आणि जवळच्याच एका बाकड्यावर बसली. आता मैथिलीला ''ती'' दिसली. नेहमीसारखीच प्रसन्न... समाधानी चेहऱ्याने वावरताना ती सगळ्या बायकांना डिश मधून खायला देत होती... मस्त मोगऱ्याच्या गजराचा वास येत होता... ते सगळ्या एकमेकींना देत होत्या... त्या चौदा–पंधरा जणी अगदी दिलखुलासपणे गप्पा मारत होत्या!!! हसत होत्या! इतक्यात तिने मैथिलीला पाहिलं आणि ती एक गजरा घेऊन मैथिलीकडे आली. तिने मैथिलीला हसून तो गजरा दिला... अगदी जुनी ओळख असल्यासारखा... मग स्वतःच बोलायला लागली, ''मॅडम... आज आठ मार्च ना!!! बायकांचा दिवस... मग मीच ठरवलं की या सगळ्या पोरींना आपण आज पार्टी द्यायची!! सतत... वर्षभर कामाने लय पिचलेल्या असतात या... तेवढेच सुखाचे चार क्षण त्यांना मिळतील... या सगळ्या आसपासच्या एरियात जाऊन भंगार गोळा करतात... मग मीच तो सगळा इथं ठेवून घेते... ठेकेदार येतो गाडी घेऊन आणि समदा नेतो उचलून. रोख पैसे देतो. त्या सगळ्या वाटून घेतात. आपापल्या मालानुसार... त्या कुठं कुठं फिरणार ना... एकाच जागेवर होतंय काम ... आणि काईजणींची पोरं पण आहेत लहान... मी बघते त्यांच्याकडं... माझ्या भरोशावर ठेवून बिनघोर जातात त्या कामावर... काहीजणी पलीकडच्या बिल्डिंगमध्ये जातात बघा... धुन्या भांड्याची कामं करायला... त्यांच्या पण पोरांना मी बघते इथं. शाळेतून आली की थांबतात इथं पोरं... संध्याकाळी आपल्या त्या घेऊन जातात त्यांच्या घरी... मला कळायला लागलं ना तेव्हापासून मी आणि आज्जी आम्ही दोघीजणी इथे राहतो. मी शाळा पण शिकली आहे बर का सातवीपर्यंत!!! माझी आज्जी गेली मरून... आजीने तेव्हा सांगितलं होतं कष्टाला घाबरायचं नाही... आणि कष्ट करून आपण जर पैसा कमवत असेल तर आपल्याला कोणाला घाबरायचं कारण नाही... मग तेव्हापासून मी इथेच राहते एकटी आणि... आणि या आहेत कि सगळ्या माझ्या मैत्रिणी...'' असं भडभडून ती काही बाही सांगत होती... आणि मैथिली विचार करत होती की खरा ८ मार्च महिला दिन साजरा होतोय... तो कुठला?? आपण ठरवलेला?? की हिने आपल्या इवल्याशा मिळकतीतून आपल्या नात्यागोत्यातल्या नसणाऱ्या या बायकांसाठी छोटासा खाऊ आणून त्यांचं तोंड गोड केलंय... गजरा देऊन त्यांचा आजचा क्षण सुगंधीत केलाय... तो खरा महिला दिन!!??? आजच का... ''ती'' तर वर्षभर तो महिला दिन साजरा करत असते... आणि... आणि तिच्या या कृतीचा निखळ आनंद फक्त ''ती'' च्याच नाही तर या सगळ्या बायकांच्या चेहऱ्यावर... कदाचित त्यांच्या आयुष्यात पसरून राहिलाय!!! मैथिली विचार करत होती... वेळेचं भान नव्हतं... सूर्य मावळतीला निघाला होता... आणि आणि... मैथिलीचा मोबाईल फोन खणखणत होता... तसाच... बराच वेळ!!

***

अहंकार हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.

संघर्ष

के. एन. मोरे, यवतमाळ

कोकिळेच्या मंजुळ सुरांनी, फुलांच्या हळूवार सुंगधानी आणि सुर्याच्या कोमल किरणांनी मार्च महिन्यातील ८ मार्च महिला दिन ह्या आंतरराष्ट्रीय महिलादिना निमित्ताने मी डॉ. आशा आपले सर्वांचे सहर्ष स्वागत करत आहे.

कु. आशा महारु हिवरकर अकोला येथून लग्न होऊन सौ. आशा किसनराव सोनोने या नावाने २ जून १९७८ ला मौजे व्याळा ता. बाळापूर येथे आली. डॉ. किसनराव सोनोने त्याचे पती. त्याचा प्रायव्हेट दवाखाना मौजे आसेगाव ता. मंगरुळपिर, जि. अकोला येथे होता. घर संसार हाच मुख्य उद्देश होता. लग्न झाले त्यावेळी १० वी पास केलेला होता परंतु शिकण्याची जिद्द तिला स्वस्थ बसू देत नव्हती. पुढील शिक्षण घ्यावे ह्या साठी सासरची सर्व मंडळी तयार होती. विशेष म्हणजे पती किसनराव यांनी पुढाकार घेऊन तिला ११ वी १२ वी शिक्षण करवून घेतले. हा अभ्यास तिने घरुनच मुक्त विद्यापिठामधून केला. पतीकडून मिळालेले प्रचंड प्रोत्साहन त्या मधून निर्माण झालेली प्रचंड आवड, परिस्थितीमध्ये खचून निराश होऊन न जाता तिने स्वतःच आपल्या कलानिर्मितीला लागली. स्व–अभ्यास, अवलोकन, समाजाचे निरिक्षण, अनुभव स्वतःच्या मनातील कल्पना अशी एकलव्याप्रमाणे ती शिकत गेली. कलाच कलेचा गुरु या न्यायाने ती स्वतःची गुरु झाली आणि शिकत गेली.

खऱ्या अर्थाने तिचे आयुष्यच बदलले. सोबतच तिला डॉ. करावयाचे असे पती डॉ. किसनराव यांचे स्वप्न होते आणि तिला पुसद जि. यवतमाळ येथे डि.एच.एम.एस. साठी प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. त्यानंतर ची ३ वर्ष जिल्हा अकोला येथे काढली आणि अधिक परिश्रमानंतर १९८३ या वर्षी पूर्वीची आशा हिवरकर हिला डॉ. आशा किसनराव सोनोने या नावाने पदवी मिळून प्रसिद्धी मिळाली.

लहानपणापासूनच तिला विविध खेळामध्ये खेळण्याची आवड होती. कबड्डी खेळाची विशेष आवड होती. विदर्भ क्रिया मंडळचे वतीने नागपूर–पुणे या ठिकाणी कबड्डीचे सामने जिंकून सुवर्ण चषक हि मिळविले. त्याचप्रमाणे अकोला येथे शिकत असताना फुटबॉल खेळाची हि आवड होती. अकोला येथे त्यावेळी भाटे ग्राऊंडवर जो फुटबॉल सामना खेळला गेला ती गोल किपर होती आणि चांगल्या गुणांनी सामना जिंकल्यानंतर आमचे सर्व मुलीची ओपन जीप मधून मिरवणूक काढली असे ति म्हणाली. त्या वेळेस तिचे भरपूर कौतुक झाले. पुरस्कार हि मिळाले आंध्रप्रदेशातील राजमेहंद्री या ठिकाणी सुद्धा तिची निवड झाल्यानंतर खेळण्याचा योग आला.

एक खंत तिचे मनात नेहमी टोचत होती जिल्हाचे शहराचे ठिकाणा मधून एकदम ग्रामीण भागामध्ये तिला सासरी राहावे लागले परंतु तिने त्यांचा विचार ही केला नाही हिंमतीने तिने पुढे जात शिखर गाठण्याचा प्रयत्न केला. ह्या कामी तिचे पती डॉ. किसनरावाची साथ तिला मिळत गेली. घरची परिस्थिती तशी बरी होती परंतु स्वकर्तृत्वावर काही तरी करून दाखवयाची जिद्द तिला भेडसावत होती. पती डॉ. किसनराव यांनी तिचे शिक्षण पूर्ण झाल्यावर ता. मगरुळपिर या तालुक्याचे ठिकाणी १९९० मध्ये स्वतःचा दवाखाना थाटला.

आणि त्या ठिकाणी पती–पत्नी दोघे ही आपली रुग्ण सेवा करु लागले. सुरवातीचे दिवस नविन ठिकाण नविनच व्यवसाय सुरवात जरा कठीणच गेली. नविन असल्या कारणाने हि सर्व माहिती गोळा करून या क्षेत्रात वाटचाल करावी असे तिला वाटत होते. या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीच्या प्रत्यक्ष भेटी तिने घेतल्या त्याचेकडे जाऊन स्वतः पाहणी केली. या कामी तिने जिद्द सोडली नाही. नेटवरून नवनविन माहिती मिळवली. अनेक व्हीडिओ पाहिले. भरपूर पुस्तक वाचन केली. यात ती पूर्णपणे निपुण झाली. त्या नंतर तिने खऱ्या अर्थाने आपला व्यवसाय जोमाने सुरु केला. ग्रामीण भागातील महिलांची सर्व प्रकारची तपासणी करणे. विशेषतः महिलाची प्रसूति नॉर्मल करणे यात तिचा हातखंडा आहे. शक्य तो पर्यंत सिझर डिलेवरी ती होऊ देत नाही. कोरोना काळामध्ये तिने ह्या भागातील महिलांची विशेष रुग्णसेवा केली. निस्वार्थीपणे संयम आणि सदाचार वृत्तीने समन्वय साधून खऱ्या अर्थाने वैदक शास्त्रात एक तज्ञ निपुण तपस्वी ठरली. म्हणतात ना जोडावी माणसे जपावी नाते – विसरून व्यवहारी फायदे तोटे. त्यांचे पती यांनी कोव्हीड–१९ या काळात शासनाचे कार्यालयात जोखमीची सेवा दिली हे सांगायला ती विसरली नाही.

ह्यानंतर तीला दोन पुत्ररत्न झाले. वैभव आणि अंकित. दोघेही इंजिनिअर असून पुणे येथे नामांकित कंपनीमध्ये नोकरीला आहेत. भविष्यात तिला लांब पल्ला गाठावयाचा आहे. खूप मोठी स्वप्न आहेत तिची. तिने आपली स्वतःची ओळख निर्माण केली आहे. तिला स्वतःचे असे विश्व तयार करावयाचे आहे. संघर्ष केल्याशिवाय कोणीही महान होत नाही. जो पर्यंत छन्नीचा घाव होत नाही दगड सुध्दा देव होत नाही हे आपण लक्षात ठेवल पाहिजे.

डॉ. आशा म्हणते, मी जीवन सुंदर रितीने जगत आहे. कुठलीही उणीव तिच्या आयुष्यात तिला जाणवत नाही. या द्वारे ती असा संदेश देते कि जेव्हा मनांत नसताना अनपेक्षितपणे काहीतरी मिळतं तेव्हा ते एकतर आपल्या चांगल्या कर्माचे फळ असते किंवा कोणाच्या तरी आशिर्वादाचे बळ असते. तसेच आयुष्यातील आनंदी क्षणासाठी पैशाने कमविलेल्या वस्तुपेक्षा स्वभावाने कमविलेली माणसं जास्त सुख देतात. काही धरायचं असत काही सोडायचं असतं, आयुष्य खूप छोट आहे, हा हा म्हणता संपून जाईल, प्रेम करायचं राहिल म्हणून शेवटी खूप प्रश्चाताप होईल. मी काही कमी नाही हा स्वाभिमान बाळगा आणि आयुष्य मानाने, सन्मानाने आणि आनंदाने जगा.

हे सगळं मी केल असं म्हणण्यापेक्षा आम्ही केलं अस म्हणा. तिच्या या सगळ्या प्रवासात तिचे पती डॉ. किसनराव सोनोने तिचे पाठीशी खंबीरपणे उभे असल्यामुळेच तिला हे करणे शक्य झाले या सर्व प्रवासाचे श्रेय ती आपल्या पतीलाच देते. पुन्हा एकदा ती म्हणाली, माझ्या घरातील, सासरकडील तसेच माहेरकडील मंडळी, नातेवाईक या सर्वांचे आभार मानायला मला आवडेल. विशेषतः माझी मुल वैभव आणि अंकित, माझी मोठी बहिण डॉ. श्रीमती त्रिवेणी नारायणराव सोनोने नसती तर माझं हे धडपडण व्यर्थच झालं असतं.

के. एन. मोरे विदर्भ प्रदेश अध्यक्ष अ. महा. कुं. स. विकास संस्था तथा कुंभश्री प्रतिनिधी यांनी घेतलेली डॉ. आशा किसनराव सोनोने हिची छोटी मुलाखत कुंभश्री अंकात देऊन तिचा सन्मान केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जय गोरोबा.

***

अहंकार हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.

राजे मॅडम यांची जिनियस् किडस् अॅबॅकस
रत्नागिरी जिल्ह्यातील अॅबॅकस क्षेत्रातील अग्रगण्य शाखा

मी सौ. अय्यर खूप खूश आहे. कारण माझी दोन्ही मुले गोकुळ आणि दिवाकर खूप छान करीअर करत आहेत. गोकुळ मोठा मुलगा आयसर मध्ये एम.एस. इंटीग्रेटेड फिजिक्समधून शिकत आहे व छोटा मुलगा दिवाकर आयआयटी मध्ये करीअर करत आहे. त्यांचा स्पर्धा परीक्षेचा पाया लहान वयातच अॅबॅकसमुळे पक्का झाला. अॅबॅकसमुळे त्यांची गणिताची कॅल्क्युलेशन खूप जलद गतीने करत होती. त्याचा या करीअरमध्ये अॅबॅकस व वैदिक मॅथ्सचा उपयोग खूपच झाला. माझे तर सर्व पालकांना सांगणे आहे. मुलांना लहान वयातच शालेय शिक्षणासोबतच अॅबॅकसचे मार्गदर्शन देणे, खूपच गरजेचे आहे. मी राजे मॅडमना खूप धन्यवाद देते त्यांच्या मार्गदर्शनामुळे मुलांना खूप फायदा झाला.

- सौ. उषा अय्यार, (गोकुळ व दिवाकरची आई)

मी श्रावणी पारठे मी एम.बी.बी.एस. मेरीट लिस्टमधून गर्व्हमेंट कॉलेज केईएम हॉस्पिटल मुंबई येथे करत आहे. या अॅबॅकस लहान वयातच इ. ३ रीला राजे मॅडमकडे चालू केले. अॅबॅकसमुळे कॅलक्युलेशन करायला सोपे गेले. त्यामुळे दहावीपर्यंत गणिताचा पेपर सोडवताना कधीही कठीण वाटला नाही. पाढे अगदी कोणताही तीन अंकी, चार अंकी सुद्धा तयार करता येत होता. अॅबॅकसमुळे गणिते फास्ट व अचूक सोडवता आली. मला नीटच्या एन्ट्रन्स एक्सामध्ये फिजिक्स सोडवताना अॅबॅकसचा उपयोग झाला. त्यामुळे माझा आत्मविश्वासही वाढला. माझी लहान बहिण सुद्धा अॅबॅकस केल्यामुळे तीन शालेय स्पर्धा परीक्षा सर्व क्रॅक केल्या. अॅबॅकसमुळे आमची एकाग्रता वाढली.

- कु. श्रावणी पारठे (एम.बी.बी.एस. विद्यार्थी)

माझा मुलगा विक्रांत याने ३ री मध्ये असताना अॅबॅकस क्लास लावला. त्याच्या आता सात लेवल पूर्ण झाल्या आहेत. यावर्षी स्कॉलरशिपचा अभ्यास करताना गणित हा विषय खूप सोपा जातो. पाढे तर त्याला अगदी तीन अंकाचे सुद्धा खूप जलद गतीने करता येतात. तसेच अॅबॅकसच्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेमध्ये अगदी चॅम्पियन ऑफ चॅम्पियनचा बहुमान मिळाला. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. आत्मविश्वास व एकाग्रता अभ्यास करण्याची आवड निर्माण झाल्यामुळे स्कॉलरशिपचा अभ्यास तो खूप छान करतो. मी स्वत: टॅक्स कन्सल्टंट असल्यामुळे आकडेमोडीचे महत्त्व काय आहे. गणितामध्ये हे समजते. मुलांनी अॅबॅकस शालेय जीवनात केलेच पाहिजे.

- श्री. सचिन साळवी, बीकॉम, डीटीएल, टॅक्स कन्सल्टंट

***

कोणतेही क्षेत्र निवडा इंजिनिअरींग, वैद्यकीय किंवा विज्ञान असो सध्याच्या स्पर्धात्मक युगात गणिताशिवाय पर्याय नाही. मुलांचा गणित विषय उत्कृष्ट होण्याबरोबरच त्यांची बौद्धिक क्षमता, एकाग्रता व आत्मविश्वास वाढणे गरजेचे आहे. या सर्वांची गरज ओळखूनच २००७ साली चिपळूण, सावर्डे, पोफळी, रामपूर,
लोटेपरशुराम या ठिकाणी सौ. राजे मॅडम ज्या स्वत: गणिताच्या शिक्षिका आहेत. त्यांनी अॅबॅकसचे मार्गदर्शन करण्यासाठी आयडियल प्ले अॅबॅकस चेन्नई या प्रा. लिमिटेड कंपनीच्या शाखा काढल्या. अॅबॅकस हा कोर्स वयोगट ६ वर्ष ते १४ वर्षातील सर्व माध्यमाच्या मुलांसाठी घेतला जातो. या अॅबॅकसच्या सर्व लेवल पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये लाखापर्यंतच्या आकड्याची अंक गणिते बेरीज वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांकाची अंक गणित विद्यार्थी संगणक व कॅल्क्युलेटर पेक्षाही जलद गतीने सोडवू शकतात. तसेच ते २ पासून ते अगदी तीन अंकी नंबरचा पाढा ही करु शकतो. पाठ करण्याची गरज भासत नाही. अॅबॅकसचे मार्गदर्शन घेवून कित्येक क्षेत्रात मुलांनी चांगली चमक दाखवली आहे.

अॅबॅकसचा कोर्स पूर्ण झाल्यानंतर मुलांमध्ये एकाग्रता येते. स्मरणशक्ती व महत्वाचा आत्मविश्वास प्रचंड वाढतो. हा अभ्यासक्रम बेसिक सहा लेवल व अॅडव्हान्सच्या चार लेवलमध्ये पूर्ण केला जातो. अॅबॅकस बरोबर वैदिक गणित जर मुलांनी शिकले तर त्यांना स्पर्धात्मक

परीक्षेसाठी खूपच फायदा होतो. आतापर्यंत या शाखांमधून हजारो विद्यार्थी शिकून गेलेत व आजही अॅबॅकसचा वापर करुन स्पर्धेमध्ये टिकून आहेत. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमात गणित हा ना आवडीचा विषय तसाच फार अवघड वाटतोय. वास्तविक पाहता गणित हा विषय प्रत्येक स्पर्धा परीक्षेसाठी महत्त्वाचा आहे. आपल्या दैनंदिन जीवनात देखील गणिताचा पदोपदी वापर करावा लागतो. त्यामुळे अशा विषयाची भीती मुलांच्या मनातून शालेय शिक्षणाच्या वेळीच लहान वयामध्ये काढली पाहिजे. त्यामुळेच अॅबॅकस हा कोर्स लहान वयागटासाठी आहे. त्यामुळे त्यांना गणित विषयाची गोडी निर्माण होईल. त्याचा शालेय वर्षातच गणिताचा पाया पक्का केला जाईल.

मी स्वत: गणिताची शिक्षिका आहे. मी एम.एससी. एम.एड. मध्ये पदवी घेतलेली आहे. १९९० पासून मी शिक्षण क्षेत्रात काम करत आहे. हे करत असतानाच २००७ रोजी गणितासारख्या विषयाला अॅबॅकस व वैदिक मॅथ्सची जोडी देवून शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा निर्णय घेतला व चिपळूणमध्ये पहिली अॅबॅकस व वैदिक मॅथ्य शिकवण्याचा क्लास काढला. मला गणित विषयाची काठिण्याता मुलांमध्ये कशाप्रकारे येते हे शिकवताना कळत होते. त्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये गणित विषय सोपा जावा. यासाठी अॅबॅकस लहान वयातच मुलांना शिकवले पाहिजे याची जाणीव पालकांनी करुन दिली. अनेक विद्यार्थी यामध्ये घडून गेले. जिनिअस किडस् अॅकॅडमीच्या शाखा सावर्डेमध्ये काढावी यासाठी स्वत: सौ. पूजा निकम मॅडम घरी येवून भेटल्या होत्या. त्यामुळे पुढे सावर्डे, डेरवण, पोकळी, रामपूर, लोटे परशुराम, घरडा कॉलनी येथे अॅबॅकसच्या शाखा काढल्या. आंतरराष्ट्रीय अॅबॅकस स्पर्धेमध्ये आमचा पहिला विद्यार्थी कु. अनिरुद्ध शेखर निकम याने मलेशिया येथील स्पर्धेत भाग घेवून नंबर पटकावला. आजच्या क्षणाला या संस्थेला १५ वर्षे पूर्ण होत आहेत. अॅबॅकस मार्फत विद्यार्थ्यांना असेच पुढे चांगले मार्गदर्शन देण्याचा सौ. राजे मॅडम यांचा मानस.

***

आयुष्यात खरं प्रेम, खरी माया फार दूर्मिळ असते.

मंडप व्यवसायातून कुटुंबासाठी उभ्या राहिल्या सुरेखाताई

कुटुंबाच्या जडणघडणीत आयुष्यात आलेल्या गरिबीतूनही मुलांसाठी भक्कम आधार होत, तिचं कुटुंब परिस्थितीशी झगडत होतं. भूमिहीन असलेल्या कुटुंबातूनही दुसऱ्याकडे मजुरी करत जमलेल्या तुटपुंज्या पुंजीतून मंडप व्यवसाय सुरू केला. कुटुंबाची वाट भक्कम करण्यासाठी प्रयत्न करत असतानाच नियतीनं पतीचं छत्र हिरावून नेलं. अशाही परिस्थितीत मुलांसाठी आधार बनत मंडप व्यवसायातून कुटुंबाला सावरत खचलेल्या महिलांसाठी आधार बनल्यात, त्या लोणवाडी (ता. निफाड) येथील **सुरेखाताई रोकडे.**

खानदेशातील चाळीसगाव तालुक्यातील तळवाडे येथील छोटूलाल व बेबीबाई पवार यांना चार मुली आणि मुलगा, पवार दांपत्याच्या सुरेखाताई ज्येष्ठ कन्या. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सुरेखाताई घरात मोठ्या. सुरेखाताईचे शिक्षण बारावीपर्यंत. कुटुंबाची जबाबदारी पार पाडत असताना वडिलांनी २ हजारमध्ये विवाहाची जबाबदारी पार पाडल्याने सुरेखाताईंना पुढे शिकता आले नाही.

निफाड तालुक्यातील नारायणटेंभी येथील विठ्ठल काशीनाथ रोकडे यांच्याशी सुरेखाताईचा विवाह झाला. पती विठ्ठल रोकडे यांचेही शिक्षण जेमतेम दहावी. सासरीही परिस्थिती जेमतेमच. मोलमजुरीशिवाय पर्याय नसलेल्या रोकडे कुटुंबातील सदस्यसंख्याही मोठी. विठ्ठल रोकडे घरातील कर्ते. मात्र चारही भावंडांना मजुरीसाठी बाहेर जावे लागत होते.

गाव सुटले. परिस्थितीने खचून गेलेल्या कुटुंबाला दोन वेळच्या भाकरीसाठी न चुकता इतरांच्या शेतावर जावे लागत होते. यातच काहीतरी चांगले व्हावे, यासाठी सुरेखाताई पतीसह जवळच असलेल्या लोणवादी या गावी मजुरीसाठी स्थलांतरित झाल्या. समोर अंधार... परिस्थिती सुधारेल याची सुतरामही शक्यता नसताना पतीला खचून न जाऊ देता आधार देत सुरेखाताई आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जात होत्या. यातच मुलगा हर्षल आणि मुलगी सुनीता यांच्यामुळे कुटुंब चौकोनी बनले. आयुष्यातला वाटेला आलेलं दारिद्र्य पाठ सोडत नाही, याची सुरेखाताईंना जाणीव असल्याने त्यांनी मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले.

व्यवसायाची वाट मिळाली

लोणवाडी आणि पंचक्रोशीतील मंडप आणि सामग्रीची गरज ओळखून मजुरीतून मिळालेल्या पैशांतून मंडपाचे साहित्य खरेदी केले. येथूनच खऱ्या अर्थाने कुटुंबाच्या प्रगतीला सुरवात झाली. पती विठ्ठल रोकडे मंडप व्यवसायाकडे लक्ष पुरवत असताना सुरेखाताईंनीही याच जोडीला गाव आणि परिसरात लहान-लहान कार्यक्रमांसाठी केटरिंगची कामे घेण्यास सुरवात केली. कुटुंबाला अनेकदा खचून जाण्याचे प्रसंग आलेले असताना सुरेखाताईंनी पतीच्या मागे भक्कम उभे राहत पाठबळ दिले.

आधार कोसळला

रोकडे कुटुंबाला आर्थिक आधार देत असतानाच मुलांच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष होऊ दिले नाही. मंडप आणि केटरिंग व्यवसायामुळे कुटुंब सावरत असतानाच पतीच्या अकाली निधनाने मात्र कुटुंबावर नियतीनं पुन्हा दुःख दिलं. पतीच्या अकाली जाण्याने मुलांचा आधार होणे गरजेचे असल्याने त्यांनी कुटुंबाचा प्रमुख म्हणून जबाबदारी स्वतःकडे घेतली. या काळात माहेरच्या मंडळींसह रोकडे कुटुंबातील सदस्यांनी दिलेला आधार खूप मोलाचा असल्याचे सांगताना त्यांचे डोळे पाणावले.

संकटातून बाहेर पडल्या

विठ्ठल रोकडे यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढताना केटरिंग व्यवसायासोबतच मंडप व्यवसायाला पुढे नेण्यासाठी त्यांनी कंबर कसली. एखाद्या महिलेने मंडप व्यवसायाला पुढे नेत तो यशस्वी करून दाखवताना मिळवलेल्या यशाच्या सुरेखाताई मानकरी ठरल्या आहेत. कुटुंबावर आलेल्या संकटातून स्वतःला सावरतानाच मुलगा हर्षल आणि मुलगी यांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवत असतानाच हर्षलचीही सुरेखाताईंना मदत होत आहे. हर्षल सध्या बारावीत असून, मुलगी तमिळनाडू येथे एरोनॉटिक्स इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण करत आहे.

मुलाने व्यवसायात पुढे यावे

सध्याच्या स्पर्धेच्या युगात नोकऱ्या मिळणे कठीण असल्याने मुलाने इव्हेंट मॅनेजमेंटचे शिक्षण पूर्ण करत आईने पुढे नेलेला व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत पुढे न्यावे, असेही सांगायला त्या विसरल्या नाहीत. कुटुंबावर कधी कोणती परिस्थिती उद्भवेल, हे कोणीही सांगू शकत नाही. काळाची पावले ओळखून महिलांनी स्वतःला सिद्ध करतानाच कुटुंबाचा आधार होताना व्यवसायाकडे वळावे. जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. मात्र त्यासाठी इच्छाशक्ती प्रबळ असायला हवी, हेच सुरेखाताईंनी पतीच्या निधनानंतर उभ्या केलेल्या व्यवसायातून सिद्ध करून दाखवले आहे.

***

यशस्वी होण्याचा एकच उत्तम पर्याय आहे, दुसऱ्याच भल झालेले पाहण्याची ताकद आपल्या मनात असली पाहिजे.

देशातील पहिले महिला गॅरेज

-संकलन : मोतीलाल भागवत, पुणे

इंदूर : नोकरी असो वा व्यवसाय आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. मग ते काम इनडोअर असो किंवा आउटडोअर. अगदी पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या व्यवसायातही महिला समान भूमिका बजावत आत्मनिर्भर बनत आहेत. यातीलच आणखी एक उदाहरण म्हणजे औद्योगिक शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदूरमधील यांत्रिका गॅरेज. कारण हे गॅरेज कोणी पुरुष नाही तर महिला चालवतात. गाडीचे इंजिन उघडून पिस्टोनमधली गडबड दूर करण्यापासून गिअरमध्ये झालेले बिघाड दुरुस्त करणे ही सगळीच कामे या महिला मॅकेनिक करतात. राजेंद्र देशबंधू हे या महिलांना गॅरेजच्या कामाचे धडे देतात. देशातील पहिले महिला मेकॅनिक गॅरेज सुरु करण्याचे श्रेय राजेंद्र यांना जाते.

जीवनात घडलेली घटना ठरली प्रेरणा : सामाजिक कार्यकर्ते असणाऱ्या राजेंद्र देशबंधू यांच्या सोबत एक घटना घडली, ज्यामुळे या यांत्रिक गॅरेजची स्थापना झाली. राजेंद्र यांनी सांगितले की, एकदा माझ्या गाडीचा क्लच लीव्हर तुटला. ती दुरुस्त करण्यासाठी मी एका गॅरेजमध्ये पोहोचलो. गॅरेजमध्ये एक १५ ते १६ वर्षाचा मुलगा काम करत होता. जो दिवसाला ५०० रुपये या अर्थाने महिन्याला १५,०००/- रुपये कमवत होता. त्याच रस्त्यावर एक महिला झाडू मारत होती. जिला आसपासच्या दुकानात झाडू मारून महिना ३००० रुपये हातात मिळायचे. आता तसं पाहिले तर दोघांचे सुद्धा शिक्षण पाचवीपर्यंतचे. पण कमाईत मोठी तफावत होती. आणि यामागचे मोठे कारण म्हणजे स्त्री-पुरुष यातला फरक. राजेंद्र यांच्या म्हणण्यानुसार दोघांची शैक्षणिक पातळी जरी सारखी असली तरी मुलाकडे तांत्रिक ज्ञान होते तर महिलेला नव्हते. हीच गोष्ट त्यांच्या मनाला खटकली. तेव्हापासून त्यांनी महिलेला कुशल बनवण्याचा निर्णय घेतला. याच प्रयत्नातून त्यांनी महिला मेकॅनिकसाठी प्रशिक्षण सुरू करण्यात आले.

प्रथम विरोधच : जानेवारी २०२० पासून महिला मेकॅनिक गॅरेज सुरू झाले. आधी लोकांना ऐकायला आणि पाहायला थोडे वेगळे वाटले. अनेकांचे टोमणे खायला लागले. बायकांना गाड्यांमधले काय कळते, त्यांना कुठे हे काम धड जमणारे, असे बोलत लोक इथे येणे टाळत होते. पण आता ग्राहकांची गर्दी वाढत आहे. त्यात लॉकडाऊनमुळे हे काम थांबले होते. बऱ्याच महिला शहर सोडून आपल्या मूळ गावी गेल्या, पण आता ते पुन्हा सुरु झाले आहे.

१९० महिलांना प्रशिक्षण : लॉकडाऊनपूर्वी जवळपास १९० महिलांना मेकॅनिकचे प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यापैकी ४० महिलांना सर्व्हिस सेंटरवर जोडण्यात आले. इंदूरमध्ये सध्या ३० महिला स्वतंत्र सर्व्हिस सेंटरवर कार्यरत आहेत. त्याचबरोबर यांत्रिकाच्या पिपलियाहाना आणि पालडा सर्व्हिस सेंटरवरसुद्धा रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

***

तुमचा जीवनसाथी कोण आहे ?

-सौ. शुभदा गंगाधर जाधव, चिंचवडगाव

आई ?, बाबा ?, बायको ?, मुलगा ?
पती ?, मुलगी ?, मित्र ?
अजिबात नाही !

तुमचा खरा जीवनसाथी तुमचे शरीर आहे. एकदा का तुमच्या शरीराचे प्रतिसाद देणे थांबले की तुमच्यासोबत कोणीही नसते. तुम्ही आणि तुमचे शरीर जन्मापासून मरेपर्यंत एकत्र राहता. तुम्ही तुमच्या शरीरासाठी काय करता ते तुमची जबाबदारी आहे आणि ती तुमच्याकडे परत येईल.

तुम्ही तुमच्या शरीराची जितकी काळजी घ्याल तितके तुमचे शरीर ही तुमची काळजी घेईल.

तुम्ही काय खाता, तंदुरुस्त राहण्यासाठी तुम्ही काय करता, तुम्ही तणावाचा सामना कसा करता, तुम्ही त्याला किती विश्रांती देता; त्यावर तुमचे शरीर कसे प्रतिसाद देईल ते ठरवेल.

लक्षात ठेवा, तुमचे शरीर हा तुमचा एकमेव कायमचा पत्ता आहे जिथे तुम्ही राहता.

तुमचे शरीर ही तुमची मालमत्ता/दायित्व आहे, जी इतर कोणीही शेअर करू शकत नाही. तुमचे शरीर ही तुमची जबाबदारी आहे. कारण तुम्हीच खऱ्या आयुष्यातील जोडीदार आहात.

तंदुरुस्त रहा. स्वतःची काळजी घ्या. पैसा येतो आणि जातो. नातेवाईक आणि मित्र हे कायमस्वरूपी नसतात.

लक्षात ठेवा, तुमच्याशिवाय तुमच्या शरीराला कोणीही मदत करू शकत नाही.

फुफ्फुसांसाठी- प्राणायाम, मनासाठी- ध्यान, शरीरासाठी-योगा, हृदयासाठी- चालणे, आतड्यांसाठी- चांगले अन्न, आत्म्यासाठी- चांगले विचार आणि जगासाठी चांगले कर्म.

***

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

स्तनांचे स्वपरिक्षण; जनजागृती, दृष्टीकोन आणि भारतातील परिस्थिती

डॉ. प्रकाश देवडे
एमडी, डीएम, वरिष्ठ कर्करोगतज्ञ,
मुंबई ऑन्कोकेअर, औरंगाबाद

अज्ञानात सुख आहे; ही आपल्या समाजात खोलवर रुजलेली धारणा, त्यातून उद्भवणारी दुर्लक्ष करण्याची वृत्ती आणि दुर्लक्ष केल्याने जीवावर बेतल्याचे प्रसंग आपल्या परिचयाचे आहेतच.

स्तनांचा कर्करोग म्हणजे शरीरबाह्य अवयवात होणारा आजार. हा शरीरांतर्गत अवयवांच्या आजारांपेक्षा सोयीस्करपणे वेगळा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्तनांचा कर्करोग शरीरात विकसीत होत असताना त्याची वाढ किंवा लक्षणं ही दृष्टीक्षेपात येणं किंवा स्पर्शास जाणवणं ही त्यातील सोयीस्कर बाब! शरीरांतर्गत कर्करोगांच्या बाबतीत, 'उशीरा निदान'; हे या युक्तिवादामार्फत आपण काही अंशी स्विकारु शकतो; त्या अर्थी स्तनांच्या कर्करोगांचे निदान सुरुवातीच्या टप्प्यात होणे अपेक्षित आहे. उलटपक्षी आमच्याकडे येणारे स्तनांच्या कर्करोगाचे रुग्ण हे आजही तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात आढळतात. या मागची मूळ कारणं समजून घेणं ही काळाची गरज आहे.

सुरुवातीच्या स्पष्ट लक्षणांना फार महत्त्व न देण्याची दोन संभाव्य कारणं असू शकतात. पहिलं म्हणजे 'अज्ञान' आणि दुसरं म्हणजे 'दुर्लक्ष करण्याची वृत्ती'. या दोन्ही कारणांच्या मुळाशी आहे तो आपला आयुष्याकडे पाहण्याचा एकंदर दृष्टीकोन.

आधूनिक युगात यशाच्या शर्यतीत वेळेचा अभाव असणं ही सामान्य बाब असली तरी आपल्या शरीरात होणाऱ्या असामान्य व घातक बदलांकडे लक्ष देण्यास वेळ नसणे यापेक्षा दुर्दैवी काहीच नाही. शरीरबाह्य अवयवांमधील बदल स्पष्ट लक्षात येऊनही दृष्टीआड केले जाणे हा अक्षम्य गुन्हाचं म्हणावं लागेल. ही परिस्थीती बदलण्याकरता गरज आहे एका प्रगतीशील मानसिक परिवर्तनाची. त्यातूनच शरीरातील घातक बदलांचा शोध घेण्याची, दृष्टीआड न करण्याची आणि वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्याची सवय अंगवळणी पडू शकेल.

भारतीय स्त्रियांमध्ये जीवनरुपी गौणत्वाचा इतिहास आहे. त्यामुळे प्रामुख्याने कौटुंबिक व व्यावसायिक जवाबदाऱ्यांचे ओझे वाहत असताना स्वतःच्या प्रकृती अस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करणं ही पध्दत प्रचलित आहे. परंतू वरील नमूद मानसिक परिवर्तनातून ही दुर्लक्ष करण्याची वृत्ती मोडकळीस येणं गरजेच आहे. कारण असं दुर्लक्ष त्यांची तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यातील स्तनांच्या कर्करोगाकडे वाटचाल करणारं आहे.

''मला कामातून डोकं वर काढायला वेळ नाही!'', ''कौटुंबिक जबाबदाऱ्या संपतच नाहीत!'', ''कॉर्पोरेट आयुष्य म्हणजे नर्क जणू; मी बारा महिने चोवीस तास कामास जुंपलेली आहे!'', ''मला स्वतःची वेळ अशी उरलीच नाहीये!'' अशा अनेक कारणांची यादी विचारणा करता हजर होते. या कारणांमागे काही अंशी सत्य असेलही पण बरेचदा या कारणांच्या आधारे स्तनांच्या कर्करोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष झाल्याचा कांगावा केला जातो. या विषयावर इतकं विश्लेषण करण्याची गरज काय असा प्रश्न येणं फार स्वाभाविक आहे. भारतात स्तनांच्या कर्करोगाचे दरवर्षी २ लाखांहून अधिक रुग्ण सापडतात. त्यातील ६०%–७०% स्त्रीयांचं तिसऱ्या/चौथ्या टप्प्यात निदान होत. वाढत्या रुग्णसंखेची अनेक कारणं आहेत. जीवनशैलीचं पाश्चात्तिकरणं, धुम्रपान आणि मद्यपानाचं स्त्रियांमधील वाढत प्रमाण, वयाच्या तीशीनंतर होणारी बाळंतपणं, स्तनपान पुरेस न करणं अशी अनेक कारणं आहेत.

अलिकडे तीस व चाळीस वयोगटातील तरुण स्त्रीयाही स्तनांच्या कर्करोगास बळी पडत आहेत. तिसऱ्या चौथ्या टप्प्यातील कर्करोगांवर कार्यक्षम पद्धतीने उपचार करता येत असले तरीही पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यातील उपचारांच्या तुलनेत रुग्णांकरता इच्छित परिणाम नेहमीच साध्य करणं कठीण आहे. उपचार व रोगमुक्त होण्याच्या दृष्टीने सुरुवातीच्या टप्प्यात स्तनांच्या कर्करोगाचं निदान होणे यापेक्षा सोयीस्कर काहीच नाही.

दिनांक ८ मार्च २०२३, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मी सर्व माता व भगिनींना स्तनांच्या कर्करोगाच्या वेळीच निदानासंबंधी एक कानमंत्र देऊ इच्छितो. स्तनांचे स्वपरिक्षण ही स्तनांमधील असामान्य बदल ओळखण्यासाठी उपलब्ध असणारी प्राथमिक, खर्चहीन, वैद्यकिय क्षेत्रात सर्वमान्य आणि कार्यक्षम पध्दत आहे. स्वपरिक्षण योग्य रीत्या केल्यास स्तनांमधील असामान्य व घातक बदल ओळखण्यास आणि वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्यास मदत होते. या प्रक्रियेस ५ मिनीटांहून अधिक वेळ लागत नाही आणि ही चाचणी महिन्यातून एकदा केली जाणे अपेक्षित आहे. मासिक पाळी होऊन गेल्यानंतर स्तनांचे स्वपरिक्षण केल्यास अधिक फायदा होऊ शकतो. ज्या स्त्रीयांच्या कुटुंबात कर्करोगाचा अनुवांशिक इतिहास आहे त्यांनी स्तनांचे स्वपरिक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. स्तनांचे स्वपरिक्षण कसे करावे याबद्दल सविस्तर माहिती एमओसीच्या औरंगाबाद शाखेत तज्ञांमार्फत मोफत उपलब्ध केलेली आहे.

स्तनांच्या स्वपरिक्षणादरम्यान काय पहालं?

१) स्तनांमधे दिसणारी गाठ २) तळहातास किंवा बोटांना जाणवणारी स्तनांतील गाठ ३) काखेतील गाठ किंवा सूज ४) निपल (स्तनाग्र) आत ओढले जाणे ५) निपलमधून (स्तनाग्रांतून होणारा पिवळा स्त्राव किंवा रक्तस्त्राव) ६) स्तनांच्या त्वचेतील बदल, पुरळ, डाग इ. ७) स्तनांच्या आकारात दिसून येणारी विषमता

यापैकी कोणतेही लक्षण आढळल्यास दिरंगाई न करता वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. सर्वांत व्यस्त स्त्रीयांकरीताही महिन्यातून ५ मिनीटं स्वतःच्या आरोग्यसाठी देणं फारसं अवघड नसावे!

***

तंदुरुस्ती : १० मिनिटे चालणेसुद्धा लाभदायक

नियमित चालण्याचा आपल्या शरीराला कसा होतो फायदा?

चयापचय गतिमान करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे चालणे. ताशी ८ किमी किंवा त्याहून अधिक वेगाने चालल्याने अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होतो. विशेष म्हणजे १० मिनिटांच्या चालण्याचाही शरीराला फायदा होतो. दररोज ६० मिनिटे चालण्याचे शरीराला वेगवेगळे फायदे होतात.

१० मिनिटे चालणे : साखर नियंत्रित होते

नियमित १० मिनिटांच्या चालण्यामुळे फास्टिंग आणि पोस्टमील ब्लड ग्लुकोज सुधारते. रात्रीच्या जेवणानंतर ते जास्त फायदेशीर आहे. टाइप-२ मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी दररोज किमान ५००० पावले चालणे आवश्यक आहे. यामध्ये ३००० स्टेप्स ब्रिस्क वॉक म्हणजे गाणे गाता न येण्याएवढ्या वेगाने.

२० मि. चालणे : वृद्धत्व प्रक्रिया मंदावते

दिवसातून २० मिनिटे वेगवान चालण्यामुळे मायटोकॉंड्रियाच्या कार्यामध्ये तीव्र सुधारणा होते. मायटोकॉंड्रिया शरीर आणि विविध अवयवांना ९०% ऊर्जा प्रदान करते. यामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. रक्तदाब, कोलेस्टेरॉल व मधुमेह या हृदयाला हानिकारक घटकांत सुधारणा होते.

३० मि. चालणे : प्रतिकारशक्ती वाढते

शरीराचे संरक्षण करणाऱ्या बी-सेल्स, टी-सेल्स आणि किलर सेल्सची सक्रियता वाढते. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. चालताना आकुंचन आणि प्रसरण पावणारे स्नायू पायांमधील नसांवर दबाव टाकतात, त्यामुळे वेगवेगळ्या अवयवांमध्ये रक्तप्रवाह वाहू लागतो.

४० मि. चालणे : तणाव कमी होतो

३ मैल प्रतितास या वेगाने ४० मिनिटे चालणे आपल्या शरीरातील तणाव संप्रेरक कार्टिसोलची पातळी कमी करतेच, पण मेलाटोनिनसारख्या स्लीप हार्मोन्सची पातळीदेखील वाढवते. यामुळे चांगली झोप येते. तणाव कमी होतो. याशिवाय स्नायूही मजबूत होतात.

१० मैल आठवड्याला चालण्याने सरासरी व्यक्ती २२६ किलो कार्बन डाय ऑक्साइडचे उत्सर्जन थांबवते.

४२९७ पावले एक भारतीय दिवसाला सरासरी चालतो, हे ४९६१ या जागतिक सरासरीपेक्षा कमी आहे.

डॉ. उपाली नंदा – एमबीबीएस, डीएनबी, एमएनएएमएस कन्सल्टंट, इंटर्नल मेडिसिन, मेडोर हॉस्पिटल, नवी दिल्ली

५० मि. चालणे : वजन वेगाने घटते

४ मैल प्रतितास वेगाने चालल्यास ८० किलो वजनाची एखादी व्यक्ती ५० मिनिटांमध्ये सुमारे ३५०-४०० कॅलरीज बर्न करु शकते. आपण दररोज ५०० कॅलरीज जास्त जाळल्या आणि आहार नियंत्रणात ठेवला तर महिन्याभरात १.५ किलोपर्यंत वजन कमी करता येते.

६० मि. चालणे : सरासरी आयुर्मान वाढते

दररोज ६० मिनिटे चालण्याने मेंदू आणि मज्जातंतू दोन्ही शांत होऊन छोटे-छोटे विचार करण्याची क्षमता वाढते. हे व्यक्तीला रणनीतिक दृष्ट्या समृद्ध करते, त्यामुळे सर्जनशीलता वाढते. ६० मिनिटांच्या चालण्याने शरीराच्या जवळजवळ सर्व भागांना फायदा होतो, त्यामुळे सरासरी आयुर्मान वाढते.

***

मानसशास्त्राच्या जपानी प्रोफेसराने आश्चर्यकारक संशोधन केलेले आहे

– संकलक : सौ. वंदना कुंभार

कोणत्याही रोगाचे खरे कारण

आत्मिक : ५०%, मानसिक : २५%, सामाजिक : १५% , शारीरिक : १०%

१) आम्लता ही फक्त आहार त्रुटीमुळे होत नसून, अधिक मानसिक तणावामुळे वाढते. २) हायपरटेन्शन केवळ खारट पदार्थ जास्त म्हणून होत नाही, तर प्रामुख्याने स्वतःच्या भावनांचे व्यवस्थापन नीट न केल्याने होते. ३) कोलेस्टरॉल केवळ फॅटी पदार्थां मुळेच वाढत नाही, त्याला अति आळस जबाबदार आहे. ४) दमा होण्याचं कारण फुफ्फुसाला ऑक्सिजनचा कमी पुरवठा होतो हे कारण नाही, तर नेहमी स्वतःची दुःखी भावना फुफ्फुसांना कमकुवत बनवते. ५) मधुमेह केवळ ग्लुकोजच्या अति उपयोगामुळेच नव्हे, तर व्यक्तींची स्वार्थी आणि हट्टी वृत्ती स्वादुपिंडाच्या कार्यामध्ये अडथळा आणते. जर आपल्याला निरोगी व्हायचे असेल, तर आपल्या मनाचे निराकरण केले पाहिजे! यासाठी प्राणायाम, श्वसनाचे व्यायाम आणि ध्यान नियमितपणे केले पाहिजे! तुम्ही तुमच्या आत्म्याकडे लक्ष द्या. आत्म्याच्या स्पंदनांना जाणा आणि मनामध्ये तटस्थता आणि सजगवृत्ती वाढवा.

हे सर्व करण्यासाठी मला वेळ मिळाला नाही हे कारण आणि सबब सांगू नका. तुम्हाला वेळ मिळत नाही याचा अर्थ असा आहे की, तुम्ही आळशी आणि निष्काळजी आहात. तुम्हाला रोगविकारांची भीती वाटून काहीच उपयोग नाही. काय करायचे ते आपल्या हातात आहे. रोगग्रस्त होऊन, चिंताग्रस्त होऊन जगायचे की, रोगमुक्त होऊन आनंदाने जगायचे हे आपल्या हातात आहे. कोणत्याही रोगाच्या बाबतीत दुसऱ्यांना दोष देऊ नका. रोगाला कारण आपणच आहोत. रोगाला जबाबदार आपणच आहोत आणि रोगमुक्ती मिळवण्याच्या सामर्थ्याचे मालकही आपणच आहोत. आपण सर्वकाही आहोत.

***

पृथ्वीतलावर जी जी माणसं यशस्वी झाली आहेत, ती ती जास्तवेळा अपयशी झाली आहेत.

सविता कुंभार यांच्या आत्मकथनाचे प्रकाशन
संकटे समोर आली की आपल्यातील स्त्री जागी होते !

पुणे : लहान वयात लग्न झाले. पतीचे निधन झाले तेव्हा मूल पदरात होते. मीच रडत बसले तर मुलीला शिकवणार कसं? असा प्रश्न समोर होता. ना शिक्षण, ना कौटुंबिक पार्श्वभूमी ना व्यावहारिक समज; पण पिलूसाठी तर करावे लागणार म्हणून मग पडदे विकले, कपड्यांना इस्त्री केली. पायपुसणे करुन विकले. शिलाई मशीन घेतले आणि मग रिक्षा चालवायला घेतली. संकटे समोर आलीकी आपल्यातील स्त्री जागी होते..., अशी भावना लेखिका सविता कुंभार यांनी व्यक्त केली.

जागतिक महिला दिनानिमित्त सविता कुंभार यांनी लिहिलेल्या 'तू चालं पुढं' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा 'लोकमत'चे संपादक संजय आवटे यांच्या हस्ते वीर बाजी पासलकर सभागृह येथे नुकताच पार पडला.

निर्भीड तू, कर्तव्यनिष्ठ तू, अवतार रणरागिणीचा आदर्श आम्हा जनसामान्यांचा अभिमान तू, असे म्हणत अनेक महिलांना प्रेरणा पुरस्कार देण्यात आला.

टामूबाई कुंभार, पुष्पाताई भिगवणकर, अनुराधा कुंभार, प्रतिमा कुंभार, सविता कुंभार या रणरागिणींना महिला प्रेरणा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी कुंभार समाजोन्नती मंडळ पुणे जिल्हाध्यक्ष संतोष कुंभार, कार्याध्यक्ष विशाल कुंभार, प्रताप शिंदे, बाबाजी शिंदे, कुंभार महिला आघाडीच्या अध्यक्ष कल्पना शिंदे, उपाध्यक्ष सुधा कुंभार, सचिन सविता कुंभार, रेखा जाधव, ज्योती शिंदे, प्रतिभा ओव्हाळे, कविता धानेपकर, ॲड. प्रार्थना सदावर्ते, शंकर वाव्हाळे, गजानन भागवत उपस्थित होते.

अडचणींचे डोंगर माझ्यासमोर उभे होते; मात्र पिलूसाठी धावत राहिले. मला मदत करण्यासाठी जो समाज उभा राहिला, त्याच्यासाठी आता काही करण्याची माझी इच्छा आहे.

– सविता कुंभार, लेखिका

'तू चालं पुढं' पुस्तकासह लेखिका सविता कुंभार.

बाई दुबळी आहे असे पुरुषांना अजिबात वाटत नाही. उलटपक्षी ती जास्त भक्कम आहे, असे पुरुषांना वाटते म्हणूनच भीती वाटते. अनेकदा काय होते आपण जगत नाही, पण इतरांच्याच गोष्टी लिहितो. सविता ही जगली आहे. जगते आहे. हेच सर्व तिने तिच्या शब्दांत या पुस्तकात मांडले आहे. अशा शब्दांत संजय आवटे यांनी लेखिकेच्या प्रयत्नांचे कौतुक केले. विद्या सोनवणे यांनी प्रास्ताविक केले तर कल्पना शिंदे यांनी आभार मानले.

***

दागिन्यांचे शरीराला होणारे फायदे

–सौ. शैलजा संजय कुंभार, चिंचवड

बांगडी, पैंजण आणि जोडवी केवळ सौभाग्याचे वाण नसून आरोग्यासाठी फायदेशीर आहे. सोन्याचे दागिने उष्णता आणि चांदीचे दागिने थंड परिणाम देतात. कंबरेच्या वरील भागात सोन्याचे दागिने आणि कंबरेच्या खालील भागात चांदीचे दागिने घातले पाहिजेत. हा नियम पाळल्याने शरीरातील उष्णता आणि शितलतेचे संतुलन रहाते.

बांगडी घालण्याचे फायदे

१) बांगडी मनगटावर घासली जाते त्यामुळे हाताचा रक्तसंचार वाढतो. २) हे घर्षण उर्जा निर्माण करते त्यामुळे अशक्तपणा जाणवत नाही. ३) बांगडी घातल्याने श्वासासंबंधी व हृदयासंबंधी आजार होण्याची शक्यता कमी होते. ४) बांगडी घातल्याने मानसिक संतुलन उत्तम ठेवण्यास मदत होते. ५) तुटलेली बांगडी घालू नये याने नकारात्मक उर्जा वाढते.

जोडवी घालण्याचे फायदे

१) विवाहित स्त्रिया पायातल्या तीन बोटांमधे जोडवी घालतात. हा दागिना केवळ श्रृंगाराची वस्तु नाही. २) दोन्ही पायांत जोडवी घातल्याने शरीरातील Hormonal system योग्यरित्या कार्य करते. ३) जोडवी घालण्याने Thyroid चा धोका कमी होतो. ४) जोडवी Acupressure उपचार पध्दतीवर कार्य करतात ज्यामुळे शरीरातील खालील अंगाचे मज्जासंस्था आणि स्नायू मजबूत होतात. ५) जोडव्यांमुळे एका विशिष्ठ रक्तवाहिनीवर दाब निर्माण होत असल्यामुळे गर्भाशयाला रक्तपुरवठा सुरळीतपणे चालू राहतो. या प्रकारे, जोडवी स्त्रियांची गर्भधारणा क्षमता निरोगी ठेवते व मासिक पाळी ही नियमित होते.

पैंजण घालण्याचे फायदे

१) पैंजण पायातून निघणारी शारीरिक विद्युत उर्जा शरीरात संरक्षित ठेवते. २) पैंजण स्त्रियांचे पोट आणि त्यांच्या शरीरातील खालील भागातील Fats कमी करण्यात मदत होते. ३)वास्तुशास्त्रानुसार पैंजणातून येणाऱ्या स्वराने नकारात्मक उर्जा दूर होते. ४) चांदीच्या पैंजणामुळे पायाचे घर्षण होऊन पायाचे हाड मजबूत होते. ५) पायातील पैंजणामुळे महिलांची इच्छा शक्ती मजबूत होते. याच कारणामुळे स्त्रिया स्वतःच्या आरोग्याची काळजी न घेता कुटुंबाच्या सगळ्या गरजा पूर्ण करण्यात दिवस घालवून देते. ६) पायात सोन्याचे पैंजण घालू नये, याने शारीरिक उष्णतेचे संतुलन बिघडून आजार होण्याची शक्यता असते. जागतिक महिला दिनासाठी महिलांना ह्या अलंकाराची माहिती मिळावी यासाठीचा उद्देश आहे. आजकाल महिलांमधे या दागिन्याची कमतरता वाटते. महिलांमधे पैंजण व जोडवी वापरण्याचे प्रमाण फार कमी दिसून येते. त्यामुळे या पिढीला याचे महत्त्व समजणे फार गरजेचे आहे.

***

मोजत बसू नये वर्ष आणि तारखा, जीवनाचा आनंद घ्यावा फुलपाखरासारखा.

माझी आई

-बाळासाहेब शिंदे (मोशी पुणे)

ज्या जगात आपण राहत आहोत त्या जगाची लोकसंख्या जवळ जवळ आठशे कोटी आहे. परंतु आठशे कोटी लोकांमध्ये दोनच माणसे अशी आहेत की ज्यांच्यावर आपण डोळे मिटून विश्वास ठेवू शकतो, आठशे कोटींमध्ये दोनच माणसं अशी आहेत, कि जी शेवटच्या क्षणापर्यंत आपली काळजी करत असतात, जर कधी अशी वेळ आली तर आपला जीव सुद्धा देतील पण आपलं रक्षण करतात. आणि ती दोन माणसं म्हणजे आपली 'आई आणि वडील'. मी कुठंतरी असं वाचलं कि, कुणी तरी सुखी कुटुंबाची व्याख्या एका महाराजांना विचारली, तेव्हा महाराजांनी उत्तर दिलं कि तुमच्याकडे किती बंगले आहे, किती गाड्या आहेत, तुमचा बँक बॅलन्स किती आहे, तुम्ही आमदार आहात, खासदार आहात, यावर सुखी कुटुंबाची व्याख्या ठरत नाही सुखी कुटुंब ते असत ज्या कुटुंबात आई आणि वडील सुखी आहेत. आठ मार्च महिला जागतिक दिनानिमित्त मी आपणास माझ्या जीवनातील एक प्रसंग नमूद करतो.

प्रसंग आहे त्या वेळेचा ज्या वेळी माझे वय सहा वर्ष असेल. तेव्हा माझी आई ग.भा. हौसाबाई बबन शिंदे हि नगरमधील मीरावली बाबाची खूप मोठी भक्त होती. आणि मीरावली बाबाचा ऊरूस/संदल (यात्रा) ती न चुकता जात असायची. या वेळेस ती मला घेऊन जाणार होती. मी पण खूपच खुश होतो. आम्ही त्या दिवशी सकाळीच लवकर उठून तयारी केली, मला आज एसटी मध्ये बसायला मिळणार होत.

आम्ही बाभूळवाडे (तालुका पारनेर) मधून एसटी ने नगरला गेलो. कारण त्या वेळेस माझ्या गावामधून एसटी नगरपर्यंत जात असायची. पण आम्ही नगरला गेलो आणि आईला समजले कि मीरावली बाबाचा संदल दोन दिवसांनी आहे. आम्ही चुकून दोन दिवस अगोदरच आलो होतो. खरं तर आमची परिस्थिती त्या वेळेस खुप गरिबीची होती. आईकडे जाणे आणि येणे यापुरतेच पैसे होते. जेवण सुद्धा एक दिवस पुरेल एवढंच बरोबर घेतलं होत. पण बाबाच दर्शन घेतल्याशिवाय परत जायचं नाही हे आईने ठरवलं होत. तिच्या चेहऱ्यावरील चिंता मला दिसत होती. पण ती समजण्याएवढा मी पण मोठा नव्हतो. पण काहीतरी चुकीचे घडले आहे हे मात्र मला समजले होते. पण तिचा निर्णय ठाम होता शेवटी ती मला मिरवली बाबाच्या पहाडावर दर्ग्यात घेऊन गेली.

बाबांच दर्शन घेतले आणि दर्ग्यामध्ये आम्ही एका बाजूला बसलो. दुपारचे तीन वाजले असतील, मला भूक लागली होती. आणि आपल्या मुलाला भूक लागली आहे हे जगातील कोणत्याही आईला सांगावं लागत नाही. तिने कपडयामधील भाकर काढली आणि मला खायला दिली, अर्थात ती मला खाऊ घालत होती मात्र ती खात नव्हती मी तिला विचारले तू का खात नाही तर, तर ती म्हणाली भूक नाही. पुन्हा संध्याकाळी ती मला खाऊ घालत होती, मात्र ती खात नव्हती, मी तिला पुन्हा विचारले तू का खात नाही, तर ती म्हणाली मला भूक नाही. पण ती का खात नाही याच कारण मला मात्र कळत नव्हते. परत दुसऱ्या दिवसही तसच झालं, दोन दिवस ती भाकरी खात नव्हती मात्र मला ती खाऊ घालत होती,

शेवटी संदलचा दिवस उजाडला पण दोन दिवस माझी आई उपाशी होती. मात्र तिचे शरीर हि गोष्ट लपवू शकलं नाही. ती मात्र आज अशक्त, व्याकुळ, थकलेली दिसत होती. कारण दोन दिवस ती फक्त पाणी पीत होती पण आपल्या बाळाला काही कमी पडू देत नव्हती. तिसऱ्या दिवशी मात्र मला खाऊ घालण्यास भाकर शिल्लक नव्हती. तिच्या जवळ थोडे काही सुटे पैसे असतील मग तिने हॉटेलमधून मला काहीतरी खायला आणून दिले, मात्र तरीही ती काहीच खात नव्हती, कारण आपण जर काही खाल्लं तर आपलं बाळ उपाशी राहील याची जाणीव तिला होती, आणि जगातील कोणतीच आई आपल्या बाळाला उपाशी बघू शकत नाही. आणि जगातील कोणताही मुलगा आपल्या आईला तीन दिवस उपाशी बघू शकत नाही. शेवटी बाबाचे दर्शन घेऊन आम्ही परतीला निघालो. वडील आम्हाला शोधायला निघाले पण नशिबाने आमची पारनेरमध्ये भेट झाली.

खरं तर भारतीय संस्कृती आज हि जगामध्ये सर्वश्रेष्ठ मानली जाते, कारण आपण दगडाला सुद्धा देव मानून त्याची पूजा करतो, ज्या देशामध्ये राजमाता जिजाऊनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवले, ज्या देशामध्ये सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, राणी लक्ष्मी अशा थोर महिलांनी जन्म घेतला, त्या देशामध्ये हुंडाबळी होतात, सामूहिक बलात्कार होतात, महिलांना जाळून मारले जाते, अशा घटना म्हणजे देशाची मान शरमेने खाली झुकली जाते.

खरं तर महिला जागतिक दिनानिमित्त आपण सर्वांनी एक शपथ घेतली पाहिजे कि, आपली आई असेल, आपली बहीण असले, आपली बायको असले त्यांना त्रास झाला तर आपण दु:खी होतो, मग शेवटी कोणतीही महिला कुणाची तरी आई आहे, कुणाची तरी बहीण आहे, कुणाची तरी बायको आहे, प्रत्येक स्त्रीचा त्याग खूप मोठा आहे आणि त्यामुळेच आपण सर्व आज सुखी आहोत, मग आपण त्यांचा सुद्धा आदर केला पाहिजे, शेवटी महिला जागतिक दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

***

आकाशाकडे लक्ष ठेवा, पण हे विसरु नका, पाय जमिनीवरच ठेवले जातात.

स्त्री जन्मा, ही तुझी कहाणी

– ॲड. रामचंद्र बाहिकर, नाशिक

कुणावरही अन्याय होउ नये म्हणून भारतीय संविधानात मानवी, हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पुरेशा तरतुदी केल्या आहेत. स्त्रियांना त्यांच्या – संरक्षणाची त्यांच्या अधिकाराची कुचंबना होत असल्याचे दिसते. त्याची सुरवात घरात मुलगी म्हणून जन्माला आल्यापासून होते. कुटुंबात मुलाला जो आदर व सन्मान प्राप्त होतो, तो मुलगी जन्माला आली म्हणून नसतो. मुलीची गर्भधारणा झाली असल्यास, लागलीच भ्रूण हत्या केली जाते. मुलीची गर्भधारणा होऊ नये म्हणून घरातील सर्व काळजी घेतात.

मुलीला घरात जन्माला आलेले ओझे समजले जाते. तिच्या शिक्षणावरील खर्च, व्यर्थ समजला जात असल्याने तिचे शिक्षण मध्येच बंद केले जाते. त्यामुळे ग्रामिण भागातील मुली जास्त निरक्षर आढळतात. निरक्षर राहिल्याने व्यवहारी जीवनात तिला अनंत अडचणीला तोंड द्यावे लागते. शिक्षण बंद झाल्याने तिची आई घरकामाचा भार तिच्यावर सोपवते, व्यवहार समजत नसल्याने तिची हेटाळणी होते. त्यामुळे तिच्यात न्यूनगंड निर्माण होतो. मुलगीच जन्माला येऊ देत नसल्याने, जनगणनेत मुला–मुलींच्या दरात भरपूर विषमता जाणवते.

प्रत्येक व्यक्तिला सन्मानाने, आणि निर्भयपणे जगता येणे हे मानवी हक्कात अभिप्रेत आहे. लग्नात हवा असणारा हुंडा, मान–पान वराकडील सर्वांना न झाल्यास, मुलगी सासरी जाताच, तिचा मानसिक व शारिरीक छळ सुरु होतो, लोभी कुटूंबात, वधूला लग्नात मिळालेले दागदागिने, तिच्या हक्काच स्त्रीधन, तिच्याकडून, हिसकावून घेउन, घरातून तिला हाकलून लावले जाते. तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन, तिच्यावर खोटे आरोप लादले जाऊन, तिला जीवन जगणं मुश्किल करतात. काहींना नोकरी, घरसंसार, मुलांची देखभाल, अशा तिहेरी जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत असल्याने, आणि खाष्ट सासू, सासरे, ननंदा पती, असल्यास अती ताण तणावामुळे, दगदग आणि धावपळीमुळे, त्यांना हृदयविकाराच्या आजाराची संभावना होऊ शकते.

प्रत्येक वर्षी जागतीक महिला दिवस ८ मार्चला साजरा होतो. स्त्रियांचे समाजातील हक्क, स्त्रियाप्रती समाजाचे कर्तव्य, सासरी स्त्रि (घरातील लक्ष्मी) म्हणून सन्मानाची वागणूक, या विषयी व्यासपिठाहुन मोठमोठी भाषणे होतात, मात्र कृतीत काहीच न आल्याने, स्त्रियांच्या जीवनातील परवड संपत नाही. स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तीत्वात आहे. कोर्टात बाजू खरी आहे हे सिद्ध करण्यासाठी ठाम पुरावे, साक्षीदार नसल्याने, गुन्हेगारांना रान मोकळे. त्यांची गुंडगिरी संपत नाही. ते निर्धास्तपणे उजळ माथ्याने समाजात वावरतात. त्यामुळे गुन्हेगारी कमी होत नाही.

स्त्रियांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्हयांची वर्गवारी केल्यास, सासरी घडणारे गुन्हे व त्यांची विवाह बंधनातून मुक्ततासाठी असणारे कायदे. स्त्रियांवर नोकरीच्या ठिकाणी होणारे अत्याचार व त्यावरील कायदे, समाजाकडून होणारे अत्याचार, विनयभंग, बलात्कार, खून इत्यादी कायद्यासंबधी माहिती स्त्रियांना असणे आवश्य आहे. स्त्रियांना मदत करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था, महिला प्रतिनिधि आहे. स्त्रियांनी चौकस राहणे, गरजेचे आहे. कायदे माहित असल्यास त्यांच्यावर, वा अन्य मैत्रिणींवर संकट कोसळ्यास त्या त्यांना सुद्धा मदत करू शकतील. अशावेळी एकमेकींना मदत करणे अत्यंत आवश्य आहे. स्त्रियांसाठी, त्यांच्या माहितीसाठी, त्यांना आवश्यक असणाऱ्या कायद्यांची सविस्तर माहिती खाली देत आहे.

१) लग्न झालेल्या पत्नीशी हिंसक व क्रूर वागणूक–

हिंदू विवाह कायदा कलम १३ हिंसक वागणूक दोन प्रकारात मोडते.

(अ) मानसिक क्रूरता– पत्नीला शारिरीक इजा न करता तिच्या मनाला लागेल अशा शिव्या, हुंड्यावरून माहेरचा उध्दार, वा अन्य प्रकारच्या विषयाला अनुसरून तिच्या मनाला लागेल असे टोचून बोलणे, या प्रकारची मानसिक क्रूरता यावर घरगुती हिंसाचार कायदा २००५ नुसार पतीवर अपराधाचा गुन्हा दाखल होऊ शकतो.

(ब) शारिरीक क्रूरता– पत्नीला हाताने किंवा हाती लागले त्या साधनाने मारझोड करून तिच्या शरिरावर, शारिरीक इजा, जखमा, मारझोड करून पत्नीला बेशुद्ध करणे इ. शारिरीक क्रूरता मानली जाते. अशा क्रूरतेला वर उल्लेख केलेल्या कायद्याने पतीला शिक्षा होउ शकते. लग्नात हुंडा दिला नाही म्हणून हुंडा प्रतिबंधक कायदा २०१३ प्रमाणे पत्नीचा छळ केल्यास पतीवर कायद्याने शिक्षा होऊ शकते.

२) नवविवाहीत मुलींच्या हत्या–

समाजात अनेक पतीत, संयम सामंजस्य, संतुलन, सुसंस्कृत–पणाच्या अभावी क्रूरपणे पत्नीची हत्या होते असे पतीसुद्धा भा. दंड विधान कायद्यानुसार शिक्षेस पात्र आहेत. अशा नराधमांसाठी कायदा सुध्दा अपुरा पडतो असे जाणवते.

३) नोकरीच्या ठिकाणी लैंगिक शेषण–

कौटुंबिक खर्चाला सहभाग म्हणून अनेक स्त्रिया नोकरी करतात. त्या ठिकाणी संपर्कात येणारे, कामवासनेने पछाडलेले अनेक सहकारी, वरिष्ठ अधिकारी स्त्रियांच्या असहायतेचा फायदा घेउन त्यांचे लैंगिक शोषण करतात. स्वतःची बेअब्रू होउ नये म्हणून त्या वाच्यता करीत नाही.

४) स्त्रियांचा विनयभंग, दागिने, मौल्यवान वस्तू अपहरण–

रस्त्याने एकटी जाणारी मुलगी, अबला यांचा गर्दीचा फायदा घेउन, जसे यात्रा, बस, मंदीर अशा ठिकाणी विनयभंग केला जातो. दुचाकीवरून पाठीमागून येऊन, गळ्यातील मौल्यवान सोन्याचे दागिने, पोत, खांद्यावरील पर्स, हातातील मोबाइल घेऊन पळ काढला जातो. अशा घटना वर्तमान पत्रात नेहमी वाचायला मिळतात. एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला सुद्धा केला जातो.

५) लहान बालकांचे अपहरण करून विक्री– मुलींना मोठे करून अनैतिक व्यवसाय करण्यास धाक व दडपशाही. लहान बालकांचे अपहरण

करून मुल असल्यास त्याच्यात शारीरीक व्यंग निर्माण करून त्याला रस्त्यावर गर्दीच्या ठिकाणी भिक मागण्यास भाग पाडून, गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांच्याकरवी पैसे कमवितात.

६) स्त्रियांची आर्थिक असमानता–

लग्न झालेल्या स्त्रियांना बऱ्याच घरात आर्थिक स्वातंत्र्य नसते. नोकरी करीत नसल्याने आर्थिक अधिकार पतीकडे, सासूकडे, सासऱ्याकडेच असल्याने त्यांची आर्थिक कुचंबना केली जाते. माहेरची आर्थिक परिस्थिती, पाठींबा भक्कम नसल्यास, छळ करून त्यांना सासर सोडावे लागून निरीश्रित केले जाते. त्यांच्या निराधार अवस्थेचा फायदा, त्यांना भुलवून गुंड प्रवृत्तीचे लोक घेत असतात.

७) स्त्रीयांची धार्मिक असमानता–

स्त्रियांना मासिकपाळीच्या काळात मंदिरात जाता येत नाही. शनिशिंगणापूर मंदिरात स्त्रियांना आतापर्यंत दर्शनास बंदीच होती. त्यासाठी स्त्रियांना आंदोलन करावे लागले.

८) घटस्फोटीत स्त्रियांची अवहेलना–

सासरच्या शारिरीक व मानसिक छळामुळे बऱ्याच स्त्रियांना माहेरी अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडले जाते. मुलीलाच दोषी ठरविले जात असल्याने, माहेरी दिवस कंढणे त्यांना नकोसे वाटत असल्याने, त्या प्रसंगी आत्महत्या करण्यास तयार होतात. त्यांची मानसिक अवस्था बिघडल्याने, मनापासून कुणाशीच बोलत नसल्याने त्या अबोल बनतात. माहेर सोडल्यास रहाणार कुठे? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकतो.

९) घटस्फोटाची आढणारी प्रमुख कारणे खाली दिल्याप्रमाणे–

✻ पती अथवा पत्नीचा ताठर, हेकेखोर, घमेंडी व त्यांच्यात अहंपणा असणारा स्वभाव. स्वभावात आपसात जुळवून घेण्याची मानसिकता नसणे, लवचिकता नसल्याने, कुठल्याही परिस्थितीत ते माघार घेत नाही. लग्न बंधनावरील निष्टेचा अभाव.

✻ शारिरीक संबंधात असमाधान. ✻ व्यभिचार, आपसात दुरावा, अति क्रोधाने हत्या. ✻ नात्यातील प्रगल्भतेचा अभाव, हट्टी व अहंपणाचा स्वभाव. ✻ कटकटी सासू, सासरा व नवरा. ✻ अवाजवी, अवास्तव अपेक्षा, चैनी, विलासी वृत्ती. व्यसनाधिनता ✻ दुर्लभ संवाद, समजूतीचा अभाव, आपसात गैरसमज. ✻ श्रद्धा व जीवनशैलीतील विसंवाद, परदेशीच नोकरीचा हट्ट. ✻ नात्याहून करिअर, महत्वकांक्षा अधिक वरचढ. ✻ संशयी स्वभाव, त्यामुळे कटूता, कायमचा दुरावा. ✻ एकत्र कुटूंबात रहाण्यास नकार, शहरी जीवनाचा हव्यास. ✻ मुलींच्या सांसारीक जीवनात माहेरच्यांची शिकवण व लुडबूड ✻ दोघांची आपसात घटस्फोटा –साठी संमती असल्यास कोर्टामार्फत फारकत.

१०) पतीपत्नीचा एकमेकांच्या संमतीने हिंदू विवाह कायदा कलम १३(ब) अन्वये घटस्फोट घेता येतो.

अनेक प्रयत्नकरुन समोपदेशन करुन सुद्धा, २ वर्षांपेक्षा अधिककाळ पती पत्नी एकमेकांपासून दूर रहात असल्यास, न्यायालयात अर्ज करतांना पती–पत्नी यांच्यात घटस्फोटाच्या सहमतीने ठरलेल्या अटी अर्जासोबत जोडाव्या लागतात, त्याप्रमाणे तसे कागदोपत्री नोंदवून न्यायालयात अर्ज करता येतो. घटस्फोट घेण्यापुर्वी त्या अर्जात पतीने पत्नीच्या मागण्यानुसार ठराविक रक्कम व अन्य काही दिल्यास त्याचा उल्लेख, अटी शर्ती न्यायालयात दिलेल्या अर्जासोबत असावा. कोर्ट पती–पत्नीची सहमतीने घटस्फोट घ्यायला तयार आहे किंवा नाही याची खात्री करते. त्याचप्रमाणे कुणाच्या दबावाखाली ते घटस्फोट घेत नाही याची सुद्धा खात्री करुन पुढील ६ महिन्यानंतरची तारीख दिली जाते. ६ महिने संपल्यानंतर असणाऱ्या तारखेला पती व पत्नी दोघांनाही कोर्टापुढे सांगावे लागते, ते दोघेही सहमतीने फारकत घेण्यास तयार आहे. त्यानुसार कोर्ट त्यांचा घटस्फोट मंजूर करते.

आपल्या रुढीग्रस्त सनातनी विचारातून, विषमताग्रस्त मानसिकतेतून बाहेर येऊन, उदार मतवादी आणि विकासाभिमुक प्रागतिक दृष्टीकोन स्वीकारण्याची आजच्या काळात गरज आहे. कोणत्याही परिस्थितीत स्त्रियांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होणार नाही, यासाठी सर्व समाजातील स्तरांनी विचारपुर्वक पाठिंबा द्यायला हवा. त्यांना तसा आधार व पाठबळ मिळाल्यास त्यांच्यातील हिंमत वाढेल. तसे झाल्यास कोर्ट कचेरीत जाऊन न्याय मिळविण्याच्या खटपटी करण्याची गरज पडणार नाही. विवाहितांचे कोर्टातून न्याय मिळेपर्यंत थांबण्याचे व दोघांचे त्यांच्या तारुण्यातील अनेक वर्ष वाचतील यासाठी आपसात सामंजस्याने तडजोड करण्याची वृत्ती हवी. आपसातील तडजोडीने फारकत झाल्यास, पतीपत्नी विषयीचे अनेक प्रकरणे कोर्टातून कमी होतील व नवविवाहीत मानसिक ताणतणावातून बाहेर पडतील आणि भविष्यात आनंदी जीवनाची पुढील वाटचाल करतील.

– रामचंद्र सदाशिव बाहीकर, ॲडव्होकेट
६०, यशोदीप, जेलरोड शिवाजीनगर,
नारायण बापू नगरजवळ, नासिकरोड

✻✻✻

'वेणूताई'च्या नम्रता कुंभारला सुवर्णपदक

कऱ्हाड : येथील वेणूताई चव्हाण कॉलेजची नम्रता कुंभार हिने शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत ७६ किलो वजन गटात १६० किलो वजन उचलून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिला सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रकाश पाटील, प्राचार्य डॉ. एल. जी. जाधव यांनी नम्रताचा सत्कार केला.

रश्मिका कुंभार हिला महात्मा फुले कृषी विद्यापीठाची डॉक्टरेट

वाई : पसरणी, ता. वाई येथील रश्मिका आनंदा कुंभार हिला अहमदनगर येथील राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने कृषी कीटकशास्त्र विषयातील डॉक्टरेट (आचार्य) ही पदवी देऊन नुकतेच सन्मानित केले.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेती आणि शेतीतील समस्या हा शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. शेतकरी म्हणून शेतात राबत असताना आणि विविध पीक घेत असताना अनेक नैसर्गिक कारणांमुळे शेतीतील पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होते. अशा अनेक कारणांमध्ये प्रामुख्याने विविध पिकांवर होणारा अळ्यांचा प्रादुर्भाव हे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या पीकभक्षी अळ्यांवर संशोधन होणे आणि त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना करणे ही काळाची गरज बनलेली आहे. याच महत्त्वपूर्ण विषयाचा वेध घेत पॉप्युलेशन डायनॅमिक्स बायोलॉजी अँड मॅनेजमेंट ऑफ सिट्रेला स्टेंटन ऑन असिड लाइम या विषयावर संशोधन करुन पाने पोखरणारी अळी ही लिंबूवर्गीय फळझाडांवरील महत्त्वाची कीड असून तिच्यामुळे झाडांची वाढ मंदावते आणि उत्पादनावर व पर्यायाने उत्पन्नावर कसा परिणाम होतो व त्यासाठीच त्या अळीवर नियंत्रण करणे कसे गरजेचे आहे यावर संशोधन करणाऱ्या रश्मिका आनंदा कुंभार हिला नुकतीच अहमदनगर येथील राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने डॉक्टरेट अर्थात कृषी कीटकशास्त्र विषयातील आचार्य पदवीने सन्मानित केले आहे.

अलीकडेच झालेल्या विद्यापीठातर्फे आयोजित दीक्षांत समारंभात रश्मिका हिला डॉक्टरेटचा सन्मान प्रदान करण्यात आला. या संशोधना साठी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. संतोष कुलकर्णी यांनी तिला मार्गदर्शन केले.

भारतात कागदी लिंबू लागवडीच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर असून रश्मिका कुंभार यांच्या संशोधनाचा त्याच अनुषंगाने शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो. या यशाबद्दल रश्मिका कुंभार हिचे आ. मकरंद पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

***

आई आणि मुलीचा आराम...

संकलक : माधुरी कुंभार

आई मला जरा आराम हवा आहे..

शाळेत जाणारी मुलगी अभ्यास, शाळा, क्लास करून थकून आईला म्हणाली, अगं चांगला अभ्यास कर, नंतर आरामच करायचा आहे. मुलगी उठली, अभ्यासाला लागली आणि आराम करायचा राहून गेला.

आई थोडा वेळ दे आरामाला, ऑफिसच्या कामातून थकून गेलीये मी पार.... अगं लग्न करून सेटल हो एकदाची, मग आरामच करायचा आहे. मुलगी लग्नासाठी तयार झाली आणि आराम करायचा राहून गेला.

अहो इतकी काय घाई आहे, एखादा वर्ष थांबू ना जरा.... अगं मुलं होऊन गेली वेळेवर की टेन्शन नाही, नंतर आरामच करायचा आहे. मुलगी आई बनली आणि आराम करायचा राहून गेला.

अगं तुलाच जागरण करावं लागेल, मला ऑफिस आहे उद्या... थोडे दिवस फक्त, मुलं मोठी झाली की आरामच करायचा आहे. ती बाळासाठी रात्रभर जागी राहिली आणि आराम करायचा राहून गेला.

अहो मुलं आता शाळेत जायला लागली, जरा निवांत बसू द्या की मला.... मुलांकडे नीट लक्ष दे, त्यांचा अभ्यास घे, नंतर आरामच करायचा आहे. ती मुलांचा प्रोजेक्ट करायला बसली आणि आराम करायचा राहून गेला.

आता मुलं स्वतःच्या पायावर उभी राहिली, आता जरा निवांत झाले मी.... आता यांच्या लग्नाचं पाहावं लागेल, ती एक जबाबदारी पार पाडली की मग आरामच करायचा आहे. तिने कंबर कसून सगळा कार्यक्रम आटोपला आणि आराम करायचा राहून गेला.

मुलं संसाराला लागली, आता मी आराम करणार.... अगं आपली सुधा गर्भार आहे, माहेरी बाळंतपण करायचंय ना तिचं. मुलीचं बाळंतपण आवरलं आणि आराम करायचा राहून गेला. चला, ही पण जबाबदारी पार पडली, आता आराम....

सासूबाई मला नोकरी परत जॉईन करायची आहे... आरवला सांभाळाल का? नातवाच्या मागे दमली आणि आराम करायचा राहून गेला. चला नातू मोठा झाला, आता सगळ्या जबाबदाऱ्या संपल्या... आता मी आराम करणार....

अगं ऐकलं का, गुडघे दुखताय माझे, उठवलं जात नाही..BP वाढलाय वाटतं, डायबिटीस पण आहे... डॉक्टरने वेळेवर पथ्यपाणी करायला सांगितलंय बरं का. नवऱ्याची सेवा करायला उरलं सुरलं आयुष्य गेलं... आणि आराम करायचा राहूनच गेला.

एक दिवशी देवच आला खाली, आराम करायचाय ना तुला? तिने हात जोडले आणि देव घेऊन गेला... अखेर तिला आराम मिळाला, अगदी दिर्घकाळाचा..!!!

स्त्री जीवनाचे मजेदार रहस्य म्हणजेच आजची कथा! सर्वांना हृदय स्पंदन...!!!

***

आयुष्यात खरं प्रेम, खरी माया फार दूर्मिळ असते.

नेपाळ येथे 'शारदा घोडके' यांचा सन्मान

नेपाळ : कवियत्री शारदा लक्ष्मण घोडके, मु.पो.देऊळगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. यांचे शिक्षण जवाहर नवोदय टाकळी ढोकेश्वर येथे दहावी पर्यंत झाले, पुढे एच.एस.सी. (प्रवरा लोणी) येथून तर डी. एड. (अहमदनगर) झाले.

शारदा यांनी एम.ए. (मराठी) पदवी प्राप्त केली असून त्या संगीत विशारद सुद्धा आहेत. जि.प.प्राथ.शाळा खांडगाव येथे सध्या त्या शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

शालेय जीवनापासून त्यांना काव्य लेखन व गायन यात रूची आहे. विविध काव्यप्रकारात त्यांनी लेखन केले आहे. मुक्तछंद स्फुटकाव्य, चारोळी, अष्टाक्षरी, षडाक्षरी असे विविधांगी काव्यप्रकार हाताळले आहेत. ललितलेखन व स्फुटलेखनही केले आहे. ''जांभळ्या घनास...'' या काव्य संग्रहाचे शॉपिझेन या ॲपवर नुकतेच प्रकाशन झाले.

सातव्या शब्द साहित्य संमेलन नेपाळ येथे त्यांनी काव्यवाचन केले तसेच त्यांच्या ''स्मृतिगंधाची फुलं...'' या काव्यसंग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले.

***

बोधकथा - शरीर नावाच्या घराकडे दुर्लक्ष करू नका.

संकलन - मीना पाषाणकर

एक शेठजी होते. ते दिवसरात्र आपला व्यवसाय आणि पैसा वाढवण्याचाच विचार करत असत. त्यांना शहरातील सर्वांत श्रीमंत माणूस बनायचे होते. हळूहळू त्यांनी तेही साध्य केले.

श्रीमंत होऊन त्यांनी शहरातील सर्वांत मोठे घर बांधले. गृहप्रवेशाच्या दिवशी त्यांनी भव्य पार्टी केली. सर्व पाहुणे निघून गेल्यावर तेही झोपायला त्यांच्या खोलीत गेले.

थकव्याने कंटाळलेले असतानाच त्यांना एक आवाज ऐकू आला.

मी तुझा आत्मा आहे आणि आता मी तुझे शरीर सोडून देत आहे..!

शेठजी घाबरले आणि म्हणाले, अरे, तू असे नको करु. मी तुझ्याशिवाय मरेन. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर मला हे यश मिळाले आहे. आता या यशाचा आनंदाने उपभोग घेण्याची संधी चालून आली आहे. शंभर वर्षे टिकेल असे मजबूत घर मी बांधले आहे. कोट्यवधी रुपयांचे हे घर, सुखसोयींनी भरलेले आहे. आता या क्षणी सोडून जाऊ नकोस.

आत्मा म्हणाला, हे माझे घर नाही. माझे घर म्हणजे तुझे शरीर होते. आरोग्य हे त्याचे सामर्थ्य होते. पण पैसे कमावण्याच्या नादात तू त्या घराच्या देखभालीकडे दुर्लक्ष केलेस. आता रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, लठ्ठपणा, पाठदुखी अशा आजारांनी तुझ्या शरीर नावाच्या घराला घेरले आहे. तुला नीट चालता येत नाही. रात्री झोप येत नाही.

तुझे हृदयही कमजोर झाले आहे. आता तूच सांग, अशा जीर्ण घरात राहायला तुला आवडेल का, ज्याच्या आजूबाजूला कमकुवत आणि असुरक्षित भिंती आहेत..?

शेठजी त्या शब्दांवर विचार करु लागले. आत्मा म्हणाला, ज्याची चौकट ढासळत आहे, वाळवी लागलेली आहे, प्लास्टर आणि पेंट उडून गेले आहे, साफसफाई नीट होत नाही, इकडे तिकडे घाण साचून राहते, छत गळत आहे, खिडक्या-दारे तुटली आहेत... अशा घरात राहायला तुला आवडेल का...? म्हणूनच मी तुझे हे शरीर नावाचे घर सोडून जाणार आहे.

आत्म्याने विचारलेल्या या प्रश्नावर शेठजींकडे समाधानकारक उत्तर नव्हते.

शेठजी भीती आणि पश्चातापाने थरथर कापत होते. पण, आत्म्याला थांबवायची ताकद आणि हिंमतही शेठजींमध्ये उरली नव्हती. एक दीर्घ श्वास सोडत आत्मा शेठजींच्या शरीरातून निघून गेला. शेठजींचा मृतदेह बंगल्यात पडला होता.

तात्पर्य : ही कथा आज बहुतांश लोकांची वास्तविकता आहे. आपण यश जरूर मिळवा, पण तब्येतीकडे दुर्लक्ष करुन नाही.

नाहीतर, त्या शेठजींप्रमाणेच आपण इच्छित स्थळी किंवा ठरवलेल्या उंचीवर पोहोचूनदेखील आपण त्याचा आनंद घेण्यापासून वंचित राहू. हे टाळायचे असेल तर आजपासून सुरुवात करा. स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या. आपले शरीर नावाचे घर मजबूत ठेवा.

***

माझा स्त्रि घन

(रमेश गोविलकर, गोरेगांव – रायगड)

घाला वैधव्याचा, मजवर अवचित झाला,
सौभाग्याची लेणी सारी, कायमची तो घेऊन गेला ।।१।।

त्यांच्या नावाच कुंकू, मी रोज भाळी लावायची,
संकटावर मात करायची, ताकद मंगळसुत्राने यायची ।।२।।

हिरव्या बांगड्यांची किणकिण, त्यांसी संवाद साघायची,
त्यांच्या आठवणीने मग माझ्या, लाली गालावर यायची ।।३।।

काळ्याभोर लांब केसात, कधी गजरा मी माळायची,
कधी काही चुकल कानांतील, कुडी धरुन क्षमा मागायची ।।४।।

उंबऱ्यात जोडवी बघत, वाट त्यांची पाहायची,
मोत्याची नथ घालून, मी वट पुजा करायची ।।५।।

पदर घेऊन डोईवर कार्यात, सौभाग्यवती म्हणून मिरवायची,
पैंजणा ची साथ त्याला, नेहमीच कि हो मिळायची. ।।६।।

भर्तार माझा जरी आज गेला, स्त्रिधनाने तो जवळ राहीला,
तोच आधार मला पुढे जगाया, नका ओरबडू माझ्या स्त्री धनाला।।७।।

पुर्वजानी सती जाण थांबवल,आता तुम्ही निदान एवढं तरी करा!
माझ स्त्रि धन माझ्या जवळ ठेवा,माझ स्त्रि धन माझ्या जवळ ठेवा ।।८।।

***

आठवतंय का तुला...?

(सौ. रुपाली कौस्तुभ थोरावडे, सांगली)

आठवतंय का तुला त्या भेटीत काय घडलं होतं
उगाचच दोन श्वासांमध्ये वादळ मोठं उठलं होतं.... ।।धृ।।

विरपुरलेल्या नदीला सागर तो भेटला होता
आभाळातही बघ कसा दाटून आला होता
जुळले होते तिथेच आपले ऋणानुबंध
बरसला होता जिथे श्रावण धुंद बेधुंद
आठवतंय का तुला त्या भेटीत काय घडलं होत
दोघांच्याही डोळ्याचं पारणं तिथच फिटलं होत.... ।।१।।

रचली होती कविता भावनांनी माझ्या
वाटलं अस मला, वाचली डोळ्यांनी तुझ्या
सुटला होता वारा शहारलं होत अंग
दोघांच्याही डोळ्यात फक्त सप्तरुपी रंग
हाती तुझा हात, नाचले मि चंद्र ताऱ्यात
निरागस होतास तु, वेडी झाले होते मी तुझ्या प्रेमात
चहाचा तो ग्लास श्रावणाची मोठी बरसात
खिळल्या नजरा प्रेमाच्या, घातली माझ्या काळजाला साद
आठवतंय का तुला त्या भेटीत काय घडलं होतं
उगाचच दोन श्वासांमध्ये वादळ मोठं उठलं होतं.... ।।२।।

संपत होता दिवस तो मन मात्र भरलं नव्हतं
तुला स्वतःत सामावण्यासाठी हृदय माझं आतुरलं होतं
निरोप तुझा घेताना, पुर्ण दिवस डोळ्यात सामावला होता
अन् तुझ्या प्रेमाचा पुरावा माझ्या जिवाला भेटला होता
आठवतंय का तुला या भेटीत काय घडलं होतं
उगाचच दोन श्वासांमध्ये वादळ मोठ उठलं होतं.... ।।३।।

***

सूर्यदैवत

(सौ. सुनेत्रा सुधाकर जोशी, ठाणे)

झाली नवी पहाट
धरी गणेशाची वाट
आली सकाळही मागून
परडीत शुभ्र फुलांचे गुच्छ घेऊन ।।१।।
स्वच्छ दिशा झाल्या
सचैल स्नान करूनी
पक्ष्यांचा अविरत नाद
झांजेचा गळा घेऊनी ।।२।।
सूर्यदैवताने लख्ख
पसरला उजेड
धरणीवर नतमस्तक झाला
आजूबाजूचा निसर्ग गोड।।३।।

***

आयुष्य आपलं म्हणताना...

(शारदा लक्ष्मण घोडके)

जाणीव होते आहे मला
शुभ्र रुपेरी होत जाणाऱ्या माझ्याच भावनांची
शांत समंजस होताना धवल होणाऱ्या बटांची
टणक कवचाखालचे
शुभ्र फुलोरे होत आहेत हलके
मी ही अशीच होतेय हलकीफुलकी
वाऱ्यावर लहरायला स्वैर...
जपलेल्या आशा आकांक्षा ची बीजं,
आताशा नव्यानं उडु पाहातायेतं..
स्वप्नांचे शुभ्र रुपेरी पंख लेऊन.
सृजनाच्या वाटेवर अशी...

होते आपलीच आपल्या ला ओळख
मनातले सगळे रंग मिसळून
लाभतो असा समावेशी धवलरंग
धुमसणाऱ्या जाणिवांचे शांतवत आहेत कढ..
फक्त प्रश्न घेऊन... छळणाऱ्या
अस्वस्थ होणाऱ्या मनाला
मिळत आहेत उत्तरं...

प्रगल्भतेच्या वळणावर
असे आतुन फुलता यावे निर्मोही धवलफुलांचे
शुभ्र पिसारे होऊन वाऱ्यावर तरंगता यावे..
सोडून देता यावे सल
काळजी आणि विवंचना
माफ करावे कधी स्वतलाच
आयुष्य आपलं म्हणताना...

***

'' मी ''

(सौ. रुपाली कौस्तुभ थोरावडे, सांगली)

आयुष्य किती सुंदर असले तरी कशाची तरी खंत असतेच
भरून आलेल मन रितं करायला कुणाची तरी गरज भासतेच
कधी कधी स्वत:शीच बोलण्याचा प्रयत्न मि करते
म्हणुनच नेहमी आधार मी माझ्या लेखणीचा घेते ।।१।।

मी कधी मनातुन भरून आलेली
बोलता न आल्याने शब्द पानांवर उतरलेली
कधी मनातून पार ढासळलेली
तर कधी मनातून उत्साहाचे उमाळे फुटलेली ।।२।।

मी कधी कणखर वज्रासारखी
तर कधी मऊ मेणासारखी
कधी बेफिकिर वाऱ्यावरती स्वार झाल्यासारखी
तर कधी अमाप ओझे घेऊन जगणारी ।।३।।

मी कधी नटखट खोड्या काढणारी
तर कधी अकाली मोठ्यासारखी
कधी प्रवाहासोबत अखंड वाहत जाणारी
तर कधी धीर गंभीर अन् अत्यंत स्थिर ।।४।।

मी जी आहे एक पण नटते अनेक रुपांनी
घ्यायची आहेत साऱ्या विश्वातील सारी दु:खे
सामावून जिला माझ्यातील मीच ।।५।।

***

बाईपण

(शारदा लक्ष्मण घोडके)

प्रत्येक स्त्रीच्या चेहऱ्याआड, बाईपण असते लपलेले
पदरात बांधलेले असतात, कित्येक सल खुपलेले

कित्येक नजरा हसताना, सांगतात गुढ कहानी
पंख छाटल्या पक्ष्याची, गातात हळवी गाणी

पैंजणे रुणझुणतात हळुवार, दंगा करत नाही
दिवसभर नाचणाऱ्या पायांना, कुणी थांब म्हणत नाही

क्वचितच होतात मोकळे, घट्ट बांधलेले केस
आकांक्षानाही अशीच अडवते, बाईपणाची रुढ वेस

हातातली काकणं किणकिणतात, कुरकुरत नाहीत कधी ही
अविरत राबतात कष्टतात, हात मायेचा शीणत नाही

प्रत्येक उंबऱ्याआड आहेत, घुसमटलेले बंदिस्त श्वास
दाबलेली गोठलेली चौकटीत, निस्तेज दुबळी आस

आदिशक्तीच्याया लेकींना, यावी थोडी शहाणीव
रसरसुन जगण्याची, व्हावी थोडी जाणीव

***

नोकरदार महिला

(सौ. स्वप्नसंध्या माधवराव कुंभार, आकुर्डी, पुणे)

जुन्या परंपरा मोडून
मोडून वसा जुना,
संसार आणि नोकरी
संभाळणाऱ्या या ललना.।।१।।

तारेवरची कसरत करून
सर्व सावरून जबाबदारी,
घराला हातभार लावणारी
सहनशील सशक्त नारी.।।२।।

सकाळ अन् संध्याकाळ
सर्वांना जपणारी ती,
किती तिचे गुण गाऊ
अष्टपैलू सुगरण स्त्री.।।३।।

ही सर्कस झेलताना
स्वता:चा देह न जपला,
तिच्यासाठी काही लिहू
जगदंबेचे रूप हे महिला.।।४।।

नको शब्द कौतुकाचे
जरी वरवरचा बोलबाला,
सर्व घरदार आनंदो

छोटी अपेक्षा करते अबला.।।५।।

कितीतरी तिची रूपे
ताई, माई, आत्या, आई,
पण कोणीतरी समजून घ्या
तीपण आहे एक बाई. ।।६।।

तिचे कौतुक किती गाऊ
आणि कवितेत रचू,
सर्व घराला घरपण देते
पुसून स्वतःचे अश्रू.।।७।।

***

स्त्रीत्त्व

(सौ. दिपाली सुजितकुमार कुंभार, वाई, सातारा)

अजाण ती बालिका,
खेळता खेळता धडपडली,
जखम पाहण्या आधी,
ओढणी तिने सावरली. ।।१।।

तिने पाहिली आहे आई,
सतत वावरताना घरात,
सांगत असते आजी बाई,.
न सांगता जाऊ नको अंगणात.।।२।।

तारुण्याची नवलाई हीची,
रोखून नजरा लाख लाख,
तोंड लपवून निघताना,
मनाची होई राख राख.।।३।।

कन्यादान करून सांगितले,
तू तर परक्याचे धन,
आशिर्वाद ही तसाच दिला,
कर घराण्याचे नाव रोशन.।।४।।

नात्यांची सांगड घालता घालता,
तिची ती उरलीच नाही,
सगळ्यांची मन जपता जपता,
स्वतः चे मन समजलेच नाही. ।।५।।

मुलगी, बायको, सून ही झाले,
आली आता आई होण्याची वेळ,
बाळा, साथ देईन रे तुला,
नाही होऊ देणार आयुष्याचा खेळ. ।।६।।

हात राहिले मोकळे,
मोकळी तिची ओंजळ,
नाही काही नेण्याजोगे,
आठवेन तुला सांज सकाळ. ।।७।।

***

सोपा नसे नारी जन्म हा...

(श्रीम. सोनाली देविदास रसाळ (घोडके)

प्राथमिक शिक्षिका, जि.प.प्रा. शाळा राशीन मुली, जि.अहमदनगर

सोपा नसे नारी जन्म हा
अनेक तुफाने यात मावली
प्रखर तेजाच्या अग्निमधूनी
सीता माऊली मूर्त जाहली... ।। १ ।।

रोजच येथे अग्नीपरिक्षा
मन मारुनी अनेक घटिका
तरीही सामर्थ्याचे पर्वत लेवून
सावरण्या जगास नारी
येथे उभी राहिली... ।। २ ।।

प्रश्नांनाही प्रश्न पडावे
संकटातही उभे रहावे
भावनांना देवून फाटा
कर्तव्यदक्षता पार पाडण्या
नारी येथे पुढे जाहली... ।। ३ ।।

शब्द नसे हा नारी अवघा
सामर्थ्याचा ध्यास नारी
आव्हानांचे उत्तर नारी
मानवतेची आस धरूनिया
नव्या जगाचा स्वप्नाचा श्वास नारी... ।। ४ ।।

***

सरोवर

(सौ. सुनेत्रा सुधाकर जोशी, ठाणे)

माझे मन माझे न राहिले
सरोवर मन माझे झाले ।।धृ।।

कर्दळ, चाफा, केवडा,
तगर, जास्वंदीही फुलली
रानसांज रात्रीने
रातराणी हुंगली ।।१।।

अंकुरल्या होत्या रोपवाटिका
कुंडीतली बाग सुस्त झाली
कुठे माझे मन रिझले
घरी परतण्या विसरले ।।२।।

***

पृथ्वीतलावर जी जी माणसं यशस्वी झाली आहेत, ती ती जास्तवेळा अपयशी झाली आहेत.

जुन्नर ता. कुंभार समाजोन्नती मंडळ महिलांचा हळदी-कुंकू समारंभ संपन्न

कर्तृत्वान महिलांचा यथोचित सत्कार करण्यात आला

खेळ रंगला पैठणीचा मध्ये विजेत्या महिलांसमवेत महिला अधिकारी व सुत्रसंचालक रामकृष्ण भागवत

विजेत्या महिलांसमवेत जुन्नर तालुका महिला कार्यकारिणी

जुन्नर ता. : कुंभार समाजोन्नती मंडळ महिला आघाडीच्या वतीने रविवार दि. २२/१/२०२३ रोजी मळगंगा माता मंदिर, कुंभार आळी, जुन्नर येथे हळदी-कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुणे जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा सौ. कल्पनाताई प्रताप शिंदे व त्यांच्या सहकारी यांच्या हस्ते श्री संत गोरोबा काका व मळगंगा माता यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

महिला आघाडी अध्यक्षा डिंगोरे गावच्या सरपंच सन्माननीय सौ. सीमाताई सोनवणे यांच्या संकल्पनेतून प्रथम समाजातील 'विधवा भगिनींना' हळदी-कुंकू लावून व वाण वाटप करुन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. पतीच्या निधनानंतर आपल्या प्रपंचाचा गाडा समर्थपणे हाकणाऱ्या विधवा-भगिनींचा कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच सन्मान केल्यामुळे त्या सर्वजणी भारावून गेल्या. त्यानिमित्त समाजातील एक अनिष्ट प्रथा बंद केल्यामुळे सर्वच महिलांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर उपस्थित सर्व महिलांना सौ. मनिषाताई सुनील जाधव यांच्यातर्फे वाणवाटप करण्यात आले.

हळदी-कुंकू कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांच्या मनोरंजनासाठी 'चला जिंकुया पैठणी' या कार्यक्रमाचे आयोजन रामकृष्ण भागवत यांनी केले. या कार्यक्रमात महिलांसाठी विविध खेळ, विनोद, उखाणे इ. चे आयोजन करण्यात आले. त्यात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व आनंद मिळवला. या होम मिनिस्टर कार्यक्रमात मानाची पैठणी मिळवण्यात प्रथम क्रमांक बोरी गावच्या सौ. दर्शना हेमंत जाधव, द्वितीय क्रमांक कुसूर गावच्या सौ. पूनम संतोष वाघ तर तृतीय क्रमांक ओतूरच्या सौ. सुजाता जगताप यांनी यश मिळविले.

या कार्यक्रमासाठी जुन्नर तालुक्याचे आमदार सन्मा. अतुलशेठ बेनके यांच्या सुविद्य पत्नी सन्मा. सौ. गौरीताई बेनके आणि जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्ष सौ. आरतीताई ढोबळे यांची उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी सर्व महिलांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

सौ. सुमनताई गोरे माजी अध्यक्ष, महिला आघाडी अध्यक्षा : सौ. सीमा सोनवणे, उपाध्यक्षा : सौ. लता शिंदे, खजिनदार : सौ. अश्विनी जाधव, सचिव : सौ. अंजली सोमवंशी, सहसचिव : सौ. मनिषा जाधव, उपाध्यक्षा जुन्नर : सौ. जिजा जगदाळे, उपाध्यक्षा आळेफाटा सुनिता भालेराव, उपाध्यक्षा ओतूर : आरती जगताप, उपाध्यक्षा ओझर : सौ. चैताली शिंदे, सौ. सुनिता भालेराव, जिल्हा कार्यकारिणी सदस्या : सौ. सुनिता रसाळ, सौ. सुषमा उकिर्डे, सौ. मोरे, सौ. पुष्पलता उकिर्डे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमासाठी संपूर्ण तालुक्यातील विविध गावांतून महिला व भगिनींचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमासाठी जुन्नर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ विविध आघाडींचे अध्यक्ष व संपूर्ण कार्यकारिणीचे मोलाचे सहकार्य लाभले. विवाह समिती अध्यक्ष राजेंद्र जाधव, जिल्हा कार्यकारिणीचे सुनील नारायण जाधव, संत गोरोबा काका पतसंस्थेचे गोरखनाथ उर्किडे साो., शिक्षक आघाडीचे अध्यक्ष सदानंद उर्किडे सर, बाबासाहेब जाधव सर, अध्यक्ष उमेश शिंदे सर इ. नी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांसाठी स्नेह भोजन आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र-संचालन रामकृष्ण भागवत, बाबासाहेब जाधव सर यांनी केले. अध्यक्ष उमेश शिंदे सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

***

प्रवास रस्त्यावरचा असो वा आयुष्याचा, संयमाने चालणारी माणसं त्याचा आनंद घेतात.

श्री संत गोरोबा काका प्रवेश द्वाराचे भूमिपूजन संपन्न
विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्या प्रयत्नाला यश

कार्यक्रमास उपस्थित महिला अध्यक्ष प्रभाताई भागवत, सविताताई कोल्हे, लताताई कोल्हे, निर्मलाताई व वैशालीताई नांदूरकर व पदाधिकारी

गोरोबाकाका प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करताना सुनिलभाऊ राणा व संस्थेचे पदाधिकारी

संस्थेचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार यांचा सत्कार हस्ते सुनिलभाऊ राणा व भगवानराव जामकर

अमरावती : अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय खासदार सौ. नवनितताई राणा यांच्या विकासनिधीतून साकार होणारे नियोजित श्री संत गोरोबाकाका प्रवेशद्वाराचे भूमिपूजन खासदारांचे प्रतिनिधी समाजसेवक सुनील भाऊ राणा यांचे शुभहस्ते श्री संत गोरोबा भवन शशीनगर बडनेरारोड अमरावती येथे कुंभार समाज बंधु–भगिनींच्या प्रचंड उपस्थितीत व शशीनगरवासी नागरिकांचे साक्षीने संपन्न झाले.

कुंभार समाजाची ही गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. अमरावती ते बडनेरा रोडवर खासदार व आमदार विकासनिधीतून अनेक संत महंतांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रवेशद्वार साकारण्यात आलेली आहेत, त्या प्रमाणेच श्री संत शिरोमणी गोरोबाकाका स्मृतिप्रित्यर्थ देखील प्रवेश द्वार असावे. ही समाजाची प्रबळ भावना होती.

श्री संत गोरोबा भवन, शशीनगर येथे कुंभार समाजाचे वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात व ह्या कार्यक्रमात सहभागी होण्यास जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातील कुंभार समाज प्रतिनिधी अमरावती शहरात दाखल होत असतात, त्यांना श्री संत गोरोबाकाका मंदिरात सुलभतेने पोहोचता यावे, या करीता मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार असणे आवश्यक होते. तसेच संत श्रेष्ठ श्री गोरोबा काकास स्मृतिद्वाराचे रूपाने आदरांजली अर्पण करावी व शहर सौंदर्यीकरण देखील व्हावे हे सर्व उद्देश ह्या प्रवेश द्वाराचे उभारणीतून साध्य होईल.

विदर्भ कुंभार समाज सुधार समितीकडून आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार रविभाऊ राणा यांनी त्यांच्या भाषणात प्रवेश द्वाराकरीता रू. १० लक्ष व मंदिराच्या वरच्या मजल्याच्या बांधकामास रु. २५ लक्ष बांधकाम निधी जाहीर केला होता. त्यानुसार त्यापैकी प्रवेशद्वाराची पूर्तता आजच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमातून आकार घेत असल्याची भावना कुंभार समाजातून व्यक्त होत आहे.

आजच्या कार्यक्रमात सुनील भाऊ राणा यांचे सोबतच युवा स्वाभिमानचे शहर अध्यक्ष सचिन भाऊ भेंडे, रक्तदान चळवळीचे प्रणेते विरेंद्र भाऊ उपाध्याय तसेच विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार, समाजोन्नती समितीचे अध्यक्ष पंजाबराव काकडे, सचिव डॉ. श्रीरामजी कोल्हे, पतसंस्थेचे अध्यक्ष भगवानराव जामकर, जिल्हाध्यक्ष सुनील भाऊ भागवत, विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव तांबटकर, कोषाध्यक्ष सतीशराव गावंडे, सचिव सुरेंद्र सरोदे, सहसचिव मधुकरराव खांडेकर, प्रसिद्धी प्रमुख डॉ. विलासराव नांदुरकर, गजाननराव वडुरकर, विनायकराव तायडे, नंदकिशोर काकडे, रमेशराव अ. अंबुलकर, रमेशराव ह. अंबुलकर, विनोदराव मेहरे, विलासराव धामणकर, गजाननराव काकडे, राजेंद्र भागवत, दिलीपराव खांडेकर, सुरेशराव नांदुरकर, मोहनराव नांदुरकर, नंदकिशोर नांदुरकर, रामेश्वरराव वडुरकर, अरुणराव पोहनकर, रविभाऊ काकडे, सुभाषराव वडुरकर, मुरलीधर चिल्लूरकर, डॉ. संजय साळविकर, राजेंद्र मांगुळकर, शंकरराव धामणकर, रूपरावजी खोपे, नायब तहसीलदार अशोकराव काळीवकर,

भूमिपूजन करताना सुनिलभाऊ राणा व मान्यवर

भूमिपूजन करताना पंजाबराव काकडे व मान्यवर

कुंभविकासचे संपादक दिगंबरराव इंगळे, शंकरराव गावंडे, सुनील काळकर, केशवराव मदनकर, मारोतीराव तांबट (मारोती मोटर्स) तसेच महिला अध्यक्ष श्रीमती प्रभाताई भागवत, सविताताई कोल्हे, सौ. अर्चनाताई खांडेकर, लताताई कोल्हे, निर्मलाताई नांदुरकर, वैशालीताई नांदुरकर, नंदाताई पोहनकर, सुषमाताई काळकर, मंदाताई काळे, वैशालीताई सरोदे, सविताताई काकडे, गोकर्णाताई कोल्हे, संगिताताई साळविकर, स्वातीताई साळविकर, नंदाताई शेंडोकार, कविताताई मेहरे, सुनिताताई काळकर, पुष्पाताई मदनकर, सुनिताताई गावंडे, पिंकीताई सातव, प्रतिभाताई गावंडे, मालतीताई गावंडे, ललिताताई वडुरकर, सुनिताताई धामणकर, जयाताई गावंडे, लताताई खोपे, किरणताई वडुरकर व कुंभार समाजातील महिला पुरुष व स्थानिक नागरिक खुप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

बुवांच्या सामाजिक कार्याची कसोटी

–राजेश बोबडे

सांप्रदायिक बुवांच्या सामाजिक कार्याच्या कसोटीबद्दल तुकडोजी महाराज म्हणतात, ''भारतवर्षात जेव्हा जेव्हा मनुष्याच्या अवनतीचा व धर्माच्या भ्रष्टतेचा कळस होत गेला तेव्हा तेव्हा संतमहंतांनी, शास्त्रीपंडितांनी व शूरवीरांनी धर्माचे अधिष्ठान स्थापन करूनच समाजाला उन्नत केलेले दिसते. त्यांचीच तशी सामूहिक वचनेही सापडतात की, ''मनुष्याने आपल्या वैयक्तिक स्वार्थाकरिता जगाचे नुकसान करणे हे जसे अतिपाप, तसेच आत्मज्ञान असताना समाजाला बंधन घालून त्याची वाढ आकुंचित भावनेने बंद करणे हेही महापापच समजले जाते.''

या त्यांच्या वचनाची ध्येयधारणा डोळ्यासमोर असताना समाज डोळ्यांपुढे आल्यानंतर, त्याच्यावर अवलंबून असलेल्या लोकांचे ऐहिक व पारमार्थिक ज्ञान किती व कसे पुढे जाईल याची शंका वाटते. ती प्रामाणिकपणे विचार केल्यास बुवालोकांनाही वाटतच असावी, असे स्पष्ट करून महाराज म्हणतात, ''दुसऱ्या बुवाजवळ गेल्यानेही जर त्यांच्या शिष्यगणांत बाधा येते तर धर्मावर विश्वासून असलेल्या लोकांचे ऐक्य कसे साध्य होणार? असे वाटू लागते. त्यांचे स्वतंत्र तत्त्वज्ञान ऐकले की वाटते, त्यांचा आणि जगाचा संबंध स्वप्नातही येत नसेल. फक्त येतो तो त्या मठातील झगडे सोडविण्यापुरताच! माझा मान कोणी का घेतला, या विषयाचा. अन्यथा लक्ष्यार्थाच्या चिंतन विषयाचा अर्थ संपला; असेच दिसून येते. इकडे जगाची परिस्थिती धर्मदृष्ट्या किती बिघडली, लोक उद्योगधंद्यांच्या दृष्टीने किती पतन पावले, मनुष्यातील मनुष्यपणाचा किती ऱ्हास झाला, प्रत्येकात किती भित्रेपणा शिरला, लोकांत किती अन्याय्य वृत्ती वाढली, गुंड लोकांत किती शीलभ्रष्टता चढली, याचे दृश्य डोळ्यांसमोर आले म्हणजे सर्वांत मोठा दोष धर्मप्रचारकांवरच का देऊ नये, असे वाटावयास लागते.''

महाराज स्पष्ट करतात की, ''धर्मप्रचारकांचा तो जिवंत इतिहास कुणीकडे, की ज्यांनी आपल्या डोळ्यांसमोर अन्याय्य वृत्ती दिसत असता आपले प्राण पणाला लावूनही समाजात धर्मतेज निर्माण केले. परंतु आजचे धर्मप्रचारकांचे कर्तव्य म्हणजे आपले जीवन कसे चालेल, याच्या वाटाघाटीत वाटेल त्यांची 'हाजी हाजी' करून आपल्या महत्त्वपूर्ण जीवनाचा व आपल्या धर्मात वर्णन केलेल्या तत्त्वज्ञानाचा नाश करणे एवढेच दिसून येते. महाराज म्हणतात त्याला अपवाद नसतील, ''असे माझे म्हणणे मुळीच नाही. परंतु सोन्यापेक्षा काशाचा आवाज अधिक असतो म्हणतात. त्यांतील सोन्याप्रमाणे असतील पडलेले ते कुठे! समजत असतील 'आपलाच उद्धार' अंतिम! लावीत असतील ते कुठे समाधी, करीतही असतील ते अधिकाऱ्यांना उपदेश; पण बहुजन समाजाच्या या गोंधळाची वाट काय? या मार्गात त्यांचा प्रयत्न मुंगीच्या पावलाप्रमाणेच दिसणार नि 'बुवा बुवा' म्हणून गाजले जाणारे लोक आपल्या अल्पज्ञानाने लगेच पाप्यांचे बुवा होणार, ज्ञानही सांगणार, समाजात आधिपत्यही मिळवणार नि समाज कोणीकडे जातो याची पर्वाही करणार नाहीत!

***

अहंकार हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.

R. S. ENTERPRISES

Reaching out to Serve....

Medical Equipment's & Devices

Following are the Companies & Products we mainly deal with,

- **Drager India Pvt. Ltd. -** ICU Ventilators, Transport Ventilators, Patient Monitors, Gas Lines, Anesthesia Work Stations, Baby Warmers & Many More
- **BBraun Medical India Pvt. Ltd. -** Aesculap (Neuro, Cardiac & General Surgery Instruments), All Transplant Instruments, Dialysis Machines, Syringe & Infusion Pump & Many More
- **Philips India Pvt. Ltd. -** Defibrillators, Monitors, BiPAP Machines & Many More
- **Godrej & Boyce Mfg. Co. Ltd. -** Hospital Furniture, ICU & Ward Beds
- **Johnson & Johnson Pvt. Ltd. -** Sutures, Plasma Sterilizers (ASP), Cautery's, Harmonic Machines, Surgery Equipment's
- **Remi India & Spire Automation -** ALL Lab related equipment's
- **BD/BARD India Pvt. Ltd. -** Onco Ports, Dialysis Permanent Catheters

SANTOSH RAJE

R. S. ENTERPRISES

Off. No. 10, First Floor, Off. No. 9, Ground Floor, Ruturang Society,
Aranyeshwar Mandir Road, Parvati, Pune - 411009

Mob.: 9371026632 / 9011093989

आमचे प्रेरणास्थान

सौ. कल्पना व श्री.प्रकाश शंकरराव भालेराव

श्री. निलेश प्रकाश भालेराव
Prop. Agasti Auto Link
Prop. Agasti Enterprises
Mob. 9921914777

श्री. निखिल प्रकाश भालेराव
Msc. Drug Chem, DDI Pune
Mob. : 97664 56456
Managing Director - Austres Pharmaceutical
Director - Ancure Animal Health Pvt. Ltd.
Prop. - My Chemist Group (Chain of Medicals)
Prop. - My Clinic (Chain of Clinics)

सौ. रुपाली निलेश भालेराव

कार्य

- **Austres Pharmaceutical Pvt. Ltd.**
  Corporate Office (India) :
  KK Market, 6th Floor, B - Wing,
  Office No. 58,Dhankawdi,
  Pune - 411 043.
  Branch Office (USA) :
  1950 Eldridge Pkwy, #6307,
  Houston, Texas 77077
- **Ancure Animal Health Pvt. Ltd.**
  Corporate Office (India) :
  S. No. 20/1/3, Chidanand Soc.,
  Silver Point Building, K.K. Road,
  Katraj, Pune - 411 046.
- **My Chemist**
  Corporate Office (India) :
  Vitthal Sadan, Abhinav College
  Road, Ner Silver Leaf Outlet, Katraj, Pune - 411 046.
- **My Clinic**
  Corporate Office (India) :
  Vitthal Sadan, Abhinav College
  Road, Ner Silver Leaf Outlet,
  Katraj, Pune - 411 046.
- **Agasti Enterprises**
  Import Export Solutions
- **Agasti Autolink**
  Corporate Office (India) :
  Jayandhi Complex, Office No. 5,
  Second Floor, Bhusar Market,
  Market Yard, Pune

www.austres.co.in | www.mychemist.com | www.myclinic.com

सी.पी. प्रजापति

विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.), महाराष्ट्र शासन

- संस्थापक अध्यक्ष - प्रजापति समाज विकास मंडळ (रजि.) नवी मुंबई
- प्रदेश अध्यक्ष - महाराष्ट्र, भागीदारी आंदोलन मंच
- अध्यक्ष - नार्थ इंडियन सोशल फाउंडेशन, नवी मुंबई
- अध्यक्ष - पनवेल, अंतर्राष्ट्रीय मानवाधिकार एसोसिएशन
- महासचिव - रायगड जिला, महाराष्ट्र पोलीस बॉईज असोसिएशन

१९४७ पासुनचे पुण्यातील पहिले

पाषाणकर गॅरेज

PROFESSIONAL SPRAY AND BAKE BOOTH

खास वैशिष्ट : पेन्टींग रुम

सर्व प्रकारच्या कार स्प्रे पेंटींग स्पेशालिस्ट

ॲक्सिडेंट जॉब व इन्शुरन्स क्लेमची कामे खात्रीशीर व योग्य भावात करुन मिळतील.

२५१/१, सदाशिव पेठ, भावे स्कुल समोर, पुणे - ३०.

फोन : ०२०-२४४७५७८८, ४०५८५५५.



* प्रोप्रायटर *

दत्तात्रय नानासाहेब पाषाणकर
मो. ९८२२०००५०३

सुरज सुरेश पाषाणकर
मो. ९८९००५९९९५

कै. बाळासाहेब उर्फ सुरेश नानासाहेब पाषाणकर

आमचे प्रेरणास्थान



श्री. पांडुरंग विष्णु कुंभार
निवृत्त उपअभियंता
जलसंपदा विभाग

सौ. ज्योती पां. कुंभार

डॉ. स्वप्निल पां. कुंभार
बी.डी.एस. (पुणे)

डॉ. सौ. सुचेता स्व. कुंभार
बी.ए.एम.एस.

ओम साई डेंटल क्लिनिक

किरण कॉम्प्लेकस, एस.टी. स्टँड समोर, कडेगाव,
जि. सांगली ४१५३०४.
दुरध्वनी : ०२३४७-२४२१४३

महालक्ष्मी अपार्टमेंट, गाळा क्र. २,
एस.जी.एम. कॉलेजसमोर, विद्यानगर, कराड,
जि. सातारा ४१५१२४



स्वाती इंजिनियरींग कं.
इंजिनियर्स व फॅब्रीकेटर्स

आणि

सारिका केबल्स

आमचे प्रेरणास्थान

कै. कुंडलिक कुंभार

श्री. सागर कुंडलिक कुंभार
Mo. : 9769697677

ऑफिस :
गजानन छाया, रोड नं. ३४, मोदी कंपनी समोर, जे. बी. सावंत बस स्टॉप मागे, वागळे इस्टेट, ठाणे - ४०० ६०४

E-mail : response@swatiengineering.com
Website: www_swatiengineering.com

मंदार आर्टस्

सर्वांग सुंदर गणेश मुर्ती व आर्टिकल्सचे उत्पादक

सुनिल कुंभार : 9423224147 विनिल कुंभार : 9422567430

सिद्धिविनायक आर्टस्

गणेश मुर्ती व आर्टिकल्स

मंदार सुनिल कुंभार

96 73 11 39 73, 78 75 116113

केदार आर्टस्

गणेश मुर्ती व आर्टिकल्स

केदार सुनिल कुंभार

7875116113, 9673 11 39 73

दत्तवाडी, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२

प्रेरणास्थान

राम रखमाजी शिर्के
मो.:9822549376

कै.रखमाजी शिर्के

चि.भूषण राम शिर्के
(D.C.E.)

राम वीट कारखाना

आमचेकडे चार व सहा इंची साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

✻ निवास ✻

मेदनकरवाडी, पो. चाकण, ता. खेड,
जि. पुणे-४१०५०१ मो.: ९७६३६९१९०७

अनिल मुरलीधर कुंभार
Mo. 9822596694

सुनिल मुरलीधर कुंभार
Mo. 9822919739

अभिजीत अनिल कुंभार
B.B.A.-MBA II

श्री साई कोल डेपो

राख व दगडी कोळसा ठोक व किरकोळ भावात मिळेल.

अभिजित विट कारखाना

ॐ साई मोटर्स

स्वयंवर मंगल कार्यालयासमोर, चाकण, ता. खेड, जि. पुणे.

निवास : धावडे वस्ती, गणेशनगर, भोसरी, पुणे 9270303222

आमचेकडे जुने ट्रक, एल.पी. व टेम्पो गाड्यांचे व्यवहार खात्रीपूर्वक केले जातील

प्रेरणास्थान

बी. एम. धुमाळ

श्री. गणेश धुमाळ

जय गणेश मेडिकल

अँड जनरल स्टोअर्स केमिस्ट अँड ड्रगिस्ट

साई मेडिकल

गंगाई चेंबर्स, पहिला मजला, मेन रोड, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

प्रोप्रा. गणेश बबनराव धुमाळ

कुंटे कॉम्प्लेक्स, मारुती मंदिराजवळ, मेनरोड,
आकुर्डी, पुणे-३५. मो. 9011561919

Ramesh Petroleum
Dealers Bharat Petroleum Corporation Ltd.
शिरसपेठ, प्रेसनाग रोड, नागपूर फोन:0712 2748412 E-mail : nareshgugele@gmail.com

विधेश्वरी माता बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, नागपूर

नागपूर के प्राईम लोकेशनपर सॅक्शन मिहान और कोंगोहबसे लगकर * बुटीबुरी * डोंगरगांव * पिपता * बेसा * बेलतरोही * हुडकेश्वर * रामा * पोही * मौदा * भानसोली में आसान किस्तोपर प्लॉट उपलब्ध...

नरेश प्रेमलालजी जुगेले
जिल्हाध्यक्ष
राष्ट्रीय मानवधिकार फोरम, नागपुर
राष्ट्रीय सदस्य
अ.भा.कुं.प्र. महासंघ, दिल्ली.
मो. 98225 67219
98812 30037

Ramesh Jugele
Mo. : 98227 10072
Jagdish Jugele
Mo. : 98812 30037

Sachin E Bike
Plot No. 479, Great Nag Road, Ashok Sq., Near Bharat Petrol Pump, Siraspeth, Nagpur - 440009.

नवप्रकाश इंडस्ट्रिज, नागपूर व स्व. प्रेमलाल जुगेले इन्स्टिट्युट ऑफ सायन्स ॲण्ड मॅनेजमेंट, बुटीबोरी, नागपूर.

TCAC

Adv. Abhay Raje
B.E. (Prod), MIE, MBA, LL.M.
Director

Tubular Coupling And Auto-Comp Pvt. Ltd.
Manufacturers of API Coupling & Auto Components
G-27, MIDC, Ahmednagar 414 111
Cell : + 91 9923284242 e-mail : abhaykraje@gmail.com
website : www.tcac.co.in

ॲड. अभय राजे
सर्व प्रकारचा कायदेविषयक सल्ला
८३३, बागडपट्टी, नेता सुभाष रोड, अहमदनगर ४१४ ००१
फोन (०२४१) २३४५४०१ मोबा. ९९२३२८४२४२

प्रेरणास्थान

कै. केदु शिवराम जोंधळे

श्रीमती सिंधुताई केदु जोंधळे

नंदकुमार केदू जोंधळे
माजी सरपंच शिरुर
अ.म.कुं.स. विकास संस्था
चांदवड तालुका उपाध्यक्ष
Mob. 9850482275 / 7588557011

जोंधळे वीट सप्लायर्स
आमच्याकडे 9 X 4 व 6 X 4 बांधकामासाठी लागणारी फुलसाईज विट मिळेल.

संजय केदू जोंधळे
Mob. 9096936741

प्रकाश केदू जोंधळे
Mob. 7588557010

मु. शिरुर (तांगडी फाटा),
पो. आडगाव टप्पा,
ता. चांदवड, जि. नाशिक
४२३ १०१.

प्रेरणास्थान

कै.रखमाजी शिर्के

चि. स्वप्निल उ. शिर्के
8446626822

उल्हास र. शिर्के
9921800902

मा. उल्हासराव रखमाजी शिर्के
विट कारखानदार

आमचेकडे दर्जेदार विटा होलसेल भावात मिळतील

मु. मेढनकरवाडी, पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे-४१०५०१. मो. : 9921800902

श्री आर्टस्

गणेश मुर्ती व गौरीचे

✻ होलसेल विक्रेते ✻

मु. पो. दत्तवाडी, ऊरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे - ४११ २०२

पंकज ह. कुंभार
मो. ९९२३१९४३९४

चरण ह. कुंभार
मो. ९९२३०६२७०६

श्री. हनुमंत भिकु कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9822394711

विट कारखानदार
राज ट्रान्सपोर्ट
राजेंद्र ट्रान्सपोर्ट

आमच्याकडे सर्व साईजच्या उत्तम प्रतिच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु.पो. पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे

श्री. राजेंद्र हनुमंत कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9049917111

चि. आरुष राहुल कुंभार

गडहिंग्लज तहसील कार्यालयासमोर उपस्थित मोहनराव जगदाळे समवेत चंद्रकांत कुंभार, संतोष कुंभार व पदाधिकारी

गडहिंग्लज तहसिलदार यांना कुंभार समाजाच्या मागण्यांचे निवेदन देताना मोहनराव जगदाळे व तालुका पदाधिकारी

मोहनराव जगदाळे यांचे समवेत कोल्हापुर जिल्ह्याचे नेते चंद्रकांत कुंभार, संतोष कुंभार, गोरंबेकर, एम.आर. कुंभार, प्रकाश कुंभार (सरवडेकर), संजयकाका निगवेकर व मान्यवर

कोल्हापूर : दि. २७ व २८ जानेवारी २०२३ रोजी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनरावजी जगदाळे कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. गडहिंग्लज तालुक्यातील कुंभार समाजाचे प्रश्न समजून घेतल्यानंतर तेथील तहसील कार्यालयात जाऊन कुंभार समाजातील प्रत्येक नागरिकास हिंदू - कुंभार (ओबीसी) जातीचे दाखले मिळालेच पाहिजेत, ज्यांच्याकडे १९६७ पूर्वीचे लेखी रेकॉर्ड सापडत नाही, त्या नागरिकांसाठीही तहसीलदार/प्रांताधिकारी यांनी चौकशी अहवाल तयार करून सदर नागरिकांस हा कुंभार समाजाचाच आहे. याची खात्री शासन दरबारी देऊन, सदर व्यक्तीस हिंदू - कुंभार (ओबीसी) प्रमाणपत्रे लवकरात लवकर द्यावीत यासाठी तहसील कार्यालयात जाऊन, अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून जातीच्या दाखल्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी मोहीम हाती घेतली.

चंदगड तालुक्यात जाऊनही समाज बांधवांच्या विविध समस्या समजून घेतल्या व स्थानिक कुंभार संघटना आणि अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था तेथे संलग्नपणे काम करतील यासाठीची लेखी प्रक्रियाही पार पाडली.

दि. २८ रोजी गडहिंग्लज तालुक्यातील गावांना भेटी देत असताना वारनुळ गावातील माठ बनविणाऱ्या कारागिरांनी जास्तीत जास्त आधुनिक तिकडे वळावे आपल्या व्यवसायात जास्तीत जास्त यांत्रिकता आणावी यासाठीही मार्गदर्शन केले. अखिल महाराष्ट्र कुंभार विकास संस्था व कोल्हापूर जिल्हा कुंभार समाज संस्था संलग्नपणे काम करतील यासाठी तेथील स्थानिक जिल्हा पदाधिकाऱ्यांबरोबर विचार विनिमय केला. आणि त्याबाबत तिथली सर्व प्रक्रिया लवकरात लवकर पार पाडावी यासाठी आवाहनही केले. त्यावेळी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे बळवंतरावजी कुंभार (फलटण), प्रकाश कुंभार - सर (बारामती), महेश कुंभार - सर अध्यक्ष सांगली), चंद्रकांतजी कुंभार - सर (गडहिंग्लज), संतोषजी कुंभार (गडहिंग्लज), संजयकाका निगवेकर,प्रकाशजी सरवडेकर, चंद्रकांतजी कुंभार, सागरजी कुंभार, महेशजी कुंभार इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

***

सिंधुदुर्गच्या रितेज चिंदरकरची अमेरिकेत गरूडभरारी

अमेरिकेतील दरदर्शन, वृत्तपत्रांनी घेतली दखल, सिंधुदुर्ग कुंभार संघटनेने केले अभिनंदन!

कणकवली तालुक्यातील हरकुळ गावचे रहिवाशी रविंद्र दत्ताराम चिंदरकर यांचा सुपुत्र कु. रितेज रविंद्र चिंदरकर हा अमेरिकेत सायबर सिक्युरिटी या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत असून अमेरिकेत झालेल्या स्पर्धेत त्यांने प्रथम क्रमांक मिळविला आहे. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी अमेरिकेतील अल्मो (AFCEA) कॅपचर ऑफ फ्लॅग कॉम्पीटेशन हॅकथोन (C T F) या जागतिक संघटनेने सायबर सिक्युरिटी या विषयावर स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेत रितेज चिंदरकरने प्रबंध सादर करून प्रथम क्रमांक मिळविला. अमेरिकेचे ब्रीगेडीअर जनरल जेफ्री हील व मेजर जनरल मॅथ्यु डीन मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रितेजच्या या यशाची अमेरिकेतील दूरदर्शन व वृत्तपत्रांनी दखल घेऊन मोठी प्रसिद्धी देण्यात आली. रितेजच्या या यशाबद्दल त्याच्या युनिर्व्हसिटीला १२५०० डॉलर्स म्हणजे साडेअकरा लाख रूपये व रितेजला ५००० हजार डॉलर्स म्हणजे सव्वाचार लाख रूपये आयोजकांतर्फे बक्षिस देण्यात आले. रितेजचे प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असून कॉम्प्युटर सायन्स विषय घेऊन त्यांने बारावी पुर्ण केली. सावित्रीबाई फुले युनिर्व्हसिटीच्या डी वाय पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअर ही पदवी संपादन केली. पुढील शिक्षणासाठी तो अमेरिकेत गेला असून सायबर सिक्यूरिटी हा विषय घेऊन तो अमेरिकेतील मेरीज युनिर्व्हसिटीसॅन ॲनेटॉनी टॅक्सेस मध्ये तो पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. रितेजच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सिंधुदुर्ग कुंभार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. गणपत शिरोडकरनी रितेजचे अभिनंदन केले असून ते म्हणाले रितेजने आज समाजाचे नांव उज्वल केले आहे. समाजातील इतर तरूणांनी रितेजचा आदर्श घेऊन समाजाचा उत्कर्ष साधावा असे सांगितले. रितेजचे वडील एम कॉम असून टाटा स्टील पुणे मध्ये ते अकौंट ऑफिसर आहेत तर आई सौ. सुवर्णा पदवीधर गृहिणी आहेत.

***

ॲड. डॉ. सोपान बुडबाडकर यांच्या पाचव्या पुस्तकाचे प्रकाशन

पुस्तकाचे प्रकाशन करताना अशोक नायगावकर व मान्यवर

पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अरुणाताई ढेरे यांच्या हस्ते सोबत मान्यवर

भारतातील पहिले बहुभाषिक ''पुस्तक आदान प्रदान प्रदर्शन'' डोंबिवली येथे संपन्न झाले. तेथील कवी संमेलनात कवी सोपान विठ्ठल बुडबाडकर यांना कविता सादर केल्याबद्दल सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे कवी ॲड. डॉ. सोपान बुडबाडकर यांच्या ''ह्यालाच का प्रेम म्हणायचं?'' या चौथ्या काव्य संग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध जेष्ठ कवी अशोक नायगावकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले तर ''असतात सारेच झपाटलेले'' या पाचव्या काव्य संग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध कवयित्री, संत साहित्य अभ्यासक डॉ. अरुणाताई ढेरे (मा.साहित्य संमेलन अध्यक्षा) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. कवी शुक्राचार्य गायकवाड, पै फ्रेंड्स लायब्ररीचे संस्थापक पुंडलिक पै, जेष्ठ पत्रकार अनिकेत घमंडी (दैनिक लोकमत), आनंद कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष हेमंत नेहते, साहित्यिक डॉ. योगेश जोशी आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. सद्गुरू प्रल्हाद दादा वामनराव पै यांना ''असतात सारेच झपाटलेले'' हे पुस्तक देण्यात आले. ''पुस्तक आदान प्रदान प्रदर्शन'' निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या अनेक मान्यवर तसेच सुप्रसिद्ध व्यक्तींचे महत्त्वपूर्ण लेख असलेल्या 'कॉफी टेबल बुक' मध्ये ॲड. डॉ. सोपान बुडबाडकर यांच्या देखील लेखाचा फोटोसह समावेश केला आहे. या सर्व गोष्टींबद्दल ॲड. डॉ. सोपान बुडबाडकर यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. सर्व चाहत्यांना, रसिकांना आणि हितचिंतकांना मनापासून धन्यवाद!

गिरीधर केळुसकर, अध्यक्ष.

ॲड. सोपान बुडबाडकर मित्र मंडळ, मुंबई.

***

डॉ. बाबुराव उपाध्ये लिखित 'भारतीय कुंभार समाजातील संत' एक दुर्मिळ संशोधन ग्रंथ - संजय उकिरडे

श्रीरामपूर : येथील साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या भारतीय कुंभार समाजातील संत संशोधन ग्रंथ प्रकाशन झाले. त्याप्रसंगी डावीकडून कु. प्राजक्ता उकिरडे, राजेंद्र उकिरडे, लेखक डॉ. बाबुराव उपाध्ये, संजय उकिरडे, देवराम वाकचौरे, गणेशानंद उपाध्ये छायाचित्रात दिसत आहेत.

श्रीरामपूर : भारतीय संतांनी भक्ती आणि समाजशक्तीला त्यांच्या उक्ती, कृतीतून बळ दिले. विविध सामाजिक घटकातील संतांचे साहित्य संशोधन झाले पाहिजे, यादृष्टीने डॉ. बाबुराव उपाध्ये लिखित 'भारतीय कुंभार समाजातील संत' हा एक दुर्मिळ, परिश्रमपूर्वक निर्माण केलेला संशोधनग्रन्थ असल्याचे मत बेलापूर बदगी येथील रयत शिक्षण संस्थेतील चित्रकला शिक्षक आणि कुंभार समाजाचे कार्यकर्ते पत्रकार संजय उकिरडे यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर येथील इंदिरानगर वाचन संस्कृती प्रतिष्ठान वाचनालयात डॉ.बाबुराव उपाध्ये यांच्या 'भारतीय कुंभार समाजातील संत' या प्रकल्प संशोधन ग्रन्थाचे प्रकाशन संजय उकिरडे आणि मान्यवरांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी संत गोरा कुंभार आणि सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संजय उकिरडे, कोतुळ येथील पत्रकार राजेंद्र उकिरडे, कु. प्राजक्ता उकिरडे,धांदरफळ येथील देवराम वाकचौरे यांना शाल, पुस्तके, बुके देऊन प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष गणेशानंद उपाध्ये, सचिव सौ. आरती उपाध्ये यांनी सत्कार व नियोजन केले. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी 'भारतीय कुंभार समाजातील संत' या संशोधन ग्रन्थाची निर्मिती आणि अनुभव सांगितले. महाराष्ट्रात तेर येथील संत गोरा कुंभार यांचे मध्ययुगीन काळात वारकरी संप्रदायात मोठे योगदान आहे.

इ.स. १२६७ ते १३१७ या ५० वर्षाच्या जीवनवाटचालीत संत गोरा कुंभार हे एक विठ्ठल भक्तीत तल्लीन झालेले संत झाले, त्यांचे आज २३ अभंग उपलब्ध आहेत, त्याचप्रमाणे संत राका कुंभार (गुजरात), संत कुबा कुंभार (राजस्थान), श्रीयादेमाता (मध्यप्रदेश), संत कवयित्री मोल्लाम्बा (आंध्रप्रदेश), संत सर्वज्ञ (कर्नाटक) असे प्रत्येक प्रांतात कुंभार समाजात संत आहेत. कुंभार समाजाचा इतिहास, पहिले ते तिसऱ्या शतकातील सातवाहन, शालिवाहन काळ यांचा प्रदीर्घ आढावा ह्या ग्रन्थात घेतला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या अनुदानातून हे संशोधन निर्माण झाले असून पुणे येथील डॉ. स्नेहल तावरे यांच्या स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे हा १९६ पृष्ठाचा ग्रन्थ निर्माण झाला आहे, असे डॉ. उपाध्ये यांनी सांगितले. संजय उकिरडे यांनी हा ग्रन्थ म्हणजे कुंभार समाजातील एक दिशादर्शक संशोधन आहे, असे संशोधन विद्यापीठ पातळीवर फारसे झालेले नाही.

नव्या अभ्यासकांनी असे दुर्मिळ, दुर्लक्षित विषयावर संशोधन केले तरच माय मराठीचे अभिजात मूल्य प्रतिष्ठित होईल असे सांगून डॉ. उपाध्ये यांना अमरावतीचा शब्दांगण साहित्य पुरस्कार, आमदार लहू कानडे यांच्या लोकहक्क फाऊंडेशनचा पुरस्कार लाभल्याबद्दल फेटा, शाल, बुके देऊन सत्कार केला.

राजेंद्र उकिरडे, प्राजक्ता उकिरडे यांनी डॉ. उपाध्ये यांची अनेक पुस्तके मिळल्याबद्दल समाधान व्यक्त केले. वाचन संस्कृती वाढविणारे कार्य आणि सुंदर वाचनालयाचे कौतुक केले. सौ. आरती उपाध्ये यांनी आभार मानले.

कुंभार समाज संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी कल्याणकर

शहापूर : अखिल ठाणे जिल्हा कुंभार समाज संस्थेच्या रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्षपदी शहापूर तालुक्यातील खातिवली येथील निवृत्त शिक्षक भास्कर कल्याणकर यांची निवड झाली आहे.

अखिल ठाणे जिल्हा कुंभार समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र पान्हेरकर यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने या रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी संस्थेच्या वतीने कल्याण कुंभार वाड्यातील गोरोबा काका सभागृहात रविवारी २६ फेब्रुवारीला विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी या रिक्त पदी भास्कर कल्याणकर यांची निवड करण्यात आली. शासकीय योजनांच्या माध्यमातून कुंभार समाजाचा सर्वांगीण विकास व पारंपरिक माती व्यवसाय जोपासण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित करणार असल्याचे कल्याणकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मोहन कुंभार, कमलाकर केंबुलकर, विष्णू दहिलकर, संदीप पाटील, रमाकांत गोरे, मधुकर सोनावळे, भाऊ जाधव, प्रकाश सोनावळे, काशिनाथ सोनावळे, गोपाळ सोनावळे, राजेश हीवरेकर, कविता पान्हेरकर, संतोष चौळकर, भगवान केंद्रे, यशवंत आष्टेकर, भगवान सोनावळे यांच्यासह संस्थेचे आजीव सभासद उपस्थित होते.

***

मौन आणि एकांत हे माणसाचे सर्वात चांगले मित्र आहे.

जातं, खलबत्त्यात बनविलेला मसाला सातासमुद्रापार !

'शेफ मसाला' नावाने विकसित केला स्वत:चा ब्रॅण्ड : पारंपरिक उत्पादनाला मोठी मागणी

संतोष कानगुलकर

छत्रपती संभाजीनगर : पूर्वी घरोघरी पारंपरिक पद्धतीने, निवडून, पाखडून जातं-खलबत्त्याच्या साह्याने पारंपरिक मसाले तयार केले जायचे. याचा सुगंध घरभर दरवळायचा अन् चव तर अप्रतिम असायची. मात्र, ही पद्धत काळाच्या ओघात बंद झाली. पॅकेटमधील मसाले आले पण चव मात्र पार बिघडून गेली. त्यामुळेच जातं, खलबत्त्याच्या सहाय्याने तयार केलेल्या मसाल्याला पसंती देणारा मोठा वर्ग आजही आहे. यातील मार्केटचा अभ्यास करुन खुलताबाद (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील संतोष कानगुलकर यांनी पारंपरिक पद्धतीने जातं. खलबत्त्यात तयार केलेल्या मसाल्याचे स्टार्टअप सुरु केले. त्यांनी तयार केलेल्या मसाला सातासमुद्रापार गेला असून अमेरिका, फ्रान्स, लंडन येथे राहणाऱ्या भारतीयांकडून मागणी आहे.

संतोष कानगुलकर हे शिंदी गाव (ता. उमरी, जि. नांदेड) येथील आहेत. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण गावाकडेच झाले. वडील मातीची भांडी तयार करीत असल्याने हातात फार पैसा येत नव्हता. त्यामुळे संतोष यांनी किराणा तसेच कापड दुकानात काम करत असताना बारावी उत्तीर्ण केली. इतिहास विषयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. तसेच फुड टेक्नॉलॉजीची डिग्री घेतली. त्यांनी काही वर्ष एक शिक्षण संस्थेत काम सुद्धा केले. मात्र संस्था बंद पडल्याने त्यांना नैराश्य आले. त्यानंतर ते कामाच्या शोधात छत्रपती संभाजीनगर शहरात आले. त्यावेळी त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे कौशल्य नव्हते. २००२ मध्ये त्यांना शहरातील एका कँन्टीनमध्ये ८०० रुपये प्रती महिन्याने काम मिळाले. सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत ते काम करत होते. त्यांच्या महिन्याचा खर्च त्यावेळी फक्त ७५ रुपये एवढा होता. कॅन्टीट मध्ये काम करतांना ते जेवण तयार करायला शिकले. त्यांच्या हाताला चव असल्याने ते काही वर्षात चांगले शेफ बनले. २००७ मध्ये त्यांनी स्वत:ची मेस सुरु केली. त्यावेळी मेसचे ७०० रुपये होते. काही वर्ष मेस चालविल्यानंतर २००९ मध्ये त्यांना खुलताबाद येथील एका एनजीओमध्ये नोकरी लागली. त्यानंतर त्यांनी हॉटेल मॅनेजमेंटचे ट्रेनिंगसुद्धा घेतले.

कोरोनात मिळाली व्यवसायाची दिशा

कोरोना लागल्यानंतर संतोष कानगुलकर हे संकटात आले. वडीलांचा जॉब गेला. जवळचे पैसे संपत आले. घर घेतलेले असल्याने ईएमआय कसे भरायचे याची चिंता होती. त्यामुळे पुन्हा व्यवसाय करण्याचे त्यांनी ठरविले. मात्र व्यवसाय करण्यासाठी पैसे नव्हते. घरात चर्चा केल्यानंतर मुलांकडील डब्यात २१५० रुपये निघाले. या पैशातून २०२१ या वर्षी पारंपरिक पद्धतीने मसाले तयार करण्याचे ठरविले.

घरातील दोन जात्यांवर आई, पत्नी आणि मुलांच्या सहाय्याने मसाले तयार करण्यास सुरुवात केली. संतोष यांना सर्वजण शेफ या नावाने ओळखतात त्यामुळे त्यांनी 'शेफ मसाले' असा ब्रॅण्ड विकसित केला. अन्न-औषध विभागाकडून लायसन्स काढले, ट्रेड मार्क नोंदणीकृत केले. त्यांनी तयार केलेल्या मसाल्यास चव असल्याने त्याची सर्वत्र मागणी वाढली. जात्यावर ते पारंपरिक पद्धतीने १५ ते २० किलो मसाले तयार करतात. तसेच ऑर्डर नुसार सुद्धा ते मसाले तयार करुन देतात.

शेंगदाणा चटणी चिकन मसाला मिसळ मसाला

२९ प्रकारचे मसाले :

कानगुलकर हे पारंपरिक पद्धतीने २९ प्रकारचे मसाले तयार करतात. यात पनीर मसाला, चिकन मसाला, मटण मसाला, बिर्याणी मसाला, बैंगन मसाला, कालवण मसाला, हळद पावडर, मिरची पावडर, चहा मसाला, सोलापुरी काळा मसाला, तंदुरी मसाला, शेंगदाणा चटणी, जवस चटणी, तीळ चटणी असे मसाले तयार करत आहेत. त्यांच्याकडील चिकन, काळा मसाला आणि शेंगदाणा चटणी स सर्वाधिक मागणी असते. पुणे, मुंबई, नागपूर अशा शहरातून त्यांना ऑर्डर येतात. तसेच अमेरिका, फ्रान्स, लंडन येथे राहणारे भारतीय त्यांच्याकडून मसाले मागवून घेतात. ऑर्डर आली की ते पोस्टाने मसाले पाठवतात. त्यांच्याकडे महिन्याला ५ ते ६ क्विंटल मसाला तयार होतो.

***

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

कुंभार काम ते राष्ट्रीय खेळाडू 'मच्छिंद्र सदाशिव कुंभार'

सकाळी आई-वडिलांचे बरोबर चुली करत राहिलेल्या वेळेत अभ्यास करीत असत परत सायंकाळी शाळेतून आलेनंतर तयार केलेल्या चुली डोक्यावरुन घेऊन वडिलांचे बरोबर विकणेसाठी जाणे हा रोजचा दिनक्रम होता. शनिवार रविवार क्रिकेट खेळासाठी वेळ देत. आई-वडिलांची पुण्याई व कमजोर परिस्थितीतसुद्धा न डगमगता केलेल्या कामामुळेच आज या पदापर्यंत पोहचता आले.

कुटुंबीयासमवेत मच्छिंद्र कुंभार.

ना. चंद्रकांतदादा पाटील यांचे हस्ते पुरस्कार स्विकारताना मच्छींद्र कुंभार व परिवार

जन्माला आला तो एक लढवया म्हणूनच. लहानपणी जन्म झाल्यानंतर एक महिन्यातच जास्त ताप आल्यामुळे पोलिओ झाला व उजवा हात निकामी झाला. १९७९ साली वारनूळ तालुका पन्हाळा येथील खेडेगावात जन्म झाला. दवाखान्यात जायचे तर तीस किलोमीटर कोल्हापूर येथे घेऊन जावे लागत होते. त्यावेळी कुठल्याही प्रकारची वाहनाची सोय नसल्यामुळे व आई-वडिलांना नवसाने झालेले मूल यामुळे बाहेर कुठे घेऊन जायचं नाही म्हणून घरीच उपचार केले आणि त्यामुळे उजवा हात कायमचा नाजूक होऊन अपंगत्व आले. प्राथमिक शिक्षण रांगोळीतील कुमार विद्यामंदिर येथे झाले. लहानपणापासून हुशार असल्याने चौथी व सातवी स्कॉलरशिप परीक्षा पास होऊन स्कॉलरशिप मिळाली. घरची परिस्थिती अत्यंत गरिबाची असल्याने जिद्दीने प्राथमिक शिक्षण पूर्ण केले व माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेची निवड केली. घरची गरीब परिस्थिती असूनसुद्धा आई-वडिलांनी दिवसभर कुंभारकाम करुन शिक्षणासाठी काही कमी पडू दिले नाही. दहावी पास झाल्यानंतर कॉलेजसाठी तीच शाळा निवडली. अकरावीला असताना क्रिकेटचा छंद जडला. त्यावेळी कै. अभय किनिंगे, शांतिनाथ पाटील, कमलाकर पाटील नेहमी लेदन वॉलवर प्रॅक्टिस करायचे त्यांचा खेळ बघूनच क्रिकेटची आवड निर्माण झाली. रोज शाळेतून आल्यानंतर सायंकाळी क्रिकेट बघायला जायचे. कित्येक दिवस मारलेला बॉल आणणे स्टंप लावणे हीच कामे करीत क्रिकेटमध्ये तयार झाले. अकरावीत असताना १९ वर्षांखाली जिल्हा निवड स्पर्धेसाठी गेले, पण निवड झाली नाही. त्यामुळे इचलकरंजीचे बाबा मुळीक, पांडुरंग साळगावकर यांचे प्रशिक्षक यांच्याकडे क्रिकेटचे प्राथमिक धडे घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी डावखुरी गोलंदारी करत असल्यामुळे बॉल चांगला ओळायचा हे पाहून मुळीक सरांनी सांगली येथील जिल्हा

प्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांचेसमवेत मच्छिंद्र कुंभार.

निवड स्पर्धेत पाठवले तिथेच खऱ्या अर्थाने मच्छिंद्र यांच्या क्रिकेटची सुरुवात झाली. नागपूर येथे जिल्हास्तरीय स्पर्धेत सांगलीकडून खेळताना पहिल्या मॅचमध्ये पुणे विरुद्ध ६७ बॉलमध्ये ११० काढल्या. या सिरीजमध्ये नागपूर जळगाव सातारा विरुद्ध तीन अर्धशतके नोंदवत व चांगली गोलंदाजी केली. त्या स्पर्धेत वेस्ट फलंदाज किताब मिळाला. हा खेळीमुळे महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली. सलग पंधरा वर्षे महाराष्ट्र टीमसाठी खेळले. या पंधरा वर्षात तीन वर्षे महाराष्ट्राचा कर्णधार व तीन वेळा उपकर्णधार पद मच्छिंद्र यांनी भूषविले. महाराष्ट्र संघाकडून खेळताना ओपनर फलंदाजी व गोलंदाजी करुन आठ वेळा मॅन ऑफ दि सिरीज पाच वेळा उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

२००३ ला अजित वाडेकर यांनी मच्छिंद्र यांचे खेळाबाबत मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी माहिती सांगितली. सरकारी नोकरीसंदर्भात चर्चा केली. मच्छिंद्र यांचे खेळातील योगदानाची दखल घेत तात्कालीन

आयुष्यात खरं प्रेम, खरी माया फार दूर्मिळ असते.

जिल्हाधिकारी पवार यांनी शासकीय सेवेत तलाठी या पदावर नियुक्ती केली. या कामी मच्छिंद्र यांना महाराष्ट्र रणजी खेळाडू बाबा सिंधीये, दिलीपभाई लोखंडे पुणे यांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. शासनाच्या सेवेत तलाठी म्हणून काम करत असताना अनेक लोकाभिमुख कामे करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे आदर्श तलाठी म्हणून अनेक पुरस्कार मिळाले. तलाठी काळात केलेल्या लोकाभिमुख कामामुळे बढती होऊन सन २०१८ रोजी मंडळ अधिकारी म्हणून कागल येथे नियुक्ती झाली. मच्छिंद्र आज कागल तालुका येथे कार्यरत आहे. चालू वर्षी उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून पुरस्कार मिळाला आहे. सन २०१८ साली महाराष्ट्र क्रिकेट व ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशनकडून तत्कालीन महसूलमंत्री चंद्रकांत दादा पाटील अजित वाडेकर अशोक वाडेकर यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले. तसेच शासकीय व क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राजश्री शाहू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या वर्षी बीसीसीआय पुरस्कृत दिव्यांग क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या मॅनेजरपदी नियुक्ती झाली. या सर्व काळात मच्छिंद्र यांना मौलाची साथ लाभली ती म्हणजे मित्र महावीर हुजूरगे, शेखर वडगावे, राहू भोसले, राजीव बुगटे, भिकाजी कोडोली यांची. प्रत्येक स्पर्धेवेळी दिवसभर मच्छिंद्र यांचेकडून प्रॅक्टिस करुन घेत होते. गरीब परिस्थितीमुळे क्रिकेट स्पर्धेसाठी जाण्यासाठी आर्थिक अडचण यायची यावेळी उदय पतसंस्था, बाळासो कागवाडे इचलकरंजी येथील डॉक्टर दिलीप देशमुख यांनी आर्थिकदृष्ट्या मदत केली. वयाची ५० वर्षे झाली, परंतु क्रिकेटचे वेड सुटले नाही. नोकरी करीत गावातील तरुण खेळाडूंना मार्गदर्शन करणे चालूच आहे. गावात खेळासाठी चांगले मैदान नसलेची खंत आहे. गावात चांगले खेळाडू होणेसाठी सतत प्रयत्न करीत आहेत. सर्वसामान्य कुटूंबातून वर आलेची जाणीव असलेमुळे गावातील गरीब खेळाडूंना मदत करीत आहेत.

पहिला मुलगा व्हावा म्हणून आई-वडिलांनी नवस केला होता आणि मच्छिंद्र जन्माला आला, परंतु याच मच्छिंद्र यांचे पदरात देवाने मुलांचे रुपात दोन मुली जन्माला घातल्या. आपणास मुलगा नाही याची कोणतीही खंत न मानता या मुलींना चांगले शिक्षण दिले. यामधील थोरली मुलगी सायली आज इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंगमध्ये युनिव्हर्सिटी गोल्डमेडलिस्ट आहे. सध्या ती एम.पी.एसी.ची तयारी करीत आहे. दुसरी मुलगी मानसीने आय.टी. डिग्री पूर्ण केली आहे. ती सध्या टाटा कंपनीत नोकरीस आहे. यावरून मच्छिंद्र यांनी खेळाबरोबर शैक्षणिक वारसा जपला आहे हे दिसून येते.

२०२० ते २०२१ कोरोनाचे महामारीत घरातील सर्व कोरोना बाधित असतानासुद्धा अनेक गरीब कुटुंबांना आर्थिक मदत केली. गावात बाहेरुन येऊन राहिलेल्या एका निराधार कुटुंबाचा पूर्ण जबाबदारी घेत माणुसकी जिवंत ठेवली.

हे करीत असताना निसर्गावर असणाऱ्या प्रेमापोटी गावात वृक्षवल्ली ग्रुपचे माध्यमातून अनेक झाडांची लागवड केली. रोज सकाळी खेळायला आलेनंतर स्मशानभूमीतील झाडांना पाणी देनेचे काम केले. यामुळे उन्हाच्या तडाख्यातसुद्धा ही झाडे आज बहरली आहेत.

***

सोशल कनेक्ट

पारम्परिक मूर्तिकार संघाची महाराष्ट्र टाइम्स नागपुर येथे सोशल कनेक्ट उपक्रमांअंतर्गत कुंभार समाज उगम व विकास, कुंभारांचे प्रकार, व्यवसायाचे प्रकार, संघटना, संघटनेचे कार्य, आजची व्यवसायिक स्थिति, व्यवसायिक समस-

या व शासनाकडून अपेक्षा अश्या अनेक विषयावर एक तास पत्रकार प्रवीण लोनकर यांचेशी दिलखुलास चर्चा झाली.

निवासी संपादक अपराजित यांनी समाज व संघटनाचे नाते घट्ट व्हावे त्यांच्यात सतत संपर्क व संवाद वाढवा म्हणून आपणास खास निमंत्रित केले व आपण उत्सफुर्त प्रस्तिसाद दिल्याबद्दल सर्व समाज बांधवांचे अभिनंदन केले. बैठकीचे संयोजक सुरेश पाठक यांनी कुंभार समाजाला महाराष्ट्र टाइम्सच्या भव्य कैनवास उपलब्ध करुन शासन-प्रशासन व लोकप्रतिनिधीच्या समक्ष कुंभार समाजाचे वास्तव चित्रित केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले.

बैठकीचे विशेष वैशिष्ट्य श्री संत गोरोबा काकाच्या सजीव चरित्राच्या एकपात्री प्रयोगाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

बैठकीला प्रामुख्याने पारम्पारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघाचें अध्यक्ष सुरेश पाठक, अ. भा. प्रजापती कुंभार समाज संस्थाचे सचिव चन्दनलाल प्रजापती, हस्तशिल्पी बहुउद्देशिय संस्थाचे कोषाध्यक्ष गजानन बुरबादे, कुंभार प्रगती मंडळचे रामेश्वर चौधरी, कुंभार समाज सेवा पंचकमेटीचे राजीव खरे, बबलू जुगेले, अनिल धनोरे सह बहुसंख्याने समाज बंधु उपस्थित होते.

***

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

पीओपी मूर्ती नकोच : पारंपरिक मूर्तिकार - हस्तकला कारागिरांचा संकल्प

राज्यातील पारंपरिक मूर्तिकार आणि हस्तकला कारागिरांच्या बैठकीत पीओपी मूर्तीबंदीचा एकमताने ठराव पारित करण्यात आला.

नागपूर : शहरात अवैधपणे येणाऱ्या पीओपी मूर्तीमुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुंभार समाजाला फटका बसतो. त्यामुळे पीओपी मूर्तींना हद्दपार करा, अशी भूमिका पारंपरिक मूर्तिकार व हस्तकला कारागिरांनी मांडली. पीओपी मूर्ती बनविणार नसल्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

पारंपरिक मूर्तिकार व हस्तकला कारागिर संघाच्या वतीने नाशिक येथील संत नरहरी महाराज सभागृहात मूर्तिकार प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. नागपूरच्या प्रतिनिधींचाही यात समावेश होता. या बैठकीला सिंधुदुर्ग जिल्हा मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष बापू सावंत, मूर्तिकार कारागीर संघाचे अध्यक्ष सुरेश पाठक, कुंभार मातीकला विकास संस्थेचे अध्यक्ष मारुती कुंभार, शिल्पकार आशिष बेलवनकर, यवतमाळ जिल्हा मूर्तिकार संघटनेचे संजय मसके यांच्यासह गुड्डू प्रजापती, संदीप काळकर, वैभव खरजुल, विजय चित्ते, अशोक कडू, अशोक कुंभार, विलास मळगावकर आदी उपस्थित होते.

दोन दिवस विविध विषयांवर चर्चासत्रे घेण्यात आली. राज्य शासनाशी चर्चा करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याने पीओपी बंदीची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येईल.

या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून चर्चा करण्यात येईल, असे बैठकीत सांगण्यात आले. राज्यस्तरीय कोअर कमिटीत विविध जिल्ह्यांतील सदस्यांची नेमणूक करून त्यांना नियुक्तीचे पत्रही देण्यात आले. खासदार हेमंत अप्पा गोडसे यांनी या बैठकीला भेट देऊन प्रश्न समजून घेतला.

शासनाने ठरवावे धोरण!

पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, यासाठी पीओपी मूर्तींवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्र शासनाचे याबाबत धोरणच नाही. यासाठी तांत्रिक समिती गठित करण्यात आली होती, या समितीने आपला अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर केला. मात्र या धोरणाला अद्याप गती मिळाली नाही, यासह इतर अनेक महत्त्वाचे मुद्दे या बैठकीत उपस्थित करण्यात आले आहे.

केंद्रीय खादिग्रामोद्योग भारत सरकार आयोजित बेंगलोर मध्ये कुंभारकलाचे प्रशिक्षण व मोफत इलेक्ट्रॉनिक चाक वितरण सोहळा संपन्न

बेंगलोर : कर्नाटक राज्यातील मा. बळीराम कुंभार (सर) साहेब, मा. गजानन (मराठे सर) आणि मा. संपगिरीयम मास्टर साहेब यांच्या पुढाकाराने कर्नाटकात दिनांक १७/०२/२०२३ रोजी २० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रम संपन्न झाला.

कर्नाटक राज्यात कुंभारकला (pottery wheel) clay 20 प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षकाना इलेक्टिक चाक भारत सरकार मार्फत मोफत दिले जाणार आहे.

काही दिवसांनंतर ब्लॅजर मशीन व पग मशीन अनुदानावर दिले जाणार आहे.

***

खरं प्रेम सापडत नाही ते बांधलं जातं.

वीटभट्टी व्यावसायिक आर्थिक संकटात

पारगाव : बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे मातीच्या विटांना उठाव नसल्याने विटांच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सहा महिन्यांपूर्वी एक हजार विटांना १५ हजार रुपयांचा मिळणारा दर आता ११ हजार रुपयांवर येऊन सुद्धा विटांना मागणी नाही. त्यात उत्पादन खर्चातही मोठी वाढ झाल्याने वीटभट्टी व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. मागील पाच ते सहा वर्षांपूर्वी बांधकाम क्षेत्राला चांगले दिवस आल्याने बांधकाम साहित्याच्या व्यवसायालाही चांगले दिवस आले होते. त्यामुळे मातीच्या विटांनाही चांगली मागणी होती. या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळत असल्याने अनेकांनी वीटभट्टीचा व्यवसाय सुरु केला.

मागील दोन वर्षांत विटांना चांगली मागणी वाढली त्यामुळे विटांचे प्रती हजारी दर हे १५ हजार रुपयांवर गेले. त्यामुळे व्यावसायिकांना चांगले पैसे मिळू लागल्याने व्यावसायिकांनी विटांचे उत्पादन वाढवले त्यातच कोरोनाचे संकट आले. त्यानंतर बाजारात मंदी आली बांधकामे थंडावली, यावर्षी पावसाळ्यात अनेक भागात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला. त्यामुळे ग्रामीण भागात या वर्षी नवीन बांधकामे सुरू झाली नाहीत.

सिमेंट, सिपोरेक्स विटांचा वापर वाढला

अलीकडच्या काही वर्षांत मातीच्या विटांना सिमेंट तसेच सिपोरेक्स विटांचा पर्याय उपलब्ध झाला. सिमेंटची एक वीट ८ ते ९ रुपयांना मिळते. मातीच्या विटेच्या तुलनेने ती स्वस्त मिळत आहे. सिपोरेक्स विटांचे दर जेमतेम मातीच्या विटांसारखेच असले तरी त्या विटांचा वापर केल्यास बांधकाम व प्लास्टरसाठी येणाऱ्या खर्चात मोठी बचत होती. सिपोरेक्स विटा वजनात हलक्या असल्याने बांधकामासाठी वापरण्यात येणारे स्टील हे कमी लागते म्हणजे त्यामध्ये ३० टक्क्याने बचत होती. त्यामुळे सिपोरेक्स विटांचा वापर वाढला आहे. त्याचाही परिणाम मातीच्या विटांच्या विक्रीवर झाला.

धामणी (ता. आंबेगाव) : मंदीमुळे भट्टीवर पडून असलेल्या मातीच्या विटा.

विटांचा वाढलेला उत्पादन खर्च (रु.)- २५०० ते ३००० माती (ब्रास), १२,५०० ते १३,००० कोळसा (प्रति टन), ५,५०० काळी राख, १४०० ते १५०० पांढरी राख (प्रति टन), २४०० बगॅस (प्रति टन), मजुरी व वाहतूक एक हजार विटांसाठी सरासरी १६०० ते १७०० रुपये.

एका विटेसाठी १० रुपये उत्पादन खर्च येत आहे. ती वीट ११ रुपयांना विकूनही उठाव नाही. सहा महिन्यांपूर्वी उत्पादन खर्च तेवढाच होता. परंतु, एक वीट १५ रुपयांना जात होती. दरवर्षी दसऱ्याला वीटभट्टी व्यवसायाला सुरुवात होते. त्यावेळी भट्टीवरील मागील वर्षीच्या सर्व विटांची विक्री झालेली असते. परंतु या वर्षी सरासरी प्रत्येक वीटभट्टीवर दसऱ्याला मागील हंगामातील ५० टक्क्यांहून जास्त विटा शिल्लक होत्या. **– शिवराज पोखरकर, वीटभट्टी व्यावसायिक, संतोषनगर, भाम, ता. खेड**

वीटभट्टी व्यवसायासाठी लागणारे कामगार हे बहुतांशी यवतमाळ, मध्य प्रदेश येथून लाख–लाख रुपये उचल देऊन वाहनांची व्यवस्था करुन आणावे लागतात. त्यातच मातीला व माती वाहतुकीला परवाने मिळण्यास येणारी अडचण. त्यामुळे वीटभट्टी व्यावसायिक मंदी त्यात उत्पादन खर्च वाढलेला, या दुहेरी संकटात सापडला आहे. **– ज्ञानेश्वर दरेकर, वीटभट्टी व्यावसायिक, धामणी, ता. आंबेगाव**

पारंपारिक व्यवसायाला मिळेल उभारी... कारागिरांमध्ये उत्साह

सुरेश पाठक

यंदाच्या अर्थसंकल्पात पारंपारिक कुशल कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. या घोषणेमुळे पारंपारिक व्यवसायाला उभारी मिळू शकते. या निर्णयामुळे कारागिरांमध्ये चैतन्य निर्माण झाले असल्याची भावना व्यावसायिकांनी व्यक्त केली.

पारंपारिक व्यवसायाची मोठी बाजारपेठ भारतात आहे. अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक म्हणून हा वर्ग काम करतो. भारतातील विविध शहरात आणि गावागावांत आजही असे कुशल कारागीर मोठ्या प्रमाणात आहेत. पिढ्यानपिढ्या पारंपारिक व्यवसायाला हा वर्ग पुढे नेत आहे. या उत्पादनांवर अधिक लक्ष देण्याच्या गरजेतूनच अर्थमंत्र्यांनी ही घोषणा केली. भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा हा घटक सक्षम होणे गरजेचे आहे. पारंपारिक व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले तर गावागावात रोजगार वाढेल. व्यवसायाचे विकेंद्रीकरण होऊन अनेक हातांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. शहरांवर वाढता ताणही यामुळे कमी होईल. नियोजित पद्धतीने या व्यवसायाला प्रोत्साहन दिले तर त्याचे विधायक परिणाम दिसू शकतील. प्रगत तंत्रज्ञानामुळे आधुनिक साधनांचा बदलत्या जीवनशैलीत वापर वाढत आहे. यामुळे पारंपारिक साधने मागे पडत आहेत. यामुळे सुतार, चांभार, कुंभार, लोहार या समाजातील पारंपारिक व्यवसाय मोडकळीस आला आहे. पूर्वीच्या बलुतेदार पद्धतीवर अवकळा आल्याने कारागिरांसमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थसंकल्पातील पारंपारिक व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्या घोषणेमुळे हे चित्र पालटेल, असा विश्वास पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघाचे अध्यक्ष सुरेश पाठक यांनी व्यक्त केला.

आयुष्यात खरं प्रेम, खरी माया फार दूर्मिळ असते.

अनेकांना गारवा देणारा कुंभार समाज आजही उपेक्षित

गरम भट्टीबरोबर कुंभार समाजाला व्यवस्थेचे चटके; महत्त्वाचे प्रश्न शासन दरबारी प्रलंबित

जाफराबाद शहरात गरम भट्टीतून तापवलेल्या माठांवरुन शेवटचा रंगाचा हात फिरवताना महिला कारागीर.

जाफराबाद : ऊन तळपू लागले की, गरिबाचा फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठाची आठवण प्रत्येकाला होते. दरवर्षीप्रमाणे जाफराबाद शहरात कुंभार बांधवांनी वर्षभर मेहनत करून तयार केलेले माठ बाजारात विक्रीसाठी आले आहे. परंतु, हा समाज शासन दरबारी दुर्लक्षीत आहे. त्यांच्या समस्या आणि प्रश्नांचा घेतलेला हा आढावा. घरात महागडा फ्रिज असला तरी माठातील पाण्याची सर त्याला येत नाही. आपल्या कलेत काळानुसार परिवर्तन घडवून विविध आकाराचे रांजण, नांद, सुरई, मडके, माठ, गाडगे आदी छोट्या-मोठ्या आकाराची मातीची भांडी बाजारात दिसू लागली आहेत. सध्या सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडलेले असताना गरिबांचा हा फ्रिज आजही प्रत्येकाला सहज विकत घेता येत आहे. सध्या लहान-मोठ्या आकाराचे माठ हे शंभर रुपयांपासून ते तीनशे रुपयांना मिळत आहेत. परंतु माठ बनविणारे हे हात काळाच्या ओघात दुर्लक्षीत झाले आहे. नव्या पिढीला यात आता स्वारस्य राहिले नाही. वर्षभर मेहनत करूनही हा समाज विकासापासून दूर आहे. त्यांच्या अनेक महत्वाच्या मागण्या शासन दरबारी अजूनही प्रलंबित आहेत.

जगण्यासाठी कुंभार व्यवसायिकांचा संघर्ष

वाहतूक करताना मातीची भांडी फुटण्याची भीती असते. त्यामुळे शहराच्या ठिकाणी कुंभार व्यवसायिकांना हक्काची जागा मिळायला हवी. कला शिक्षक म्हणून कुंभार समाजातील युवक-युवतींना प्राधान्य मिळायला हवे. काळानुरुप आधुनिक यंत्र उपलब्ध करुन दिले पाहिजे. तसेच आधुनिक प्रशिक्षण शासनाने द्यायला हवे.

– संजय जोरले, युवक प्रदेशाध्यक्ष, म. प्र. कुं. स. संघटना.

समाजातील युवकांना प्रशिक्षाची गरज

आजच्या यांत्रिक युगात माती आणण्या-करिता बैलगाडी उपलब्ध होत नाही. वाहनाचे भाडे देणे परवडत नाही. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना माती आणण्या-पासून सर्व मेहनत करावी लागत असताना अधिकचा खर्च वाढत आहे. अशा वेळी शासनाने या समाजाकरिता माठ तयार करण्याचे नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करुन देऊन समाजातील तरुणांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

– अभय गुंडे, सावंगी.

कुंभार बांधवांची वर्षभराची मेहनत : माठ बनविण्यासाठी आणलेल्या मातीतील खडे वेगळे करावे लागते. नंतर ती गाळली जाते. नंतर चाकावर लावून पगई तयार केली जाते. पगईला थोपटून माठ तयार केला जातो. गरम भट्टीमध्ये तयार झालेल्या माठाला रंग दिल्यानंतर तो बाजारात विक्रीसाठी येतो. असा हा माठाचा प्रवास असतो. यामागे कुंभार बांधवांची मोठी मेहनत असते.

स्व.चि. गणाजी उखाजी बोरसे ह्यांची मुंजोबा म्हणून स्थापना कार्यक्रम संपन्न..!

बोरसे मळा (दि. २७/१/२०२३) : मकर संक्रांत पर्वानंतर आज बोरसे मळा, वीरगाव शेत शिवार ता. सटाणा बागलाण जि.नाशिक येथे बोरसे परिवारातील गत ४ थ्या पिढीतील स्व.चि. गणाजी उखाजी बोरसे ह्यांची मुंजोबा म्हणून मूर्तीची विधिवत पूजा करून त्यांच्या आवडीच्या आंब्याच्या झाडाजवळ स्थापना करण्यात आली. ह्यावेळी महाप्रसाद म्हणून वीरगाव वनोली पंचक्रोशीतील शेत वस्तीवरील आप्तेष्ट मंडळींना स्नेहभोजन देण्यात आले.

ह्या प्रसंगी संपूर्ण बोरसे परिवार सह मोरे परिवार, जगदाळे परिवार, वाघ परिवार, अहिरे परिवार, चव्हाण परिवार, चित्ते परिवार, बच्छाव परिवार, महाले परिवार, खैरनार परिवार, बागुल परिवार, ठाकरे परिवार, गोरे परिवार मधील आप्तजन व वाडी वस्ती मधील शिव-बांध जोडे मित्र परिवार उपस्थित होते.

***

ओणी गावच्या प्रगतीतील तुळसणकरांची लक्षवेधी भूमिका

एखाद्या गावचा किंबहुना त्याच्या परिघात येणाऱ्या अनेक खेड्यांचा शैक्षणिक विकास हा पर्यायाने तेथील मानसिक विकासाच्या उन्नतीसाठी नेहमीच लाभप्रद ठरल्याचे दिसून आलेले आहे. अलिकडच्या राजकीय धबडग्यात शैक्षणिक संस्था ह्या राजकारणाचे मध्यवर्ती केंद्र बनत चालल्या असल्याच्या काळात काही शैक्षणिक संस्थांनी आपल्या मूळ उद्देशाला मात्र कोठेही बाधा येऊ दिलेली नाही अशी उदाहरणेही आपल्यासमोर आहेत. अर्थात अशा संस्थाच्या प्रगतीत तेथील संस्थाध्यक्षांच्या भूमिकाच लक्षवेधी ठरल्या आहेत. या विषयाचा ऊहापोह करीत असताना तालुक्यातील ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ आणि या संस्थेला आपल्या अविरत प्रयत्नाने नावारूपाला आणण्यासाठी सदैव धडपडणाऱ्या वासुदेव तुळसणकर या उमद्या व्यक्तिमत्वाचे नाव प्रकर्षाने नजरेसमोर येते.

खेड्यापाड्यात जीवन व्यतीत केलेल्या व्यक्तीला तेथील शैक्षणिक प्रगतीसाठी जी आतून येणारी तळमळ लागते ती ओसंडून वाहणारा हा उमदा माणूस. एखाद्या व्यक्तीत आजुबाजूचा परिसर बदलून टाकण्याची क्षमता असते हे ओणी येथे उभारलेल्या कोट्यवधी रूपयांच्या अनेक शैक्षणिक वस्तूंनी सिद्ध केले आहे. केवळ शैक्षणिकच नव्हे तर सुप्रभा पतसंस्थेसारखी ६८ शाखा असलेली एक आर्थिक संस्था प्रगतीपथावर नेऊन त्यांनी तरूण, शेतकरी यांच्यापर्यंत पोहोचण्याचे देखील काम केले आहे. उच्चशिक्षित असूनही सर्वांत सहजपणे मिसळणारा कोणताही डामडौल बाळगण्याचा सोस नसलेला, ध्येय गाठण्यासाठी अविरत धडपडणारा, स्वतःची बायपास सर्जरी झालेली असतानाही कामात मागेपुढे पाहत न बसणारा माणूस म्हणून तुळसणकर आज तालुक्याला सुपरिचित झाले आहेत. आजच्या घडीला कालांतराने तालुक्याचे सांस्कृतिक केंद्र म्हणून ओणी हेच तालुक्याच्या पटलावर येईल असे अनेकविध उपक्रम, कार्यक्रम लक्षावधी रुपयांचा निधी उभारून तेथे सादर होत आहेत. यामागे केवळ तुळसणकर यांची इच्छाशक्तीच आहे.

ओणी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित नूतन विद्यामंदिर ओणीची स्थापना सन १९६६ मध्ये झाली. या संस्थेच्या स्थापनेत तालुक्यातील शिक्षणमहर्षी चंदुभाई देशपांडे यांचा अग्रक्रम होता. याच प्रशालेचे माजी मुख्याध्यापक गुरूवर्य शहाजीराव खानविलकर यांनी आपल्या कारकिर्दीत शैक्षणिक दर्जा सतत उंचावत राहण्यासाठी आपल्या आयुष्यातील मोठा कालावधी खर्च केला. मात्र हा सारा काळ प्रशालेच्या भौतिक सुविधांच्या बाबतीत मोठा खडतर होता.

सन १९९२-१९९३ च्या सुमारास संस्थेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतलेल्या वासुदेव तुळसणकर यांनी सहकाऱ्यांच्या आणि मित्रपरिवाराच्या सहकार्यातून ओणीसारख्या खेडेवजा भागात कार्यरत असलेल्या या संस्थेच्या अखत्यारितील सर्व विभागांना प्रगत भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. सन २००७ मध्ये जन्माला आलेले श्री शांताराम भट इंग्लिश स्कूलसाठी दोन कोटी रूपयांची नवी कोरी भव्यदिव्य इमारत उभी राहण्यासाठी भट कुटुंबियांच्या आर्थिक सहकार्याच्या जोडीला तुळसणकर, त्यांचा परिवार आणि मित्रपरिवार देखील उभा राहिला आणि या वास्तूचे स्वप्न साकार झाले. तुळसणकर यांच्या कारकिर्दीत संस्थेच्या सुमारे साडेतीन कोटी रुपयांच्या नव्या वास्तू उभ्या राहिल्या. या माध्यमातून केवळ इमारतीच उठल्या नाहीत तर या वास्तू आज दैनंदिन शैक्षणिक कामकाजाच्या जोडीला प्रगत पूरक उपक्रमांच्या साथीदार बनल्या आहेत. क्रीडा विभागात नेहमीच सर्वात पुढे असलेले नूतन विद्यामंदिर आज सुसज्ज वाचनालय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाचे केंद्र देखील आहे.

सन २००४ पासून घेण्यात येणाऱ्या प्रबोधकार ठाकरे यांच्या नावाने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा असो, सन २०१३ पासून आयोजन केले जात असलेल्या राज्यस्तरीय जयवंत दळवी स्मृती खुल्या एकांकिका स्पर्धा असो तुळसणकर यांनी नेहमीच ओणी सारख्या खेडेवजा गावात सर्वोत्कृष्ट देण्याचा प्रयत्न केला आहे.

२४ व्या अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाचे ओणी येथे आयोजन करून स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून हे संमेलन एकहाती यशस्वी करणाऱ्या तुळसणकर यांनी अनेक व्याख्यानांचे आयोजन करण्यातही पुढाकार घेतलेला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे राजापूरचे अध्यक्ष, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या राजापूर शाखेचे अध्यक्ष आणि जिल्हा कार्यवाह असलेल्या तुळसणकर यांनी सिंधुताई सपकाळ, प्रा.पुष्पा भावे, डॉ. आ.ह. साळुंखे, विठ्ठल कामत, काँ. गोविंद पानसरे, गीतकार प्रवीण दवणे, कवी संतोष पवार, इंद्रजीत भालेराव यांच्याशी थेट संवाद साधण्याचा तालुकावासियांना योग घडवून दिला आहे.

आपल्या शैक्षणिक विकासाच्या व्रतासोबतच साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा यांच्याशी निगडीत उपक्रमांना पुरेसे पाठबळ देणाऱ्या तुळसणकर यांनी सन १९९३ साली स्थापित झालेल्या सुप्रभा पतसंस्थेचा अध्यक्ष म्हणून २२ वर्षे डोलारा सांभाळला आहे. तुळसणकर यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूत अनेक गुण दडलेले आहेत. राजापूर शहरातील छत्रपती शिवरायांच्या स्मारकाच्या जीर्णोध्दाराची नुसती चर्चा झडू लागली तेव्हाच आपल्या परीने सर्वप्रथम अकरा हजारांचा धनादेश देण्याचे दातृत्व देखील त्यांनीच दाखवून दिले होते हे मुद्दाम नमूद करीत आहे.

मुंबई विद्यापिठाचे मराठी विषयातील तर्खडकर सुवर्णपदक विजेत्या असलेल्या वासुदेव तुळसणकर यांनी मुंबई महानगर पालिकेतील उच्च पदाच्या नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन एका छदामाचीही अपेक्षा न करता ग्रामीण भागाच्या शैक्षणिक विकासाचे घेतलेले व्रत हे एक ध्येयवेडा माणूसच अंगिकारू शकतो हे निर्विवाद सत्यच आहे आणि अशाच ध्येयवेड्या आणि व्रतस्थ कर्मयोग्यांचा ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांना शिक्षणाचा आधार आहे.

***

जातनिहाय जनगणना कुणाच्या हिताची?

बिहारमध्ये जातनिहाय जनगणना सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्रातही ती सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली आहे. बिहारमध्ये सुरू झालेल्या जातनिहाय जनगणनेला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देण्यात आले आहे. त्यानंतर ही जनगणना नाही तर जातीचा सर्व्हे आहे, असे सांगून मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी यातून पळवाट शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर कशासाठी हवी जातनिहाय जनगणना. तिचे फायदे-तोटे काय, यावर आता चर्चा सुरू झाली आहे. भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. मात्र, यात जातनिहाय जनगणना केली जात नाही. महाराष्ट्रासह अनेक राज्यांतील नेत्यांची जातनिहाय जनगणना करण्याची मागणी आहे. **– चंद्रकांत कित्तुरे**
(लेखक लोकमत कोल्हापूर आवृत्तीत वृत्तसंपादक आहेत.)

कधी झाली होती जातनिहाय जनगणना?

देशात १८७१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना होत आहे. मात्र, स्वातंत्र्यपूर्व काळात १९३१ मध्ये ब्रिटिशांनी जातनिहाय जनगणना केली होती. त्यानंतर १९४१ मध्येही जातनिहाय जनगणना करण्यात आली. मात्र, तिचे आकडे कधीच बाहेर आलेले नाहीत. नाही म्हणायला २०११ मध्ये सामाजिक, आर्थिक आणि जातनिहाय जनगणना करण्यात आली आहे. मात्र, यातील जातनिहाय जनगणनेची आकडेवारी केंद्र सरकारने जाहीर केलेली नाही.

केंद्रातील सत्ताधाऱ्यांचा विरोध

देशात घटनेनुसार ५० टक्केपेक्षा जादा आरक्षण देता येत नाही. अनुसूचित जातीसाठी १५ टक्के आणि जमातीसाठी ७.५ टक्के आरक्षण आहे. मंडल आयोगाच्या अहवालानुसार तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले. ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के गृहित धरली गेली. तीही १९३१ च्या जातनिहाय जनगणनेच्या आधारावरच. ५० टक्क्यांची ही मर्यादा संपल्यामुळे इतर जातींना आरक्षण देता येत नाही. महाराष्ट्रात मराठी समाजाला आरक्षण देण्यातही हीच मुख्य अडचण आहे. जातनिहाय जनगणनेमुळे जातीजातीत तेढ वाढीस लागेल आणि देशाच्या एकात्मकतेच्या दृष्टीने ते घातक ठरेल, अशी भीती असल्यानेच देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचा जातनिहाय जनगणनेला विरोध होता. केंद्रात सत्तेवर असताना काँग्रेस आणि भाजपने जातनिहाय जनगणनेला पाठिंबा दिलेला नाही.

फायदे काय?

आपल्या देशात अनेक जाती-धर्माचे लोक राहतात; पण कोणत्या जातीचे किती लोक आहेत? त्यांची टक्केवारी किती आहे? कोणत्या जातीचे लोक मागासलेले आहेत, हे या जनगणनेवरुन कळेल. त्यानुसार त्यांच्या विकासासाठी योजना बनवता येतील. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता येईल.

तोटे काय?

राज्या-राज्यात जातनिहाय लोकसंख्येचे प्रमाण वेगवेगळे असते. एका राज्यात बहुसंख्याक आणि पुढारलेली असलेल्या जातीचे लोक दुसऱ्या राज्यात अल्पसंख्याक, मागासलेले असू शकतात. त्यामुळे केंद्र सरकारला आरक्षणाचे धोरण ठरविताना अडचणीचे ठरते. त्याचप्रमाणे अनेक प्रादेशिक पक्ष आपल्या राज्यात जातीचे राजकारण करत असतात. ती त्यांची व्होट बँक असते. तिला जपण्यासाठी योजना, सोयी, सवलतींची खैरात केली जाण्याचा धोका यात आहे. तसेच ज्या जातीची लोकसंख्या कमी होत आहे, त्या कुटुंबनियोजनाचे धोरण धुडकावून लावून आपली लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करु लागतील, असाही एक धोका संभवतो. आरक्षणावरुन जातीजातीत संघर्ष उद्‌भवण्याचा धोकाही आहे.

***

मुलांनी निवडली वेगळी वाट : अनेक व्यावसायिक, व्यापाऱ्यांना चिंतेने घेरले वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळणार कोण?

औरंगाबाद : मुले-मुली आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर करु इच्छितात. अनेकांनी वडिलोपार्जित व्यवसाय टाळून आपल्या पसंतीची वाटही धरली आहे. यामुळे त्यांचे पालक असलेले शहरातील व्यापारी-व्यावसायिक आनंदी आहेत. मात्र, दुसरीकडे त्यांना आपल्या वडिलोपार्जित व्यापार-व्यवसायाची चिंताही लागली आहे. मोठ्या कष्टाने उभा केलेला हा डोलारा आपल्यानंतर सांभाळणार कोण? या विचाराने उतारवयात त्यांना घेरले आहे.

हॉटेल व्यावसायिक, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स, अडत व्यापारी, सराफा व्यापारी, तेल विक्रेता, मसाले व्यापारी, मोठे कॉन्ट्रक्टर ते अगदी रद्दीचा व्यवसाय करणाऱ्यांसह सर्वच क्षेत्रांतील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांचा यात समावेश आहे.

मुलांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न बघत या व्यापाऱ्यांनी त्यांच्या व्यापार-व्यवसायाच्या बळावरच मुलांना उच्चशिक्षणासाठी मुंबई, पुणे, दिल्लीसह विदेशातही पाठवले. अनेकांची मुले-मुली शिक्षणानंतर तिथेच स्थिरावली, आपल्या आवडीच्या क्षेत्रात ते रमले. त्यांना आपल्या वडिलांच्या व्यापार-व्यवसायात रस नाही यामुळे आता अनेक व्यापाऱ्यांची अडचण झाली आहे. मुलांच्या आनंदासाठी त्यांना पिढ्यांपिढ्यांपासून स्थिरावलेल्या, लाखोची उलाढाल आणि नावाजलेला व्यापार-व्यवसाय गुंडाळावा लागणार आहे. जागतिक स्पर्धेच्या युगात नवीन उद्योग-व्यवसाय सुरू करणे आणि त्यात जम बसवणे सोपे काम नाही. या विचाराची उच्चशिक्षित मुले नोकरीच्या मागे न लागता त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळत असल्याचीही अनेक उदाहरणे आहे, असेही व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

व्यापाऱ्यांची मुले नोकरीत रमली

उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबईसह विदेशात गेलेली व्यापाऱ्यांची मुले चांगली नोकरी मिळाल्याने तिथेच स्थिरावली. ते वडिलांच्या व्यापार-व्यवसायात येण्यास उत्सूक नाहीत. त्यामुळे पिढ्यापिढ्यांपासून स्थिरावलेला व्यवसाय आपल्यानंतर सांभाळणार कोण? अशी चिंता व्यापाऱ्यांना सतावत आहे. याच कारणाने शहरातील काही प्रतिष्ठित व्यापाऱ्यांनी त्यांचा व्यवसाय बंद केला आहे.

– लक्ष्मीनारायण राठी, उपाध्यक्ष, जिल्हा व्यापारी महासंघ

व्यवसाय पुढे बंद करावा लागणार

शहरातील विविध क्षेत्रांतील व्यापारी, मोठ्या दुकानदारांच्या एकुलत्या एक मुला-मुलींनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडवले आहे. तर, काही मुलांना वडिलांच्या व्यवसायात रस नाही. त्यांना स्वतःच्या हिमतीवर नवीन क्षेत्रात नावलौकिक मिळवायचे आहे. त्यामुळे अनेक व्यापाऱ्यांना त्यांचा व्यवसाय पुढे बंद करावा लागणार आहे.

– जयंत देवळाणकर, कोषाध्यक्ष, जिल्हा व्यापारी

यशामुळे आपली ओळख लोकांना होते आणि अपयशामुळे लोकांची ओळख आपल्याला होते..!

देशातील एक टक्क्यांकडे ४० टक्के संपत्ती

'ऑक्सफॅम'च्या अहवालातील माहिती, गरीब-श्रीमंत दरी वाढली

दाओस : भारतामध्ये गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली असून देशातील केवळ एक टक्का लोकांकडे एकूण संपत्तीपैकी ४० टक्के एवढी संपत्ती असल्याची धक्कादायक बाब समोर आली असून तळातील अर्ध्या लोकसंख्येकडे केवळ तीन टक्के एवढीच संपत्ती असल्याचे दिसून आले आहे. 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वार्षिक बैठकीत पहिल्या दिवशी वार्षिक विषमता अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून त्यामध्ये भारतातील स्थिती एका स्वतंत्र पुरवणीच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे.

भारतातील दहा श्रीमंत लोकांवर आणखी पाच टक्के कर लावला तर देशातील सगळ्याच मुलांना शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी जेवढा खर्च लागतो तेवढा त्यातून सहज वसूल होऊ शकतो. अब्जाधीश उद्योजक गौतम अदानी यांच्या २०१७-२०२१ या काळातील अप्रत्यक्ष नफ्यावर एकाचवेळी कर आकारला तर त्यातून १.७९ लाख कोटी रुपये उभे राहतील. त्यातून वर्षभरासाठी पन्नास लाख प्राथमिक शिक्षकांची नियुक्ती करता येईल, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. 'श्रीमंतांवरील लक्ष्मीकृपा' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या या अहवालामध्ये भारतातील अब्जाधीशांवर त्यांच्या एकूण संपत्तीच्या केवळ दोन टक्के जरी कर आकारला तरीसुद्धा त्यातून ४० हजार ४२३ कोटी रुपये उभे राहू शकतात. त्यामुळे पुढील तीन वर्षे कुपोषण निर्मूलन मोहिमेला बळ मिळू शकते असे म्हटले आहे.

विषमतेवरही प्रकाश

दहा अब्जाधीशांवर एकाचवेळी पाच टक्के कर लावल्यास त्यातून १.३७ लाख कोटी रुपये उभे राहू शकतात ते आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या ८६ हजार २०० कोटी रुपयांच्या बजेटपेक्षा १.५ पटीने अधिक आहेत. या अहवालामध्ये लिंग विषमतेवर देखील प्रकाश टाकण्यात आला आहे. भारतात ज्या कामासाठी पुरुषांना एक रुपया मिळतो त्याच कामासाठी महिलांना केवळ ६३ पैसे मिळत असल्याचे दिसून आले आहे. अनुसूचित जाती आणि ग्रामीण भागातील कामगारांची स्थिती आणखीनच बिकट असल्याचे दिसून आले.

अब्जाधीशांची संख्या वाढली

* भारतामध्ये अब्जाधीशांच्या संख्येमध्येही वाढ झाली आहे. २०२० मध्ये ही संख्या केवळ १०२ एवढी होती. २०२२ मध्ये ती १६६ वर गेल्याचे दिसून आले. देशातील शंभर श्रीमंत भारतीयांची एकत्रित संपत्ती ६६० अब्ज अमेरिका डॉलर (५४.१२ लाख कोटी रुपये) एवढी असून ती देशाच्या अठरा महिन्यांच्या केंद्रीय बजेट एवढी आहे.

देशातील दलित, आदिवासी, मुस्लिम, महिला, कामगारांची स्थिती दयनीय आहे. केवळ श्रीमंतांवरच लक्ष्मीकृपा करणाऱ्या व्यवस्थेमुळे गरिबांची आबाळ होते. श्रीमंतांशी तुलना करता गरीब जनता मोठा कर भरते. जीवनावश्यक वस्तू, सेवांवरील त्यांचा खर्च अधिक आहे. श्रीमंतांवर अधिक कर आकारण्याची वेळ आली आहे.

– अमिताभ बेहर, सीईओ, ऑक्सफॅम इंडिया

...तर मोठी रक्कम उभी राहील

भारतातील शंभर आघाडीच्या अब्जाधीशांवर २.५ टक्के आणि दहा आघाडीच्या अब्जाधीशांवर ५ टक्के कर लावल्यास एक मोठी रक्कम उभी राहू शकते त्यातून देशातील सगळ्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च निघू शकतो. नोव्हेंबर २०२२ मध्ये कोरोनाचे संकट सुरू झाले तेव्हापासून भारतीय अब्जाधीशांच्या संपत्तीमध्ये प्रतिदिन १२१ टक्क्यांची (३ हजार ६०८ कोटी) वाढ झाल्याचे 'ऑक्सफॅम'ने म्हटले आहे. २०२१-२२ या वर्षाचा विचार केला १४.८३ लाख कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) मिळाला असून त्यातील ६४ टक्के कर हा तळातील ५० टक्के लोकांकडून प्राप्त झाला आहे तसेच केवळ ३ टक्के जीएसटी आघाडीच्या दहा श्रीमंतांकडून मिळाला आहे.

पद म्हणजे काय...

-राजेंद्र लाड (आष्टी)

कोणत्याही क्षेत्रातील पद म्हणजे सहकाऱ्यांनी त्या क्षेत्रात समूह हितासाठी उपलब्ध करुन दिलेली संधी व काटेरी मुकुट असतो. कोणत्याही माणसाचे महत्व हे पद मिळाल्यामुळे कधीच वाढत नाही, तर तो त्या पदाला किती न्याय देतो, तो किती कार्यक्षम, कर्तृत्व, नेतृत्व दाखवतो यावरच त्याचे खरे व्यक्तिमत्व समाजाला समजते. कर्तृत्वच नसेल आणि पद मिळाल्यामुळे अहंपणा, स्वार्थपणा, लबाडी व गर्व चढला असेल तर कालांतराने निश्चितच त्याचा गर्व खाली होतो. पदामुळे तात्पुरते महत्व वाढते, पण चांगल्या कर्तृत्वामुळे आयुष्यभर महत्व राहते. पदामुळे आपल्यावर असलेली जबाबदारी व्यवस्थित वेळ देऊन पार पाडली पाहिजे. चांगली माणसं, सहकारी बरोबर घेऊन त्या क्षेत्रात यश मिळवले पाहिजे, ज्यांनी तुमच्यासाठी त्याग केला आहे, त्यांची जाणीव निरंतर व कायमच ठेवली पाहिजे. व्यक्ती जेंव्हा समाजात जितक्या उंचीवर पोहचते ती निव्वळ त्याच्या कर्तृत्वामुळे नव्हे, तर त्या व्यक्तीच्या सोबत असलेल्या बऱ्याच लोकांनी केलेला त्यागाचा सुद्धा त्यात महत्त्वाचा वाटा असतो. म्हणून संबंधितांनी आपल्या स्वत:ला मोठं म्हणण्यापेक्षा आपल्याला मोठे करणारी आपली माणसं मोठी असतात याची जाणीव ठेऊन वागलेले बरं. ज्या पायरीचा सहारा घेऊन आपण पुढची पायरी गाठली आहे, त्या पायरीला कधीच विसरू नये. कारण त्या पायरीचा आधार घेतला नसता तर आपण पुढची पायरी कधीच ओलांडू शकलो नसतो...!

लक्षात असू द्या पद क्षणभंगुर असते, पण पद गेल्यावर आपली किंमत कायम राहिली पाहिजे, असे माणसांशी वागले पाहिजे. नाहीतर हाच समाज तुमची कार्यक्षमता, कर्तृत्व, वागणं, प्रामाणिकता व बोलणं पाहत असतो, ऐकत असतो आणि सहनही करत असतो, मात्र लबाडीपणा वाढला तर योग्य वेळी धडा शिकवतो? कि तिथं तुमची किंमत रसातळाला जाऊन शून्य होते.

म्हणूनच आपल्या माणसांशी, समाजाशी व विश्वासू मित्रांशी, नीट वागा, नीट बोला व आपले कर्तृत्व नि:स्वार्थी व चांगले आहे हे सिद्ध करा, तरच लोक तुमच्या सोबत राहतील. जो दुसऱ्यांना मान देतो, मुळात तोच स्वत: सन्माननीय असतो. कारण माणूस दुसऱ्यांना तेच देऊ शकतो, जे त्याच्या जवळ असते. मनाचा मोठेपणा हा गुण आहे, जो पदाने नव्हे तर संस्कारांनी प्राप्त होतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीने पद आहे म्हणूनच काम केलं पाहिजे अस नाही, पद हे आपण मागून नाहीतर आपल्या लोकांनी, समाजानी दिलं पाहिजे तरच त्या कर्तृत्वाला मानसन्मान मिळतो. पद म्हणजे मी कुणी मोठा आहे हे ज्या दिवशी मनात येईल त्या दिवसापासून आपली उतरती कळा सुरू झाली हे समजून जा. यामुळे पदाचा गर्व टाळून पदाला न्याय मिळेल असेच काम करा.

***

मैत्री अशी करा जी दिसली नाही, तरी चालेल पण जाणवली पाहिजे...

प्रजापति समाज विकास मंडल का सम्मेलन संपन्न

प्रतिमा पुजन तथा दिप प्रज्वलन करते हुए संगिता यादव, सी.पी. प्रजापति, अशोकराव सोनवणे, सुरेशजी प्रजापति तथा अन्य मान्यवर

राज्य सभा सांसद सदस्य संगिता यादव का सम्मान करते हुये सी.पी. प्रजापति, सुरेशकुमार प्रजापति, अशोकराव सोनवणे, गोविंद प्रजापति व संस्था पदाधिकारी

होशियार छात्रौ का सम्मान संगिताजी यादव कि कर कमलोसे किया

होशियार छात्रौ का सम्मान संगिताजी यादव कि कर कमलोसे किया

पनवेल : प्रजापति समाज विकास मंडल रजि. राष्ट्रीय सामाजिक संस्था का १८ वां वार्षिक सम्मेलन रविवार १२ फरवरी २०२३ को आंध्र कला समिति हॉल, सेक्टर-२, नवीन पनवेल, नवी मुंबई में शानदार ढंग एवं धूमधाम से संपन्न हो गया।

सम्मेलन की शुरुआत मुख्य अतिथि संसद सदस्य (राज्य सभा) मा. श्रीमती संगीता यादव जी, सुरेश प्रजापति- राष्ट्रीय अध्यक्ष दक्ष फाउंडेशन, अशोक विठ्ठल सोनवणे-राष्ट्रीय अध्यक्ष ओबीसी सेवा संघ, ममता सैनी जी, विनोद खीमजी प्रजापति फटानिया आदि के द्वारा तालियों की गड़गड़ाहट के बीच दीप प्रज्वलित करके व महाराजा दक्ष प्रजापति, श्रीयादे माताजी, संत गोरा कुंभार जी, महात्मा संतराम बीए जी व पद्मश्री रत्नप्पा कुम्भार जी की फोटो पर पुष्प अर्पित करते हुए किया गया। तद्परांत अतिथियों को सम्मानित व्यास मंच पर सम्मान के साथ बैठाया गया एवं पुष्पगुच्छ, अंगवस्त्र, ट्रॉफी व सम्मान पत्र देकर सम्मानित व स्वागत किया गया।

संस्था के संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष- सी.पी. प्रजापति ने शुरुआत में अपने अध्यक्षीय भाषण में संस्था द्वारा किए जाने वाले सामाजिक कार्यों, समाज के लोगों के सहयोग आदि विश यू के बारे में विस्तृत विवरण दिया। उन्होंने बताया कि संस्था समाज के लोगों के बीच सामाजिक चेतना, शैक्षणिक प्रगति, आर्थिक उन्नति, राजनीतिक भागीदारी, गरीब छात्रों को आर्थिक मदद, शिक्षा किट का विवरण, मेडिकल कैंप, स्वच्छता अभियान आदि विषयों को लेकर विशेष रूप से कार्य करती है। उन्होंने मांग किया कि महाराष्ट्र में माटी कला बोर्ड का गठन होना चाहिए, महाराष्ट्र में प्रजापतियों को ओबीसी आरक्षण मिलना चाहिए, जातिगत जनगणना होनी चाहिए और राजनीतिक भागीदारी मिलनी चाहिए ताकि प्रजापति समाज के लोग भी समाज की मुख्यधारा में समाविष्ट हो सके।

संसद सदस्य राज्यसभा श्रीमती संगीता यादव जी, ममता सैनी जी, सुरेश भाई प्रजापति जी, अशोक सोनवणे जी, राजेंद्र बाबू प्रजापति जी आदि ने अपना मनोगत व्यक्त करते हुए कहां कि प्रजापति समाज को हर क्षेत्र में उचित भागीदारी मिलने के बारे में समर्थन किया और बताया कि इस समाज के लोगों को भी राजनीतिक भागीदारी मिलनी चाहिए और महाराष्ट्र में जो भी इन लोगों की समस्याएं हैं, मांग हैं वह वाजिब है और पूरा होना चाहिए। अपने संबोधन में संसद सदस्य संगीता यादव जी ने कहा कि प्रजापति समाज की जो भी समस्याएं हैं इनकी जो भी मांग है उस पर उचित ध्यान दिलवाने की कोशिश करेंगी और यथासंभव कोशिश करेंगी उनकी समस्याओं का समाधान हो सके। जो

प्रजापति समाज विकास मंडल के सभी पदाधिकारी के साथ अध्यक्ष सी.पी. प्रजापति.

कुछ भी हो सकेगा वह जरूर करेंगी। उन्होंने कहा कि समाज में जिसका जो हक है वह मिलना चाहिए उन्होंने कहा कि प्रजापति समाज संगठित होकर रहेगा तो उन्हें जरूर लाभ मिलेगा और उनको समाज की मुख्यधारा में उचित स्थान मिल सकेगा। राजनीतिक भागीदारी मिल सकेगी।

कार्यक्रम में समाज के बच्चों द्वारा रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम भी प्रस्तुत किया गया है। प्रजापति समाज की १०वीं १२वीं के विद्यार्थियों और समाज के विशिष्ट व्यक्तियों को प्रशस्ति पत्र एवं सम्मान चिन्ह देकर सम्मानित व पुरस्कृत भी किया गया।

इस अवसर पर जिला स्तर से लेकर राष्ट्रीय स्तर पर करीब दो दर्जन पदाधिकारियों की नियुक्तियां भी की गई। सम्मेलन को सफल बनाने के लिए विनोद प्रजापति–राष्ट्रीय मुख्य महासचिव, गजेंद्र प्रजापति, ओम प्रकाश प्रजापति संपादक उत्तर शक्ति, इंद्रजीत प्रजापति, सर्वजीत प्रजापति, एडवोकेट ओम प्रकाश प्रजापति, गोवर्धन प्रजापति, राजेंद्र बाबू प्रजापति, रविंद्र प्रजापति, संजय प्रजापति, राम अशीष सिक्मी प्रजापति, चंद्रशेखर प्रजापति, श्रीमती पूनम प्रजापति, श्रीमती नीलम प्रजापति, श्रीमती ज्ञानती प्रजापति, डॉ. ज्ञान प्रकाश प्रजापति, राजेंद्र प्रजापति, सोनू प्रजापति, भगवान दास प्रजापति, शिव प्रसाद प्रजापति, सुनील प्रजापति, बजरंगी प्रजापति, तूफानी प्रजापति, कैलाश प्रजापति, बच्चे लाल प्रजापति, गोविंद प्रजापति, राजेश प्रजापति, चंद्रजीत प्रजापति, रामजीत प्रजापति, सूर्यनाथ परदेसी, विशाल प्रजापति, दिनेश प्रजापति, काशीनाथ परदेसी, सोनू प्रजापति, बंधु प्रजापति, राम अवध प्रजापति, विनोद प्रजापति, लोकनाथ प्रजापति, फूलचंद प्रजापति, केशव राम प्रजापति आदि ने विशेष मेहनत व सहयोग देकर कार्यक्रम को सफल बनाया।

कार्यक्रम का संचालन प्रजापति समाज विकास मंडल के राष्ट्रीय उपाध्यक्ष एवं सर्व प्रजापति शक्ति ट्रस्ट के अध्यक्ष अजय प्रजापति ने किया। आभार विनोद कुमार प्रजापति राष्ट्रीय मुख्य महासचिव ने प्रकट किया।

सम्मेलन में लगभग ३०० सौ समाज बंधुओं ने बढ़ चढ़कर भाग लिया और कार्यक्रम समापन के बाद लोगों ने स्नेह भोजन का स्वाद भी लिया।

***

